उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



भारताकडून जपानचा ५-१ च्या फरकाने पराभव

अक्षय कुमार दिसणार नवीन चित्रपटात 'भूत बंगला'



■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१ ■ नाशिक, मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

## महत्त्वाचे



### जम्मूच्या राजौरीत २ दहशतवादी ठार

**श्रीनगर :**

गेल्या काही महिन्यांपासून जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने दहशतवाही हल्ल्याच्या घटना समोर येत आहेत. जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी दहशतवादी आणि भारतीय लष्करामध्ये चकमक झाली होती. त्यानंतर रियासी जिल्ह्यात यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या एका बसवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यानंतर आता जम्मू-काश्मीरमधील राजौरी येथील नौशेरा सेक्टरमध्ये लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. राजौरी जिल्ह्यात भारत-पाकिस्तान सीमेवर लष्कराने दहशतवाद्यांच्या घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला असून दोन दहशतवाद्यांना ठार केले. यावेळी भारतीय जवानांनी दहशतवाद्यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं. रविवारी मध्यरात्री झालेल्या घुसखोरीच्या विरोधात भारतीय जवानांनी ही मोठी कारवाई केली.

### मंकीपॉक्स केंद्राकडून राज्यांसाठी सूचना जारी

**नवी दिल्ली :**

दिल्लीत मंकीपॉक्सचा संशयित रुग्ण आढळल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना एक मार्गदर्शक सुचना जारी केलीय. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे सचिव अपूर्व चंद्र यांनी जारी केलीय. दिल्लीमध्ये आढळलेला संशयित रुग्ण हा विदेशात भारतात परतला होता. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यांना संशयित रुग्णांची मंकीपॉक्स आजाराची तपासणी करण्याच्या सुचना दिल्यात. संसर्ग झाल्याची पुष्टी झाल्यास त्यांना वेगळे करावे आणि संसर्गाचा धोका कमी करण्यासाठी संपर्क ट्रेसिंग करावं, अशा सुचना दिल्यात. टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार प्रवाशांना आयसोलेशन करण्यासाठी संपूर्ण व्यवस्था करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### सूरतमध्ये गणपती मंडपावर दगडफेक

**सुरत :**

देशभरात गणेशोत्सवाची धूमधाम सुरु आहे. देशभरात लाडक्या गणपती बाप्पाच्या भक्तीमध्ये लोक तल्लीन झाले आहेत. पण गुजरातमधील सूरतमध्ये मात्र याला गालबोट लागले आहेत. सूरतमध्ये गणेशोत्सवादरम्यान दगडफेकीची घटना घडल्याचं समोर आलेय. सूरतमधील सैयदपुरा भागात काही समाजकंटकांनी गणपती मंडपावर दगडफेक केला. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संतप्त गणेशभक्तांनी पोलीस स्टेशनला घेराव घालत, कारवाईची मागणी करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, गणपती मंडपावर दगडफेक झाल्यानंतर लोकांचा राग अनावर आला. आक्रोशात असणाऱ्या लोकांनी सैयदपुरा पोलीस चौकीला घेराव घातला. लोकांना शांत करण्यासाठी स्थानिक आमदार कांती बलर घटनास्थळावर पोहचले होते. आरोपींना सोडलं जाणार नाही, असे अश्वासन दिले. त्यानंतर लोकांचा राग शांत झाला.

### नृत्य गोपालदास यांची प्रकृती खालावली

**अयोध्या :**

अयोध्या राम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपालदास महाराज यांची प्रकृती खालावली आहे. रविवारी संध्याकाळी त्यांना लखनऊच्या मेदांता हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांना युरिनरी आणि जेवणाची समस्या असल्याचे सांगण्यात येत आहे. महंत यांचे वय सध्या ८६ वर्षे आहे. २४ ऑगस्ट रोजी जन्माष्टमी साजरी करण्यासाठी ते अयोध्येहून मथुरेला गेले होते. तेथून इंदूरलाही गेले. परतत असताना त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना ग्वाल्हेरमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, सुधारणा न झाल्याने मेदांता लखनऊला आणण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत आहे.

# जागावाटपात सर्वांचा मान राखणार

## मुख्यमंत्री शिंदे , अजित पवारांसोबत बैठक

**मुंबई :**
**आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणूनच सर्वजण निवडणुकीला सामोरे जातील. जागा वाटपांबाबतही एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी असा सर्वांचाच मान राखला जाईल, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली.**

भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आले होते. मुंबई दौऱ्याचा समारोप होण्यापूर्वी अमित शाह यांनी मुंबई विमानतळावर महायुतीच्या नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसकडून अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे उपस्थित होते. महाराष्ट्र भाजपकडून देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकीबाबत महायुतीमधील मित्र पक्षांच्या नेत्यांना जागावाटपात सन्मानजनक जागा देण्याचा शब्द दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. याशिवाय ज्या जागा निवडून येतील त्याचा लवकरात लवकर आढावा घेऊन एकत्रित बैठक करण्याच्या सूचना देखील अमित शाह यांनी दिल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या नेत्यांनी करु नयेत अशा सूचना देखील अमित शाह यांनी दिल्याची सूत्रांची माहिती आहे.

महायुतीतील धुसफूस चव्हाट्यावर येऊ नये, जाहीर वाद टाळावेत, अशा सूचना अमित शाह यांनी दिल्या आहेत. महायुतीच्या नेत्यांनी संयम ठेवावा आणि एकजूट असल्याचे चित्र जनतेसमोर जाईल, याची काळजी घ्यावी असे देखील ते म्हणाले. जिंकून येण्याची क्षमता असलेले योग्य उमेदवार निश्चित करावेत आणि विरोधकांच्या फेक नरेटिव्हला उत्तर द्या, अशा सूचना देखील अमित शाह यांनी दिल्या. भाजप नेत्यांसोबत झालेल्या बैठकीत भाजपच्या अंतर्गत सर्व्हे वर अमित शाह यांनी लक्ष वेधले असल्याची माहिती आहे. शाह यांनी राज्य सरकारने घेतलेले निर्णय जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे भाजप नेत्यांना आदेश दिले आहेत. भाजपच्या काही आमदारांची कामगिरी समाधानकारक नाही जागा बाबत योग्य निर्णय घ्या, अशा सूचना देखील अमित शाह यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिल्या आहेत.

### पुढील बैठक दिल्लीत

महायुतीमधील जागा वाटपासंदर्भात अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. अमित शाह यांच्यासोबत काल झालेल्या बैठकीनंतर महायुतीच्या नेत्यांची पुढील बैठक दिल्लीत पार पडणार आहे. महायुतीच्या जागाटपाबाबत अंतिम चर्चा दिल्लीत होऊ शकते. महायुतीच्या नेत्यांची मुंबई येथील बैठक जवळपास ४५ मिनिटे झाली.



### लालबागच्या राजाचे दर्शन

काल सकाळी सपत्नीक मुंबईतील लालबागच्या राजाचे अमित शाह यांनी दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, दीपक केसरकर, चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे हे नेते लालबागमध्ये उपस्थित होते. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार हे मुंबईत असूनही दौऱ्यावेळी उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. अजित पवार हे रविवारी महायुतीच्या बैठकीसाठी तातडीने बारामतीहून मुंबईला आले होते. मात्र, ही बैठक होऊ शकली नव्हती. त्यानंतर अजित पवार हे त्यांच्या मुंबईतील देवगिरी बंगल्यावरच होते. मात्र, तरीही अजित पवार सकाळी अमित शाह यांच्यासोबत लालबागच्या राजाच्या दर्शनाला का आले नाहीत, अशी कुजबूज राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार हे महायुतीमधून बाहेर पडतील, अशी चर्चा सुरु आहे. शिंदे गटाच्या नेत्यांकडून अजित पवार यांच्याविरोधात टीका केली जात आहे. अजित पवार यांना महायुतीमधून बाहेर पडायला भाग पाडणे, हा शिंदे गटाचा उद्देश असल्याची चर्चा आहे.



# नाशकात आदिवासी विद्यापीठ स्थापन करणार

## राज्यपाल राधाकृष्णन : जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींशी संवाद

**नाशिक : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांसाठी नाशिक येथे आदिवासी विद्यापीठ सुरू करण्यात येईल. त्यात ८० टक्के आदिवासी, तर २० टक्के अन्य विद्यार्थ्यांचा समावेश राहिल, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले.

राज्यपाल. राधाकृष्णन यांनी काल शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार भास्कर भगरे, आमदार किशोर दराडे, आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार नितीन पवार, आमदार राहुल ढिकले, आमदार हिरामण खोसकर आदी उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, आदिवासी बांधवांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. त्या माध्यमातून विकास कामे सुरू आहेत. या भागातील सामाजिक विकासासाठी विद्यापीठ स्थापन करण्यात येईल. या विद्यापीठात अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान आदी विषयांच्या सर्वोत्तम सुविधा असतील. /-.. ४


# वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ

**मुंबई :**

राज्य सरकारने महाराष्ट्र महावितरण व महापारेषण या कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची घोषणा केली. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्क्याने वाढ केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. तिन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांना १९ टक्के वेतन वाढ मिळणार आहे. या निर्णयाचा लाभ कर्मचारी, अभियंते, अधिकारी आणि सहाय्यक प्रवर्गातील कामगारांना होणार आहे. या कर्मचाऱ्यांच्या मार्च २०२४ पासून ही वाढ लागू होणार आहे. पहिली पगारवाढ सुद्धा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना झाली होती. आरोग्यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेत 'टॉप अप' करून वेगळी योजना तयार करण्याचे आदेश दिले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीला सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष देशमुख उपस्थितीत, धनंजय मुंडे देखील ऑनलाईन उपस्थित होते.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या वीज कंपन्यांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ करण्यात आली आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत देवेंद्र फडणवीसांनी याची माहिती दिली.



# शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनाला

**मुंबई :**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे जावई आणि नातीसोबत लालबागच्या राजाच्या दर्शनाला गेल्यानंतर विरोधी भाजपाकडून टीकेची झोड उठली आहे. आपले जावई सदानंद सुळे आणि नात रेवती सुळे यांच्यासोबत शरद पवार लालबागच्या राजाच्या चरणी लीन होण्यासाठी गेले. यापूर्वी ज्यावेळी शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, त्यावेळी शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी आले होते. त्यानंतर अनेक वर्षांनंतर काल शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनाला दाखल झाले आज सकाळी चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाच्या वतीनं प्रतिष्ठापना करण्यात येणाऱ्या चिंचपोकळीच्या चिंतामणीच्या दर्शनाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी शरद पवारांसोबत त्यांचे जावई सदानंद सुळे आणि नात रेवती सुळे यादेखील उपस्थित होत्या.

### शरद पवारांचा ढोंगीपणा : दरेकर

**मुंबई :**

विधानसभा निवडणूक जवळ आल्याने शरद पवार यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि लालबागचा राजाची आठवण झाली आहे. शरद पवार यांनी लालबागचा राजाचे दर्शन घेणे म्हणजे ढोंगीपणा आहे, असे वक्तव्य भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी केले. मध्यंतरी शरद पवार ४० वर्षांच्या खंडानंतर किल्ले रायगडावर गेले होते. ते मुख्यमंत्री होते तेव्हा लालबागचा राजाच्या दर्शनाला आले होते. त्यानंतर आता ३० वर्षांनी ते पुन्हा लालबागचा राजाच्या दर्शनाला आले. माझी देवाकडे एवढीच प्रार्थना आहे की, शरद पवार यांना हिंदुत्वाबाबत सुबुद्धी मिळो, असे दरेकर यांनी म्हटले. निवडणुकीसाठी नौटंकी का होईना पण लालबागच्या राजाने शरद पवार यांना सुबुद्धी दिली. पण महाराष्ट्राच्या जनतेला ही ढोंगी श्रद्धा दिसून येत आहे, असे खोचक वक्तव्य दरेकर यांनी केले.

# नवीन अहवाल सादर करा


## कोलकाता प्रकरणी सुप्रीम आदेश

**नवी दिल्ली :**

कोलकात्याच्या आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी तपासाबाबत नव्याने स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सीबीआयला दिले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले, सीबीआयने स्टेटस रिपोर्ट दाखल केला आहे. परंतु, याप्रकरणी अद्यापही तपास चालू आहे. आम्ही सीबीआयला नवीन स्टेटस रिपोर्ट दाखल करण्याचे निर्देश देतो.

कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. याप्रकरणी आज सुनावणी पार पडली. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, आम्ही मंगळवारी नवा अहवाल पाहू. सीबीआय तपास करत आहे. त्यामुळे आम्ही सीबीआयला तपासाबाबत मार्गदर्शन करू इच्छित नाही. सीबीआयने स्टेटस रिपोर्ट सादर केल्यानंतर या अनैसर्गिक मृत्यू अहवालाच्या वेळेबाबतही न्यायालयाने स्पष्टीकरण मागितले आहे.

ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी खंडपीठाला सांगितले की, मृत्यू प्रमाणपत्र दुपारी १.४७ वाजता जारी करण्यात आले, तर पोलिसांनी २.५५ वाजता अनैसर्गिक मृत्यूची नोंद केली., तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी पलटवार करताना सांगितले की, रेकॉर्डनुसार हा अहवाल रात्री ११.३० वाजता दाखल करण्यात आला होता. तसंच, या प्रकरणाचा निषेध करण्याकरता पुकारलेल्या आंदोलनामुळे २३ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहितीही कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात दिली.



# मणिपुरात राज्यपालांच्या घरावर दगडफेक

## २० जण जखमी, सुरक्षा जवान जीव वाचवून पळाले

**नवी दिल्ली :**

मणिपूरमध्ये राज्यपाल आणि डीजीपी यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या निदर्शनाला सोमवारी हिंसक वळण लागले. शेकडो विद्यार्थ्यांनी राजभवनाच्या मुख्य दरवाजावर दगडफेक केली. यावेळी उपस्थित सुरक्षा कर्मचारी जीव वाचवण्यासाठी तेथून पळ काढला. या हल्ल्यात २० जण जखमी झाले आहेत.

राज्यातील वाढत्या हिंसक घटना आणि ढासळणारी कायदा व सुव्यवस्था यामुळे विद्यार्थी ८ सप्टेंबरपासून रस्त्यावर उतरले आहेत. रविवारी किशमपत येथील तिद्दीम रोडवर ३ किलोमीटर कूच केल्यानंतर आंदोलक राजभवन आणि सीएम हाऊसवर पोहोचले.

पोलिस आणि सुरक्षा दलांनी बॅरिकेड्स लावून त्यांना रोखले. अश्रुधुराच्या अनेक नळकांड्याही डागण्यात आल्या. आंदोलक रस्त्यावर बसून घोषणाबाजी करू लागले. ते म्हणाले- सरकार आणि पोलिस ड्रोन हल्ले रोखण्यात अपयशी ठरले आहेत. राज्यपालांव्यतिरिक्त, आंदोलक डीजीपी, सुरक्षा सल्लागार आणि ५० आमदारांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत.

मणिपूरमध्ये मे २०२३ पासून कुकी आणि मेईतेई समुदायांमधील हिंसाचार सुरू आहे. गेल्या ७ दिवसात हिंसाचार वाढला आहे. यामध्ये ८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १५ हून अधिक जखमी झाले आहेत. अलीकडे मणिपूरमध्येही ड्रोन हल्ले झाले आहेत. यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

### राज्य सरकारचे अधिकार वाढवण्याची मागणी

सीएम बिरेन सिंह यांनी राज्यपाल लक्ष्मण आचार्य यांना ८ कलमी मागण्यांची यादी सादर केली आहे. यामध्ये राज्य सरकारला राज्यघटनेनुसार अधिकार आणि जबाबदाऱ्या देण्याचे म्हटले आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांनी कुकी अतिरेक्यांसोबत केलेला सस्पेंशन ऑफ ऑपरेशन्स करार रद्द करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून सुरक्षा दले कुकी अतिरेक्यांवर पूर्ण ताकदीने कारवाई करू शकतील. याशिवाय नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्सची प्रक्रिया सुरू करून सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांना बाहेर काढण्याचीही चर्चा झाली आहे.

# आरक्षण दिले नाही तर फडणवीस यांना राजकारणात लोळवणार

## मनोज जरांगे पाटील यांचा इशारा

**बीड :**

देवेंद्र फडणवीस यांनी फक्त सगेसोयऱ्यांची मागणी मान्य करावी आणि मराठ्यांना आरक्षण द्यावे मी त्यापुढे राजकारणावर एक शब्दही बोलणार नाही. फडणवीसांनी आपल्याविरोधात मराठा आमदार उभे केलेत, त्यांनी जर आरक्षण दिले नाही तर त्यांना राजकारणात लोळवल्याशिवाय मराठा समाज मागे हटणार नाही, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. बीडमध्ये झालेल्या घोंगडी बैठकीमध्ये मनोज जरांगे यांनी हे वक्तव्य केलं.

देवेंद्र फडणवीसांवर टीका करताना मनोज जरांगे म्हणाले की, तुम्हाला गरिबांची मुले मोठी व्हावेत असे का वाटत नाही? या सरकारमधील मंत्र्यांना गरिबांची पोरे मोठी होऊ नयेत असे का वाटते? तुम्हाला फक्त तुमचा पक्ष आणि नेते मोठे करायचे आहेत. मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या विरोधात उभे केले. कुठे केसेस करत आहे, कुठे मराठ्यांचे आमदार विरोधात उभे करता. फडणवीस साहेब तुम्हाला लोळवल्याशिवाय आता मराठा समाज मागे हटत नाही. जर तुम्ही आरक्षण दिले नाही तर आम्हाला सत्ता काबीज करावी लागणार. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी वाटेल ते करेन. असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

तुम्ही ज्या पक्षात काम करत आहे त्या पक्षाचे नेते आम्हाला का आरक्षण देत नाहीत? असा सवाल आता भाजपमधल्या पुढाऱ्यांना त्यांची लेकरे विचारतील असे जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, तुमच्या लेकरांवरील अन्याय कायम डोळ्यासमोर ठेवा. माझ्या विरोधामध्ये भरपूरजण उभे केले




आहेत. आठवड्यालाच आमदार बदलतात. बैल बदलले जात आहेत. गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असे सांगत मनोज जरांगे म्हणाले की, हे तीन महिने मराठ्यांचे अस्मितेचे आहेत भविष्याचे आहेत. लढाई माणूस केवळ बेसावध राहिल्यामुळे हरतो. उद्यापासून गावागावात २० पोरांची टीम तयार करा. ज्या गावात अशा टीम तयार होतील त्याच गावात घोंगडी बैठका होतील. आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही.

## महत्त्वाचे

### येवल्यात शिवसेना शिंदे गटाची कार्यकारिणी जाहीर



**येवला : प्रतिनिधी**

शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने व खासदार श्रीकांत शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, प्रवक्ते संजय निरुपम,आमदार किशोर दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत येवला शहरात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येवुन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली येवला उपतालुका प्रमुख गणेश सोनवणे, उपशहरप्रमुख अमोल पारखे, स्वामी शिंदे, तसेच जनार्दन आहेर,मुखेड गटप्रमुख, विजय आहेर,मुखेड शहर प्रमुख शाहू देवरे,चिचोंडी गणप्रमुख, बिपिन लासुरे, विभाग प्रमुख पदी तर येवला शहर युवा सेना ज्ञानेश्वर चव्हाण तालुकाप्रमुख,प्रदीप राऊत (पुणेकर) शहर प्रमुख, आदीची तसेच महिला आघाडी कार्यकारणी अर्चना शिंदे,उ पजिल्हाप्रमुख,सुनिता लहरे, शहर प्रमुख, तेजश्री लासुरे, तालुका समन्वयक, दिपाली नागपुरे, शहर समन्वयक, उपशहर प्रमुख - सविता कचरे,बबीता कोल्हे,कविता गोसावी, विभाग प्रमुख - नीता भागवत, रेखा पुरे,वैशाली कवडे, सोनाली पैंजणे, पूनम वडे, युवती सेना शहरप्रमुख, अनिता आहेर मुखेड गटप्रमुख आदीची निवड करण्यात आली यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख श्रद्धा कुलकर्णी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल सोनवणे, विधानसभा प्रमुख किशोर सोनवणे, तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके, शहर प्रमुख अतुल घटे यांच्या उपस्थितीत निवड झाली.

### अभोण्यात ईद ए मिलादची दि.१८ रोजी मिरवणूक निघणार



**अभोणा : प्रतिनिधी**

अभोणा येथ मंगळवार ( दि.१७ ) रोजी अनंत चतुर्दशीला श्री गणेश विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशी बुधवार ( दि.१८ ) रोजी ईद ए मिलाद निमित्त मिरवणुक काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजातर्फे घेण्यात आला आहे. शांतता समितीची बैठक अभोणा पोलीस ठाण्यात झाली, त्यावेळी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. पोलीस खात्यातर्फे सहाय्यक पोलिस निरीक्षक यशवंत शिंदे यांनी मार्गदर्शनातून केलेल्या आवाहनास मुस्लिम समाज बांधवांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. दरम्यान, सोमवार ( दि.१६ ) रोजी ईद ए मिलाद निमित्त गावात निघणारी मिरवणुक रद्द करण्यात आली असून ती मंगळवार ( दि.१७ ) रोजी अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशी बुधवार ( दि.१८ ) रोजी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाज बांधवांनी घेतला आहे. या निर्णयाचे अभोणा पोलिस व परिसरातील नागरिकांनी स्वागत केले आहे. बैठकीस पोलिस उपनिरीक्षक नवनाथ रसाळ, इक्बाल कासम शेख, शेखर जोशी, देवा मुसळे, सोमनाथ सोनवणे आदी उपस्थित होते.

### शरद पवार सर्वांना सोबत घेऊन काम करतात : हिवाळे



**येवला : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार राज्यातील सर्व जातीधर्माच्या लोकांना बरोबर घेऊन आपले काम करीत आहेत असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गटाचे ओबीसी सेलचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष के. पी. हिवाळे यांनी येवला येथे पत्रकार परिषदेत बोलताना केले. येवला तालुक्याच्या दौऱ्यावर हिवाळे आले होते. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते ॲड. माणिकराव शिंदे यांच्या रायगड या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत हिवाळे बोलत होते पुढे पत्रकारांशी वार्तालाप करताना हिवाळे म्हणाले की, फुले, शाहु, आंबेडकर, यांचे विचार घेवुन आपण दौ-याला सुरूवात केली आहे शरदचंद्र पवार यांचे कार्य लोकां पर्यंत पोहोचविण्यासाठी आपण काम करीत आहेत यासाठी येवला तालुक्यातील काही गांवाना भेटी दिल्या आहेत पवार यांच्या बद्दल जनतेच्या मनात आदराची भावना असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनता पवार यांच्याबरोबर राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करीत राज्यात मागील काळात शरदचंद्र पवार यांचे सरकार असताना ७२ हजार कोटी रूपयाचे शेतकऱ्यांचे कर्ज पवार यांनी माफ केले होते नेहमीच पवार यांनी शेतक-यांचे हित बघुन त्यांना न्याय मिळवून दिला आहे. हिवाळे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. सत्तेत असणारे मंत्री भुजबळ वीस वर्षात तालुक्याचा पाण्याचा प्रश्न सोडवू शकले नाही, बारमाही पाणी देऊ शकले नाही. मतदार संघाचा म्हणावा असा विकास झाला नाही असा सवाल उपस्थित केला. महाविकास आघाडीत येवला मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसलाच (शरदचंद्र पवार) मिळेल असा दावा त्यांनी केला. आमच्याकडे ॲड. माणिकराव शिंदे सक्षम उमेदवार असल्याचेही हिवाळे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला प्रदेश उपाध्यक्ष ॲड. माणिकराव शिंदे, युवक प्रदेश उपाध्यक्ष शाहू शिंदे, तालुकाध्यक्ष विठ्ठलराव शेलार, विधानसभा अध्यक्ष सुभाष निकम, येवला शहराध्यक्ष योगेश सोनवणे, ओबीसी तालुका अध्यक्ष नारायण मोरे, ओबीसी सेलचे शहर अध्यक्ष पंकज माळी, संजय मिस्तरी, अनिल शिंदे, सुरेश कदम, राजेंद्र हिरे, अन्सार शेख, वाल्मीक सोपे, बाळासाहेब पठारे, अकबर शहा, निसार शेख, साईनाथ मढवई आदी उपस्थित होते.

# मी बोलण्यापेक्षा माझे काम अधिक बोलतं : ना. भुजबळ

## येवला विधानसभा मतदारसंघात विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण सोहळा

**लासलगाव : वार्ताहर**
**येवला विधानसभा मतदारसंघात हजारो कोटी रुपयांची विकासकामे आपण केली आहे. ही विकासकामे करतांना कुठल्याही समाजावर अन्याय आपण होऊ दिला नाही. तसेच विकासाच्या या कामांमध्ये मी अधिक बोलण्यापेक्षा माझे कामे अधिक बोलतात असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.**



लासलगाव : निमगाव वाकडा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यात बोलताना मंत्री छगन भुजबळ. समवेत व्यासपीठावर उपस्थित मान्यवर. (छाया : समीर पठाण)

**या विकासकामांचे झाले भूमिपूजन व लोकार्पण**

निमगाव येथे प्रादेशिक पर्यटन योजनेतील श्री.रेणुकामाता मंदिर परिसरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन २ कोटी ९५ लाख, * डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतील संविधान सभागृहाचे भूमिपूजन २० लाख * तलाठी कार्यालय–निवासस्थान बांधकाम भूमिपूजन – ३० लाख * पाटोदा येथे मंडळ अधिकारी कार्यालय व निवास बांधकाम लोकार्पण – ३५ लाख * कामगार तलाठी कार्यालय व निवासस्थान लोकार्पण – ३२ लाख * तीर्थविकास योजनेअंतर्गत भक्त निवास लोकार्पण – १२ लक्ष लाख * पाटोदा गांव अंतर्गत अल्पसंख्याक निधीमधून रस्ता कॉंक्रीटीकरण करणे – १२ लाख * देहेगांव पाटोदा येथे मारुती मंदिरासमोर मुलभूत सुविधा योजने अंतर्गत सभामंडप बांधणे– १२.७२ लाख * २५१५ निधी मधून रस्ता कॉंक्रीटीकरण लोकार्पण – १२ लाख * नागरी सुविधा योजने अंतर्गत पाटोदा गाव अंतर्गत २ रस्ते लोकार्पण २० लाख * देहेगांव पाटोदा गाव अंतर्गत नागरी सुविधा योजनेअंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण लोकार्पण – १० लाख * १५ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत स्मशानभूमी बांधकाम लोकार्पण – १० लाख *१५ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण लोकार्पण – १० लाख * मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते आदिवासी बांधवांना रेशनकार्डचे वाटप.

मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते निमगाव वाकडा व पाटोदा येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंढरीनाथ थोरे,राधाकिसन सोनवणे, शेखर होळकर, मच्छिंद्र थोरात, भगवान ठोंबरे, अण्णा पाटील दौंडे, डॉ. प्रवीण बुल्हे, संजय पगार, रमेश बोरनारे, सरपंच सविता बोराडे, दत्तूपंत रवी गायकर, बाळासाहेब पिंपरकर, योगेश बोराडे, सुनील पैठणकर, दिपक गायकवाड, अशोक मेंगाने, संतोष दौंडे, प्रताप पाचपुते, रियाझ मुलाणी, विंचूर खेडलेझुंगे रस्त्यासाठी १३४ कोटी, लोनगंगा शिवनदीचे सुशोभिकरण करण्यासाठी प्रत्येकी १३ कोटी ५० लाख, येवला शिवसृष्टी आपण काम केली आहे. विकासाच्या या कामांबाबत आपल्याला अधिक बोलण्याचे काम नाही. विरोधक मात्र टीका करण्याचे काम करतात. मात्र या मतदारसंघात आपली विकास कामेच सर्व बोलतात आपल्याला बोलण्याचे कामच नाही अशी टीका त्यांनी केली.

गेली सतरा वर्ष विशेष प्रयत्न करून मांजरपाडा प्रकल्प पूर्ण केला आहे. गुजरातकडे वाहून जाणारे पाणी बोगद्याद्वारे वळण बंधाऱ्यांच्या माध्यमातून वळवून आपण ते डोंगरगावपर्यंत आणले आहे. यापुढील काळात अधिक बंधारे वाढवून अधिक पाणी येवल्यात कसे आणता येईल यासाठी लवकरच बैठक घेऊन काम सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महायुती सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी येवला मतदारसंघातील ९३ हजार महिलांना लाभ मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले.

पालखेड डावा कालव्याच्या माध्यमातून पाटोदा परिसरातील सर्व बंधारे भरून देण्याचे आदेश सबंधित अधिकाऱ्यांना दिले असून लवकरच हे बंधारे भरले जाऊन पाण्यावाचून कुणीही वंचित राहणार नाही असे त्यांनी स्पष्ट केली.



इगतपुरी : सेंट्रल रेल्वेच्या नवीन जीआर विरोधात धरणे आंदोलन करतांना सेंट्रल रेल्वेचे मजदूर युनियनचे पदाधिकारी. ( छाया : ओंकार गवांदे)

## सेंट्रल रेल्वेच्या नव्या जीआर विरोधात रेल्वे मजदूर युनियनचे आंदोलन

**इगतपुरी : प्रतिनिधी**
**सेंट्रल रेल्वेने कामगारांच्या हिता विरोधात नवीन जी आर आणल्यामुळे रेल्वे कर्मचारी संतप्त झाले आहेत. या नवीन युपीएस कायद्यामुळे कामगारांसह त्यांच्या कुटुंबाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. सेंट्रल रेल्वेच्या या नव्या धोरणा विरोधात सेंट्रल रेल्वे मजदूर युनियनचे सचिव अतुल तानाजी गोईकणे यांच्या नेतृत्वाखाली इगतपुरीतील रेल्वेचे सहाय्यक मंडल इंजिनियर यांच्या कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले.**

यावेळी सहाय्यक मंडल इंजिनियर रामप्रसाद यादव यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. जुनीच पेंशन योजना लागु असावी या मागणीसाठी सेंट्रल रेल्वे मजदुर संघाच्या वतीने दिनांक ९ सप्टेंबर रोजी विरोधात अध्यक्ष डॉ प्रवीण वाजपेयी यांच्या आदेशाने सहाय्यक मंडलच्या ऑफिसवर भव्य निदर्शने आंदोलन धरणे प्रदर्शन करण्यात आले.यावेळी सरकार विरोधात घोषणाबाजी करण्यात येऊन आम्हाला, नकोय आम्ही घेऊनच राहू हा आमचा दृढ संकल्प आहे. भारत सरकारने रेल्वे कर्मचाऱ्यांबरोबर मोठा छळ केला असून सेंट्रल रेल्वे मजदूर संघासाठी संघर्ष करत राहील. सरकारला या महत्त्वपूर्ण मुद्यावर लक्ष केंद्रित करून ही मागणी पूर्ण करण्याचे काम सरकारचे आहे.

सेंट्रल रेल्वे मजदुर संघ ही कामगारांच्या हितासाठी लढणारी एकमेव संघटना असल्याचे यावेळी अतुल गोईकणे यांनी सांगितले. या आंदोलनात सेंट्रल रेल्वे मजदूर युनियनचे मुंबई डिव्हीजनचे अध्यक्ष शांताराम गांगुर्डे, इगतपुरी शाखा अध्यक्ष एस. के. ठाकुर , सचिव अतुल गोईकणे, उपाध्यक्ष मनोज पवार, भागीरथ मिना, संतोष कुमार, सुनिल साळुंके, वसंत सेन, गौतम शिंदे, राहुल जाधव, रोहित पांडे, बबन कडू, तुपेस चव्हाण आदी सहभागी झाले होते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक नामकरण करण्यासाठी आंदोलन सुरू

**मनमाड : प्रतिनिधी**
**मनमाड शहरातून जाणाऱ्या इंदूर पुणे महामार्गावर असलेल्या पाकीजा कॉर्नर या ठिकाणी मनमाड नगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज मार्केट आहे या चौकाला देखील त्यावेळी हेच नाव देण्यात आले होते मात्र पालिकेने आता पुन्हा ठराव करून या ठिकाणी अहिंसा चौक तयार करण्याचे काम सुरू केले आहे.**




या कामाला मनमाड शहर भीमसैनिकांचे वतीने विरोध करण्यात आला असून या चौकाला पूर्वीचे असलेले राजश्री छत्रपती शाहू महाराज चौक असे नाव द्यावे या ठिकाणी त्याचा फलक लावा या मागणीसाठी करणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे या धरणे आंदोलनाचा आता दुसरा दिवस आहे

मनमाड शहर राष्ट्रीय एकात्मता जोपासणारे शहर म्हणून ओळखले जाते या शहराच्या इतिहासात आजपर्यंत दोन समाजात कधीही जातीय दंगल घडलेली नाही देशात किंवा राज्यात कितीही जातीय दंगली झाल्या तरी मनमाड शहरात त्याचे कधीच पडसाद उमटलेले नाही मात्र काही राजकीय मंडळींच्या चुकीच्या निर्णयामुळे शहरात भविष्यात दोन समाजात तेढ निर्माण होण्याचे काम सुरू आहे शहरातून जाणाऱ्या इंदूर पुणे महामार्गावर पाकीजा कॉर्नर या ठिकाणी माझ्याशी छत्रपती शाहू महाराज मार्केट आहे या चौकाला राजश्री छत्रपती शाहू महाराज व भारतीय खाद्य निगम कडे जाणाऱ्या रस्त्याला शहीद अब्दुल हमीद मार्ग असे नाव असताना पालिकेच्या वतीने येथे पुन्हा ठराव करून अहिंसा चौक तयार करण्याची काम सुरू केले आहे. या कामाला आमचा विरोध नाही मात्र आधी दिलेले नाव रद्द करून काही लोकांना खुश करण्यासाठी दुसरे नाव देण्याचा घाट पालिकेच्या वतीने रचला आहे याला बहुजन समाजातून तीव्र स्वरूपात विरोध होत असून गेल्या दोन दिवसापासून या ठिकाणी भीमसैनिकांच्या वतीने धरणे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष असून पोलीस प्रशासन देखील याकडे दुर्लक्ष करत आहे मात्र जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आम्ही धरणे आंदोलन सुरू ठेवू, होणाऱ्या परिणामास पालिका प्रशासन जबाबदार असेल असे बसपा विधानसभा अध्यक्ष प्रवीण पगारे म्हणाले.

## देमको चॅरिटेबल ट्रस्टच्या प्रस्तावाला वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजुरी

**देवळा : प्रतिनिधी**
**कर्जवसुली साठी राजकिय, प्रशासकीय दबावाला बळी न पडता देमको बँकेच्या प्रगतीसाठी संचालक मंडळाने कर्ज वसुलीचे कामअतिशय तन्मयतेने केले असून,जुनी प्रकरणे निकाली काढत गेल्या दोन वर्षात ठेवींमध्ये तसेच कर्ज वाटपात देखील वाढ झाल्याने ही वार्षिक सर्वसाधारण सभा प्रगतीची असल्याची ग्वाही व्हा. चेअरमन डॉ. प्रशांत निकम यांनी दिली. यापुढेही कर्जवसुलीसाठी तसेच इतर धोरण निश्चित करताना कडक धोरण स्वीकारले जाईल असेही त्यांनी सांगितले.**



देमको बँकेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन कोमल कोठावदे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरण संपन्न झाली. यावेळी माजी चेअरमन डॉ विश्राम निकम, दिलीप मेतकर, नितीन शेवाळकर, के. एस. बच्छाव, सुनील आहेर, पवन अहिरराव, सुधाकर मेतकर, धनंजय आहेर, विनोद शिंदे, एल. एन. शिरसाट, बाळासाहेब भांगडिया, शांताराम निकम यांनी चर्चेत सहभाग घेतला. अहवाल वाचन बँकेचे व्यवस्थापक नितीन बोरसे यांनी केले. योगेश वाघमारे, संचालक अनिल धामणे, केदारनाथ मेतकर, भगवान बागड, प्रमोद शेवाळकर, योगेश राणे, हेमंत अहिरराव, मयूर मेतकर, अमोल सोनवणे, सुभाष चंदन, मनीषा शीनकर, नलिनी मेतकर, भारत कोठावदे, अँड चैतन्य वडनेरे, प्रशांत मुसळे उपस्थित होते.

## दिंडोरी पेठ विधानसभा मतदार संघात नवीन मतदान केंद्रांना मंजुरी

**दिंडोरी : प्रतिनिधी )**
**दिंडोरी - पेठ तालुक्यात मतदार यादीचे विशेष पुनरिक्षण कामकाज २०२४ अंतर्गत नव्याने प्रस्तावित मतदार यादी भागांना भारत निवडणूक आयोग यांच्याकडून मंजुरी मिळाल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांत अधिकारी आप्पासाहेब शिंदे यांनी दिली.**

मतदारयाद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (दुसरा) २०२४ घोषित केला आहे. यांतर्गत मतदान केंद्राच्या स्थानात बदल, २ कि.मी. पेक्षा जास्त मतदान केंद्र आणि १४०० व १५०० पेक्षा जास्त मतदार संख्या असलेले मतदान केंद्र यामध्ये बदल करण्याबाबत निर्देशित केले होते. त्याअनुषंगाने मतदान केंद्राच्या स्थानात बदल व १५०० पेक्षा जास्त मतदार असलेले मतदान यादी निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आले होते. त्यानुसार एकूण २३ प्रस्तावांना मान्यता मिळाली आहे.

## वृद्धांना न सांभाळणाऱ्या कुटुंबाना शासकीय योजनांचा लाभ न देण्याचा ठराव

**ननाशी : वार्ताहर**
**वृद्धापकाळात आई-वडिलांना सांभाळले जात नसल्याचे प्रकार वाढू लागले असून हा एक सामाजिक प्रश्न निर्माण होत असताना दिंडोरी तालुक्यातील धोंडाळपाडा ग्रामपंचायतने वृद्धांचा सांभाळ न करणाऱ्या कुटुंबाला शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ न देण्याचा ठराव केला आहे.**



नुकतीच ग्रुप ग्रामपंचायत धोंडाळपाडा येथे ग्रामसभा घेण्यात आली. या सभेमध्ये पोलिस पाटील, सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामस्थ, ग्रामसेवक उपस्थित होते.

त्या ग्रामसभेमध्ये असा ठराव करण्यात आला की, ज्या मुलांनी वृद्धापकाळात आई वडील यांचा सांभाळ न केल्यास त्यांना ग्रामपंचायतीची कुठलीही सुविधा देण्यात येणार नाही.असा ठराव करण्यात आला. या ठरावाला ग्रामस्थांनी एकमुखी अनुमोदन देत सर्वानुमते ठराव मंजूर केला आहे. या निर्णयाचे परिसरात स्वागत करण्यात येत आहे,

> आई –वडील मुलांना जन्म देत काबाड कष्ट करत त्यांचे पालनपोषण करतात त्यांच्या सुखासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात मात्र वृद्धापकाळात काही मुले आपल्या पालकांना सांभाळत नाही हे दुर्दैवी आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी असे कुणी बेपरवाही करत वृद्धांना न सांभाळनाऱ्यांना शासकीय योजनेचा लाभ न देण्याचा एकमुखी निर्णय घेतला.
>
> – **विजय गायकवाड,** धोंडाळपाडा, नागरिक

> आज बहुतेक ठिकाणी काही पाल्य आपल्या वयोवृद्ध पालकांचा उतारवयात सांभाळ करत नाहीत.त्यामुळे आयुष्याच्या शेवटच्या दिवसात वयोवृद्ध आई –वडिलांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. आपल्या गावात असा प्रकार घडू नये आणि म्हातारपणी गावातील कुठल्याही वयोवृद्ध व्यक्तीची गैरसोय होऊ नये यासाठी हा ठराव केला असून या ठरवाला ग्रामस्थांनी एकमुखी अनुमोदन दिले.
>
> – **लता गायकवाड,** सरपंच, धोंडाळपाडा

## इंडक्शन प्रोग्रॅम'मध्ये २३५ विद्यार्थ्यांचा सहभाग

### मविप्रच्या 'सीएमसीएस' महाविद्यालयात उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**
**मविप्र समाजाच्या 'सीएमसीएस' महाविद्यालयात आयोजित 'इंडक्शन प्रोग्रॅम'मध्ये २३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. याप्रसंगी प्राचार्य. डॉ. वसंत बोरस्ते, डॉ. मधुकर शेलार, समन्वयक डॉ. रुपाली कोतवाल, आयक्युएसी समन्वयक प्रा. अमित मोगल उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ. आबासाहेब मोरे यांनी विद्यार्थ्यांना 'योग आणि ध्यान' यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य. डॉ. वसंत बोरस्ते यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' नुसार विद्यार्थ्यांना भविष्यात असणाऱ्या संधी याविषयी मार्गदर्शन केले.**



नाशिक : मविप्र समाजाच्या 'सीएमसीएस' महाविद्यालयात आयोजित 'इंडक्शन प्रोग्रॅम'मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. वसंत बोरस्ते. व्यासपीठावर मान्यवर व प्राध्यापकवृंद.

कार्यक्रमात प्रथम वर्ष वाणिज्य, विज्ञान आणि संगणकशास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांना डॉ. मधुकर शेलार यांनी 'नैतिक मूल्य आणि आचारसंहिता' प्रा. अमित मोगल यांनी 'राष्ट्र उभारणीमध्ये तरुणांची भूमिका' या विषयी विचार व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. उदय चौधरी यांनी 'राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील इतिहास', विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सागर चित्ते यांनी 'कमवा व शिका' योजनेबद्दल माहिती दिली. डॉ. ज्ञानेश्वर गडाख यांनी 'विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धा'. प्रा. शीतल कारे यांनी 'माझे जीवन, माझी जबाबदारी' विषयावर मनोगत व्यक्त केले. प्रा.रुपाली वाघ यांनी 'संवाद कौशल्य' या विषयावर सादरीकरण केले. माजी उपप्राचार्य डॉ. डी. आर. पताडे यांनी वाणिज्य व व्यवस्थापनामधील 'व्यावसायिक संधी' विषयी मार्गदर्शन केले. प्रा. मनीषा सावंत यांनी परीक्षा विभाग, ग्रंथालय व संपूर्ण महाविद्यालयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघातर्फे चेतन जाधव या विद्यार्थ्याने 'सक्सेस स्टोरी' या विषयावरील माहितीपटाचे सादरीकरण केले.

प्रा. पूनम पाटील यांनी सूत्रसंचालन, प्रा. शितल कारे यांनी आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

महत्त्वाचे

## स्पर्धकास पाठिंबा देण्यासाठी केबीसीमध्ये नावा परिवार



**इंदिरानगर : वार्ताहर**
महानायक अमिताभ बच्चन यांच्या सदाबहारदार सूत्रसंचालनाने गाजलेल्या कोण बनेगा करोडपती या कार्यक्रमात मंगळवार, १० रोजी रात्री ९ वाजता सोनी वाहिनीवरील प्रक्षेपित होणाऱ्या भागात धाराशिव येथील शेतकरी स्पर्धक जयंत मोरे सहभागी होणार आहेत. त्यांना स्फूर्ती व पाठिंबा देण्यासाठी नावा परिवार पाहुणे प्रेक्षकगृहात दिसणार आहे. नावा परिवारातील तेरा सदस्यांनी 'बिग बी' अमिताभ बच्च या नावाच्या प्रत्येक अक्षराचे टी-शर्ट परिधान केले आहे. असे टी शर्ट परिधान करून प्रेक्षागृहात उपस्थित झाल्याने अमिताभ बच्चन यांच्यासह उपस्थित सर्वांचेच लक्ष वेधुन घेतले होते. नावा परिवारातील दिनेश गांधी, इसाक शेख, प्रवीण चांडक, दिलीप निकम, महेश सोनवणे, अभिजित देवरे, गणेश नाफडे, शैलेश दगडे, विशाल पवार, दीपक जगताप, सचिन गीते, रवी पवार, विठ्ठल राजोळे सहभागी झाले आहेत.

## नवीन कसारा घाटात बर्निंग ट्रकचा थरार



**इगतपुरी : प्रतिनिधी**
नाशिक-मुंबई महामार्गावरील नवीन कसारा घाटात सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास कोंबड खत घेऊन जाणाऱ्या १४ टायर ट्रकने दोन कारला जोरदार धडक दिली. मात्र धडक दिल्यानंतर या ट्रकने अचानक पेट घेतला. या अपघातात कारमधील एक जण जखमी झाला तर ट्रक चालकाने प्रसंगावधान राखत चालत्या ट्रकमधून उडी मारल्याने तो थोडक्यात बचावला. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग सुरक्षा पोलीस केंद्र घोटी, कसारा पोलीस, कसारा येथील आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य, रूट पेट्रोलिंग टीम, इगतपुरी नगरपरिषद अग्निशमन दल, महिंद्रा अँड महिंद्रा अग्निशमन दल आणि टोलनाक्याच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य सुरू केल्यानंतर एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. जखमी व्यक्तीला कसारा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे काही काळासाठी वाहतूक जुन्या कसारा घाटातून वळवण्यात आली होती.

## डॉ. अजित बागमार यांना राष्ट्रीय मदर तेरेसा पुरस्कार

**नाशिक :** आंतरराष्ट्रीय न्युटीशन व ॲक्युप्रेशर तज्ज्ञ



डॉ. अजित बागमार यांना मदर तेरेसा राष्ट्रीय पुरस्कार शांती फाऊंडेशनचे अध्यक्षा पिंकी देवी यांनी जाहीर केला आहे. हा पुरस्कार २८ सप्टेंबर रोजी हॉटेल कांतारा, लोणावळा, पुणे येथे देण्यात येणार आहे. अजित बागमार यांनी महाराष्ट्र ज्ञानदीप मंडळातर्फे १००१ सामुदायिक विवाहाचे आयोजन केले होते. डॉ. अजित बागमार हे अ.भा. मारवाडी गुजराथी मंचचे अध्यक्ष असून नाशिक जिल्हा बुध्दीबळ संघटना, यंग ग्रुप ऑफ नाशिक, महाराष्ट्र सांस्कृतिक अभियान महाराष्ट्र ॲक्युप्रेशर व न्युट्रीशनचे अध्यक्ष, विविध सामाजिक संस्थेत कार्यरत आहेत. अजित बागमार यांना राष्ट्रीय मदर तेसेसा सेवा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप, आ.सिमा हिरे, ॲड. नितीन ठाकरे, गजानन शेलार, आकाश छाजेड, चांदमल भंसाळी, सुधाकर बडगुजर, गणपत कोठारी, कमलेश लुणावत, विकास कांकरीया, चेतन बागमार, सुरेश पिचा, मुकेश चोरडिया, डॉ. प्रदीप साखरे, प्रवीण तिगमे, अजय बोरस्ते, प्रशांत आव्हाड, विमल मोदी, पवन पवार, हेमराज खाबीया, रमेश निमाणी, सुरेश खटोड, डॉ. मनोज चोपडा, सुभाष घिया, रुपचंद बागमार आदिंनी अभिनंदन केले.

# जायकवाडी पाण्यासंदर्भातील याचिकेवर न्यायालयाचा निर्णय

## अभ्यास गटाला शासनाने एक महिन्याची मुदत देण्याचे निर्देश

**नाशिक : प्रतिनिधी**
**जायकवाडी संदर्भात उच्च न्यायालयात आ. देवयानी फरांदे यांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावनीत नाशिक व अहमदनगर भागातील लाभधारकांना न्यायालयाने दिलासा दिला आहे.**



शासनाने अभ्यास गटास एक महिन्याची मुदतवाढ द्यावी, अभ्यास गटाने आपला अहवाल एक महिन्याचे आंत तयार करुन तो महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांना त्यानंतर पुढील पंधरवाड्यात सादर करावा, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी सदर अहवालावर सामान्य नागरिकांकडून १५ दिवसांची मुदत देऊन सूचना, हरकती मागवाव्यात. सदर सूचना, हरकतींबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी योग्य ते निराकरण करुन सदरचा अहवाल आपल्या शिफारशींसह शासनास एक महिन्याचे आंत सादर करावा.शासनाने सदर अहवालावर योग्य तो निर्णय अहवाल प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ४ आठवड्यात घ्यावा असे आदेश उच्च न्यायालयाने सदर सुनावणीदरम्यान दिले आहे. पुढील सुनावणी २१ ऑक्टोंबर रोजी होणार आहे. नाशिक मध्य मतदार संघातील आमदार देवयानी फरांदे यांनी जायकवाडीच्या वरील भागातील नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील दारणा, गंगापूर, पालखेड, मुळा, प्रवरा या समूहातून धरणांमधून जायकवाडी जलाशयासाठी पाणी न सोडण्यासंदर्भात उच्च न्यायालयात २ नोव्हेंबर २०२३ मध्ये जनहित याचिका दाखल केली होती.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील याचिका क्र. १/२०१४ निकाल दि. १९ सप्टेंबर२०१४, मा. उच्च न्यायालय, मुंबई कडील जनहित याचिका क्र. १७३/२०१३ निकाल दि. २३ सप्टेंबर २०१६ मधील आदेशांचे अनुषंगाने गोदावरी अभ्यास गटाचे पुनर्विलोकन दर ५ वर्षांनी होणे गरजेचे आहे. गोदावरी अभ्यास गटाचा अहवाल शासनास ऑगष्ट २०१३ मध्ये सादर केला होता . त्या अहवालाचे पुनर्विलोकन सन २०१८ मध्ये करणे गरजेचे होते. तथापि, अभ्यास गट अहवालाचे अद्यापपर्यंत पुनर्विलोकन न करता कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांनी दि.



३० ऑक्टोंबर २०२३ रोजी नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील धरणांमधुन जायकवाडीसाठी सुमारे ८.६०३ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश पारित केले आहे. देवयानी फरांदे यांनी याबाबत दाद मागण्यासाठी उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आतापर्यंत ६ सुनावण्या झाल्या आहेत. उच्च न्यायालयाचे देवेंद्रकुमार उपाध्याय, मुख्य न्यायाधीश अमित बोरकर यांच्या खंडपीठाने दि. ३ सप्टेंबर रोजीच्या सुनावणीत जलसंपदा विभागाचे उपसचिव महेंद्र वानखेडे यांनी उच्च न्यायालयास सादर केले.

जायकवाडी जलाशयास सन २०१५ पासून मागील ९ वर्षात वरील भागातील नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील दारणा, गंगापूर, पालखेड, मुळा, प्रवरा या समुहातून ३ वेळेस पाणी सोडावे लागले आहे. आमदार देवयानी फरांदे यांनी सन २०१५ पासून या भागातील पालखेड,,दारणा, गंगापूर या जलाशयांमधून पाणी सोडण्यास शासन, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, तसेच उच्च न्यायालयाकडेही वेळोवेळी याचिका दाखल करुन विरोध दर्शविला होता. जलसंपदा कार्यालयासमोर आंदोलन करुन नाशिक व अहमदनगर भागातील शेतकरी, लाभधारकांवर होत असलेल्या अन्यायाबाबत आपली भूमिका मांडली आहे. या दरम्यान त्यांच्या पाठपुराव्यास यश येऊन शासनास सन २०१८ मध्ये गंगापूर व पालखेड जलाशयामधून पाणी न सोडण्याबाबत निर्णय घ्यावा लागला होता. त्यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे उच्च न्यायालयाने, अभ्यास गट, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, व शासनास कालमर्यादा देऊन सदर प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात आदेश दिले आहेत. याबाबत आमदार देवयानी फरांदे यांचे विविध स्तरावरुन अभिनंदन करण्यात येत आहे.

## समाजाला व्यासंगी ज्ञानसंपन्न शिक्षकांची गरज : डॉ. पवार



**पंचवटी : वार्ताहर**
**शिक्षणात पायापासून ते क्षितीजापर्यंत पोहोचविण्याची ताकद असते. पुस्तकांच्या बाहेरील ज्ञान आवश्यक आहे. माणस वाचायला शिकलं पाहिजे. समाजाला योग्य दिशेला न्यायचे असेल तर अत्यंत व्यासंगी, ज्ञानसंपन्न शिक्षकांची गरज आहे, असे प्रतिपादन कला व वाणिज्य महाविद्यालय त्र्यंबकेश्वर येथील प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांनी केले. ग्रंथमित्र रामचंद्र अर्जुन काकड सार्वजनिक वाचनालय, मखमलाबाद यांच्यावतीने शिक्षकदिनानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.**

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन मविप्र संचालक रमेश पिंगळ, अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष रामदास पिंगळे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपिठावर अभिनव बालविकास मंदिर स्कूल कमिटी अध्यक्ष निवृत्ती महाले, वाचनालयाचे उपाध्यक्ष संदिप धात्रक, कार्यवाह शंकरराव पिंगळे, ज्येष्ठ संचालक देवराम पवार, सुभाष तिडके, संजय फडोळ, गोकुळ काकड, राकाशेठ माळी, प्रताप काकड, संजय गामणे, नरेंद्र मुळाणे, प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्य राजेंद्र गाडे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत सरस्वती व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत वाचनालयाचे अध्यक्ष रामदास पिंगळे यांनी केले. प्रास्ताविक वाचनालयाचे संचालक गोकुळ काकड यांनी केले. आदर्श शिक्षकांची माहिती वाचनालयाचे उपाध्यक्ष संदिप धात्रक व संचालक राकाशेठ माळी यांनी दिली. सार्वजनिक वाचनालयातर्फे श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मखमलाबाद येथील संस्कृत शिक्षिका योगिता कापडणीस, एन.सी. सी.नेव्हल ऑफिसर दयाराम मुठाळ, कलाशिक्षिका स्मिता मुळाणे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विविध संस्थांतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अभिनवचे मुख्याध्यापक प्रमोद ठाकरे, छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण प्रसारक मंडळाच्या मुख्याध्यापिका मनिषा ढोली, कलाशिक्षक सोमेश्वर मुळाणे, विज्ञान शिक्षिका वर्षा पाटील, ज्येष्ठ शिक्षिका वैशाली देवरे यांचा वाचनालयाचे ज्येष्ठ संचालक निवृत्ती महाले यांच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचालन वाचनालयाचे कार्यवाह शंकरराव पिंगळे यांनी तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ संचालक सुभाष तिडके यांनी केले. कार्यक्रमास सचिन गरड, ग्रंथमित्र राजेश शिरसाठ, दशरथ मानकर, ज्युनियर कॉलेज प्रमुख उज्वला देशमुख, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सुयोजित पूल ते गंगापूर कॅनॉल रस्त्यावर वाहतूक कोंडी

## भूसंपादन करून नवीन रस्ता तयार करण्याची वाहनधारकांची मागणी

**पंचवटी : वार्ताहर**
**खड्ड्यांच्या जाचामुळे गेल्या काही दिवसांपासून सुयोजित गार्डन पुल ते गंगापूर कॅनॉलपर्यंत वाहन चालवताना वाहन चालकांना कसरत करावी लागत असून वाहतुकीचा खोळंबा नित्याचाच झाला आहे. यामुळे वाहन चालकांसह परिसरातील नागरिक देखील त्रस्त झाले आहेत.**



गंगापूररोडकडून मखमलाबाद गावाकडे येणाऱ्या सूयोजित गार्डन पुलापासून ते गंगापूर कॅनॉलपर्यंत रस्त्यावर खड्ड्यांचे मोठ्या प्रमाणात साम्राज्य पसरल्याने वाहनचालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. याच रस्त्यावर 'ग्रेप्स अम्बेसी' 'मिसळ पॉइंट' तसेच अनेक छोटे मोठे रेस्टॉरंट असून याठिकाणी येणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून वाहनांचे गॅरेज, नागरी वस्ती देखील आहे. तसेच शाळा, पॉलिटेक्निक, इंजिनियरिंग महाविद्यालय, कॉलेज असल्याने त्याचप्रमाणे नोकर वर्गाला, विद्यार्थ्यांना सातपूर, गंगापूर रोड, कॉलेज रोडकडे जाण्यायेण्यासाठी रस्ता सोयीचा आहे. गुजराथकडून त्र्यंबकेश्वर जाणारे भाविक देखील मखमलाबाद गावातून याच मार्गावरून जातात.

त्यामुळे या रस्त्याचा रहदारीसाठी वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहन चालकांना कसरत करावी लागत असल्याने वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असतात. एक किलोमीटर मार्ग काढण्यासाठी तासभर लागतो. मळे वस्तीतील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

### रस्त्याच भूसंपादन करून रस्ता लवकर करावा

मखमलाबादकडून गंगापूर रोडकडे जाणारा हा महत्वाचा रस्ता आहे. या



रस्त्यावरून वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. राकाशेठ माळी, ग्रेप्सअम्बेसी हॉटेल जवळ खड्डे मोठ्या प्रमाणात पडले असल्याने अपघात देखील वाढले आहेत. सदरचा रस्ता तीस मिटर असल्याने तसेच येणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने हा रस्ता खूप महत्त्वाचा आहे. त्यामुळे रस्त्याचे भूसंपादन करून हा रस्ता लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना, नोकर वर्गाला, विद्यार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मनपा आयुक्तांनी रस्त्याची पाहणी करून लवकरात लवकर भूसंपादन करून रस्ता करावा.

**- प्रमोद पालवे,** संस्थापक अध्यक्ष- जिजाई फाऊंडेशन

## काँग्रेसची 'खर्चे पर चर्चा'




**सिडको : विशेष प्रतिनिधी**
**वाढत्या महागाईने त्रस्त झालेल्या सामान्य जनतेत जाऊन जिल्हा महिला काँग्रेस ग्रामीण अध्यक्ष वंदना पाटील यांनी महिलांशी चर्चा केली.**

आज वाढत्या जीएसटीमुळे मुलांचे शालेय उपयोगी साहित्य तसेच आपला घर प्रपंच सांभाळून घरात एखादं छोटं मोठं सोनं घ्यायचं झालं घरात मंगल कार्य असेल सोनं करायचा असेल तरी महिला भगिनी सोनाराच्या दुकानात जर गेल्या नवीन सोनं घ्यायचं म्हटलं तरी जीएसटी आपलं सोनं मोडून नवीन दागिना घडवायचा असेल त्याच्यावर देखील जीएसटी लावण्यात आली आहे. बाजारात शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही परंतु भाजीपाला महाग विकल्या जातो त्यामुळे गृहिणींचे आर्थिक बचत कोलमडले असल्याचे महिलांनी काँग्रेसच्या वंदना पाटील यांच्याकडे व्यक्त केल्या. यावेळी सुमन फसाळे, सुमन महाले, अश्विनी गुजर, वनमाला जगताप ,मनीषा बेडेकर, अश्विनी जाधव, अश्विनी भोर उपस्थित होते.

## ब्रह्मगिरी प्रदक्षिणा मार्गावर स्वच्छता मोहीम

### शिवेंदू फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**
**नाशिक येथील शिवेंदू फाऊंडेशनतर्फे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा मार्गाची स्वच्छता रविवारी करण्यात आली.**

पवित्र श्रावण महिन्यात लाखो भक्त गोदावरीचे उगमस्थान असलेल्या ब्रह्मगिरी पर्वताला प्रदक्षिणा घालत असतात. परंतु हे करत असताना अनावधानाने होणारा कचरा, खाद्यपदार्थांचे पाकिटे, पाण्याच्या बाटल्या तसेच अन्य अनेक कचरा या प्रदक्षिणा मार्गावर साचून राहतो, ज्याकडे नंतर वर्षभर लक्ष दिले जात नाही. यामुळे निसर्गाची होणारी हानी लक्षात घेत, नाशिक येथील शिवेंदू फाऊंडेशनतर्फे गतवर्षीप्रमाणे यावर्षी देखील ब्रह्मगिरी प्रदक्षिणा मार्ग स्वच्छता




अभियान राबविण्यात आले.

ऋषीपंचमीनिमित्त आलेल्या अनेक भक्तांनी देखील या उपक्रमाचे कौतुक केले. यामधे वेगवेगळ्या प्रकारचा कचरा गोळा करण्यात आला व हा कचरा घनकचरा व्यवस्थापन विभाग, त्र्यंबकेश्वर नगरपंचायत, त्र्यंबकेश्वर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला, अशी माहिती शिवेंदू फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कुणाल प्रशांत पाटील यांनी दिली. त्यांच्या सोबत शिवेंदू फाऊंडेशनचे सचिव प्रतिक थोरात, सहसचिव अनंता बागुल, शिवम काळपांडे, कुणाल काळपांडे, श्रुती पाटील, रचना बोरसे, प्रतिक्षा खैरनार व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## मुलांचे आरोग्य सांभाळणे गरजेचे : डॉ. दीपा जोशी

### माहेरघर भिशी ग्रुपतर्फे महिलांशी संवाद

**नाशिक : प्रतिनिधी**
**शारिरीक वाढ, वाढीचे टप्पे कसे ओळखावे, शारीरिक वाढीबरोबर बौध्दिक वाढ तितकीच महत्वाची आहे, मुलांचे वाढीचे टप्पे वेळेवर येत नसेल तर बालरोगतज्ज्ञ यांचा सल्ला घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. दीपा जोशी यांनी केले.**

माहेरघर भिशी ग्रुपतर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. दीपा जोशी मार्गदर्शन करताना बोलत होत्या. यावेळी डॉ. जोशी म्हणाल्या की, मुलांचे लसीकरण करणे महत्त्वाचे आहे. सध्याच्या परिस्थितीत फ्लूची साथ असल्याने त्यावरील लसीकरण करणे गरजेचे आहे.

किशोरवयीन मुलांचे मानसिक आरोग्य कसे सांभाळावे, त्यांच्याशी सुसंवाद करणे, मोबाइल आणि इंटरनेट यांचा उपयोग विधायक कार्यासाठी करावा. वय वर्ष ९ ते ४५ वर्ष वयोगटातील मुली आणि महिलांना गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग यासाठी असलेली लस यासंबधी माहिती दिली आणि ही लस ९ ते १४ वर्ष वयोगटातील मुलींना देण्याने होणारे फायदे समजावून सांगितले. बालकांचा संतुलित आहार यावर मार्गदर्शन केले. सुनीता बधान, कविता राणे, अलका येवले, भाग्यश्री देशमुख, स्वाती शिरोडे यांच्यासह अनेक महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# माकपाच्या शिष्टमंडळाचे राज्यपालांना निवेदन

## नाशिक-मुंबई रस्त्याच्या समस्याबाबत लक्ष घालण्याची मागणी

**नाशिक :प्रतिनिधी**
**माकपाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेत नाशिक मुंबई रस्त्याच्या समस्येबाबत लक्ष घालण्याची मागणी करणारे निवेदन दिले.**

नाशिक- मुंबई रस्ता अतिशय खराब झाला असल्याने त्या विषयी त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी पावसाळा झाल्यानंतर काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येईल, असे सांगितले. तसेच शिष्टमंडळाने यावेळी त्यांना



विनंती केली की, या कालावधीत आपण टोल माफी द्यावी, अशी विनंती केली असता त्यांनी या विषयाशी सहमत आहे, असे सांगितले.

राज्याची आर्थिक शिस्त, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि बेरोजगारीचा प्रश्न व कंत्राटी कामगारांचा प्रश्न या विषयावर सविस्तर चर्चा झाली.किमान वेतन समितीचे गठन करून त्याचे पुनरावलोकन करून किमान वेतन वाढवून द्यावे ही मागणी प्रामुख्याने करण्यात आली. या शिष्टमंडळात ॲड. वसुधा कराड, कॉ. सीताराम ठोंबरे, ॲड. तानाजी जायभावे, कॉ. देविदास आडोळे, कॉ. दिनेश सातभाई हे सहभागी होते.

# शरद पवार गटातर्फे पदाधिकाऱ्यांना महिला सुरक्षेचे धडे

**नाशिक : प्रतिनिधी**
**देशासह राज्यात महिला व युवतींवर अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. लैगिंक छळ, छेडछाड, चैन स्नॅचिंग यासह इतर घटना दिवसाढवळ्या घडत आहे. त्यामुळे महिलांनी स्वत:हून पुढे येत या घटनांना तोंड देणे गरजेचे आहे. समाजकंटकांना कायद्याचे चौकटीत राहून धडा शिकवण्याचा काम करावे, असे आहावन आणि मार्गदर्शन राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहर जिल्हाध्यक्ष गजानन शेलार यांनी केले.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार नाशिक शहराचे गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर महिला सुरक्षा अभियान राबविण्यात आले. यावेळी सरचिटणीस मुन्नाभाई अन्सारी, छबु नागरे यांसह सर्व विधानसभा विभाग प्रभाग वॉर्ड अध्यक्ष व फ्रंटल सेलचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी पदाधिकाऱ्यांना महिला रक्षणाचे धडे देत मार्गदर्शन करण्यात आले.

पक्षाच्या मुंबईनाका येथील कार्यालयात हे अभियान पार पडले. राज्यात मागील काही दिवसात बदलापूरसह असंख्य ठिकाणी महिलांसह युवतींवर अत्याचाराच्या घटना घडल्या. नागरिकांनीही



साथ द्यावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाने पदाधिकाऱ्यांना महिला सुरक्षेचे धडे दिले. प्रत्येक वॉर्डानुसार राष्ट्रवादीचे कार्यकर्त्यांनी लक्ष ठेवून महिला अत्याचार होणार नाही यासाठी तत्पर रहावे, असे मार्गदर्शन केले.

# अमानतुल्लाह खान यांना न्यायालयीन कोठडी

**नवी मुंबई:**

**आम आदमी पार्टीचे आमदार अमानतुल्लाह खान यांना गेल्या आठवड्यात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आर्थिक अफरातफर केल्याच्या प्रकरणात अटक केली होती. ईडीने आधी त्यांचं घर व कार्यालयावर छापेमारी केली, त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती.**

दिल्लीतल्या वक्फ बोर्डाच्या कथित जमीन घोटाळाप्रकरणात ही कारवाई करण्यात आली होती. दरम्यान, ईडीने आज त्यांना न्यायालयासमोर हजर केलं असता न्यायालयाने त्यांची २३ सप्टेंबरपर्यंत (१४ दिवस) न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. ईडीने स्वतःहून न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती. तशीच याचिका दाखल करण्यात आली होती.

ईडीने न्यायालयाला सांगितलं की आम्ही आमच्याकडे उपलब्ध असलेली सामग्री अमानतुल्लाह खानसमोर सादर केली. त्यावरील त्यांचा जवाब नोंदवला आहे. सहआरोपींबरोबरचे मेसेजेस दाखवून त्यावरील त्यांचं स्पष्टीकरून नोंदवलं आहे. या मुख्य प्रकरणातील कलम ४ अंतर्गत केली जाणारी तपासणी पूर्ण झाली आहे.

अमानतुल्लाह खान हे आम आदमी पार्टीचे आमदार आहेत. दिल्लीतल्या ओखला या मतदारसंघाचं ते प्रतिनिधीत्व करतात. सक्तवसुली संचालनालय व त्यांच्या विरोधकांनी त्यांच्यावर दिल्ली वक्फ बोर्डाच्या संचालकपदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणात जो आर्थिक गैरव्यवहार झाला त्याचा तपास ईडीकडून केला जात आहे. मागील सोमवारी (२ सप्टेंबर) सकाळी ईडीचं पथक अमानतुल्लाह यांच्या घरी पोहोचलं. त्यांच्या घराची झडती घेण्यात आली. यावेळी आमदार अमानतुल्लाह खान व ईडीचे अधिकारी यांच्यात बाचाबाचीही झाली. काही तास या ठिकाणी झडती घेतल्यानंतर ईडीने अमानतुल्लाह यांना अटक केली होती. तेव्हापासून ते ईडीच्या ताब्यात होते. आता त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली आहे.

दिल्ली सरकारच्या महसूल विभागाच्या मुख्यालयाने २०१६ मध्ये वक्फ बोर्डाचे माजी तत्कालीन अध्यक्ष अमानतुल्लाह खान यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. अमानतुल्लाह खान यांनी वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदाचा गैरवापर करुन मनमानी पद्धतीने नियुक्त्या केल्या होत्या, असा त्यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) देखील तपास करत आहे. सीबीआयने याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. वक्फ बोर्डाचा कारभार करताना अमानतुल्लाह खान यांनी जाणीवपूर्वक नियमांची पायमल्ली केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. त्यांच्यामुळे सरकारी खजिन्याचं नुकसान झाल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. त्यांनी केलेली भरती प्रक्रिया पारदर्शी नव्हती, असं सीबीआयने म्हटलं आहे. त्यांनी पारदर्शीपणे भरती केली असती तर लायक उमेदवारांना नोकरी मिळाली असती असंही सीबीआयने त्यांच्या आरोपात म्हटलं आहे.

# येवला शहरात ऑल इंडिया पॅन्थर सेनेचा संवाद मेळावा



**येवला : शहरात उत्साहात संपन्न झाला शहरातील शासकिय विश्रामगृह येथे सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते पॅन्थर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार प्रमुख उपस्थितीत मेळावा संपन्न झाला.**

दरम्यान सदर मेळाव्यात विविध पक्ष संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांनी केदार यांच्या हस्ते पॅन्थर सेनेत प्रवेश केला दरम्यान प्रारंभीच तथागत भगवान बुद्ध, भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, माता रमाबाई आंबेडकर, आदीच्या प्रतिमेला दिपक केदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला त्या नंतर पॅन्थर सेनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रविण संसारे, जिल्हाध्यक्ष करण संसारे यांच्या हस्ते दिपक केदार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला सदर मेळाव्यात विविध विषयांवर चर्चा करण्यात येवुन खालील विषयांवर चर्चा करण्यात आली येवला बस स्टॅन्ड ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे नाव देण्यात यावे, ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय येवला या ठिकाणी हॉस्पिटल ला महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात यावे,

विंचूर चौफुली येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात यावं आजूबाजूचे अतिक्रमण काढण्यात यावे, मुखेड येथील स्मारकाचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे, मुक्तीभूमी येथील टप्पा क्रमांक दोन, यांचे बांधकाम तसेच उद्घाटन होऊन सात-आठ महिने झाले आहे. अध्याप पावे तो हे सुरू झालेलं नाही तरी हे सुरू करण्यात यावं, मागासवर्गीय दलित बुद्ध यांच्यावरील हल्ले तात्काळ थांबावे. आदीसह विविध विषयांवर चर्चा करण्यात येवुन तसेच मागण्या पूर्ण न झाल्यास पूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दीपक भाई केदार यांनी दिला. यावेळी अनिकेत पगारे यांची येवला तालुकाध्यक्ष पदी तसेच नितीन गरुड यांची उपतालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी संघटनेत प्रवेश केला.दीपक केदार यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले .सदर मेळावाचे आयोजन उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण संसारे, जिल्हाध्यक्ष करन संसारे युवा नेते साई भालेराव यांनी केले होते, सदर मेळाव्याला पॅन्थर सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच युवक उपस्थित होते.



# मराठा हायस्कूलमध्ये जागतिक साक्षरता दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

**मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलमध्ये जागतिक साक्षरता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल व रामनाथ रायते उपस्थित होते.**

कार्यक्रम सकाळ सत्र व दुपार सत्र या दोन्ही सत्रात घेण्यात आला. सकाळ सत्रात इयत्ता सहावी ब व दुपार सत्रात इयत्ता दहावी म च्या वर्गाने सदर कार्यक्रम सादर केला. इयत्ता सहावी ब ची विद्यार्थिनी निधी पाटील हिने आपले मनोगत व्यक्त केले तर दुपार सत्रात इयत्ता दहावी म ची विद्यार्थिनी प्रीती पवार हिने आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात थोरात सर म्हणाले जागतिक साक्षरता दिन हा प्रतिवर्षी ८ सप्टेंबर या तारखेला साजरा केला जातो.

आंतरराष्ट्रीय सहकार्यातून शिक्षण विज्ञान आणि सांस्कृतिक विकास व त्यातून शांतता व सुव्यवस्थेला उत्तेजन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या युनेस्कोने शिक्षणाचे साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन ८ सप्टेंबर हा दिवस जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले आणि म्हणून ८ सप्टेंबर इ.स.सन १९६६ पासून जगभरात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

सूत्रसंचालन विद्यार्थिनी संस्कृती अमृतकर व दहावी म विद्यार्थिनी मयुरी नेरपगार यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार कार्तिक गायकवाड व राहुल झेंडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इयत्ता वर्गशिक्षिका आरती देशमुख व इयत्ता दहावी म च्या वर्ग शिक्षिका ज्योती शिंदे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मोटारीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पुणे :** भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नगर रस्त्यावरील लोणीकंद परिसरात घडली. अपघातात दुचाकीस्वार तरुण जखमी झाला. याप्रकरणी मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सुधांशु राज (वय २२, रा. युनाईट पीजी हॉस्टेल मॅजेस्टिक सिटी, वाघोली) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी वैभव रणधीर कुमार (वय २२, रा. युनाईट पीजी होस्टेल, मॅजेस्टिक सिटी, वाघोली, मूळ रा. पटणा, बिहार) याने लोणीकंद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी मध्यरात्री रात्री सव्वा दोनच्या सुमारास नगर गाडे वस्ती भागात झाला.

# पतीच्या विवाहबाह्य संबंधामुळे पत्नीची आत्महत्या

**पुणे :** पतीच्या विवाहबाह्य संबंधामुळे पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागातील भेकराईनगर परिसरात घडली. याप्रकरणी पतीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तेजश्री आकाश उदमले (वय २२ रा. शिक्षक कॉलनी, भेकराईनगर, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी आकाश अशोक उदमले (वय २५) याच्याविरूद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय इंदोर, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे, अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा विकास योजना, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०९/०९/२०२४ पासून ते १६/०९/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामसेवक** **उपसरपंच** **सरपंच**

**ग्रामपंचायत कार्यालय इंदोरे ता. दिंडोरी, जि. नाशिक**



**ग्रामपंचायत चिचोंडी खु. ता. येवला, जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र.०२/२०२४-२५**

**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)**

ग्रामपंचायत चिचोंडी खु. ता. येवला जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दर पत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा १०/०९/२०२४ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक १७/०९/२०२४ सायंकाळी ५.०० वा (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक १८/०९/२०२४ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असताना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत चिचोंडी खु. ता. येवला जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

1) PROVIDING AND FIXING PAVER BLOCK SMASHANBHUMI PREMISES TAL YEOLA DIST NASHIK PART-1 (Est. Amt. 140000) 2) PROVIDING AND FIXING PAVER BLOCK SMASHANBHUMI PREMISES TAL YEOLA DIST NASHIK PART-2 (Est. Amt. 140000/-

**सरपंच ग्रामसेवक**

**ग्रामपंचायत चिचोंडी खु. ता. येवला जि. नाशिक**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक शहर २** या गांवचे शिवारातील **टीपी-२ फायनल प्लॉट नंबर २४ सर्व्हे नंबर ४९६/२/२/१ मधील प्लॉट नं. १ यांसी क्षेत्र ७७३.५० चौ.मी.** या मिळकतीवरील **सायरा अपार्टमेंट** या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील **फ्लॅट नंबर १६ (सोळा) बांधीव क्षेत्र ५१.५८ चौ. मी. म्हणजेच ५५७.०० चौ. फुट** ही फ्लॅट मिळकत **शेख इम्तीयाज अहेमद मुश्ताक अहेमद** यांचे मालकीची व कबजे उपभोगातील आहे. सदर फ्लॅट मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे **शेख इम्तीयाज अहेमद मुश्ताक अहेमद** यांचे म्हणणे आहे. सदर फ्लॅट मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनसाठी प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सबब उपरोक्त फ्लॅट मिळकती संबंधाने कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, वाद असल्यास अथवा कोणत्याही स्वरूपाचा दस्तऐवज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात)** दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास उपरोक्त फ्लॅट मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर व लेखी पुरावा नसलेली तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही व ती आमचे पक्षकारावर, मिळकत मालकावर तसेच सदर फ्लॅट मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस.

नाशिक, दिनांक ०९/०९/२०२४

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. सौ. शहेनाज ए. पठाण**

**बी.एस्सी. एलएल.बी. चेंबर नं. ३०५, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक, मो.नं. ९८२२६६८४८५ ९८२२६६११३४**



**तहसिल कार्यालय नाशिक**

**जुना आग्रा रोड, सी. बी. एस. जवळ ता.जि. नाशिक** दुरध्वनी क्र. ०२५३-२५७५६६३ नाशिक,

क्र. एमएजी/जन्म-मृत्य/कावि/९६/२०२४ दिनांक-०६/०८/२०२४

**जाहीर नोटीस**

श्री. लहानु कुंडलीक निंबेकर, रा. मु.पो. अंबेबहुला विल्होळी ता. जी. नाशिक

विरूध्द

**ग्रामपंचायत अंबेबहुला,** ग्रामपंचायत कार्यालय अंबेबहुला ता. जि. नाशिक

विषय:- महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम २०२३

अन्वये मुख्य कलम १३ मध्ये उपकलम (२) व (३) अन्वये अर्ज

ज्याअर्थी **रखमाबाई पुना नीबेंकर** यांचा मृत्यु **दि.०१/०६/१९९७** रोजी झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद सामनेवाले, ग्रामपंचायत अंबेबहुला ग्रामपंचायत कार्यालय अंबेबहुला ता. जि. नाशिक यांचेकडील जन्म-मृत्यु रजिष्ट्ररला झालेली नसल्याचे सामनेवाले यांचेकडील पत्र अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केला आहे, तरी सदर नोंद होणेकामी अर्जदार यांनी या कार्यालयास महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियम २०२३ मुख्य कलम १३ मध्ये उपकलम (२) व (३) प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार यांनी केलेल्या अर्जाबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **३०** दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय नाशिक येथे हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी. सदरहून मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नसआल्यास कोणाचेही काहि एक म्हणणे नाही असे गृहीत धरूण रखमाबाई पुना नीबेंकर यांच्या मृत्युची नोंद सामनेवाले यांचे रेकॉर्डला करण्याबाबत आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी ही जाहिर नोटीस आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी देण्यात आली आहे. दिनांक:- ३०/०८/२०२४

**ठिकाण:- नाशिक, दि.३०/०८/२०२४**

**सही/- (डॉ. शोभा पुजारी)**

**तहसिलदार नाशिक**


# महायुतीचा फॉर्म्युला ठरला!

**मुंबई:-** अमित शाह यांच्या या दौऱ्यात भाजप पदाधिकारी, नेत्यांनी विधानसभेला भाजपने १६० जागा लढल्या पाहिजेत, अशी मागणी केली. २८८ मतदारसंघापैकी भाजप १६० जागांवर लढली तर अवघ्या १२८ जागा शिल्लक राहतात. त्यामुळे अजित पवार गट ६४ आणि शिवसेने शिंदे गट ६४ जागांवर लढावे लागू शकते.अमित शाह यांनी भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत १२५ जागा भाजपने जिंकण्याचे ध्येय ठेवले आहे.

# नाशकात आदिवासी विद्यापीठ स्थापन करणार

**(पान १ वरून)** नाशिक औद्योगिकदृष्ट्या विकसित होत असल्याने या विद्यापीठातील विद्यार्थांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. आदिवासी आणि डोंगरी भागातील विविध प्रश्नांची आपल्याला जाणीव असल्याचे नमूद करून ते पुढे म्हणाले की, आदिवासी भागातील आरोग्य आणि शिक्षण व्यवस्था सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरतीसाठी निर्देश देण्यात येतील. विद्यापिठातील प्राध्यापक भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे करण्याच्या सूचना देण्यात येतील, यासंदर्भात विद्यापीठांच्या कुलगुरूंशी चर्चा करण्यात आली आहे. राजभवन येथे आदिवासी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. आदिवासी बांधवांचे प्रश्न जाणून घेत ते सोडविण्यासाठी आदिवासी लोकप्रतिनिधी यांची राजभवन येथे बैठक घेण्यात येईल, असे सांगितले. पालकमंत्री भुसे यांनी नार - पार प्रकल्प मंजूर केल्याबद्दल राज्यपाल. राधाकृष्णन यांचे आभार मानले. यावेळी लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यातील विविध प्रश्न आणि विकास योजनांबाबत राज्यपालांना माहिती दिली

# समृद्धी महामार्ग पुण्याला जोडणार राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**पुणे : समृद्धी महामार्ग पुण्याला जोडला जाणार आहे. पुणे आणि शिरूर दरम्यान प्रस्तावित असलेला ५३ किलोमीटरचा सहा पदरी उड्डाण मार्ग अहमदनगर आणि छत्रपती संभाजीनगरमार्गे समृद्धी महामार्गाला जोडण्यात येणार आहे.**

यासंदर्भातला निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. पुण्याजवळील केसनंद गावातून या उड्डाण मार्गाची सुरुवात होणार आहे. त्यासाठी ७५१५ कोटी रुपये खर्च येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या पुणे - शिरूर - अहमदनगर राज्य महामार्गाला समांतर पद्धतीने नव्या सहा पदरी उड्डाण मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे .

**महामार्गाची एकूण लांबी २५० किलोमीटर**

पुण्याजवळील केसनंद गावातून या उड्डाण मार्गाची सुरुवात होणार असून ५३ किलोमीटरचा हा उड्डाणमार्ग शिरूरपर्यंत पोहचणार आहे . त्यासाठी ७५१५ कोटी रुपये खर्च येणार आहे . मात्र आता हा प्रस्तावित उड्डाणमार्ग पुढे अहमदनगर आणि तिथून पुढे छत्रपती संभाजी नागरमार्गे समृद्धी महामार्गाला जोडण्याचा निर्णय घेण्यात आलाय . त्यासाठी आणखी २०५०कोटी रुपये खर्च येणार असून एकूण खर्च ९५६५रुपये इतका येणार आहे. या महामार्गाची एकूण लांबी २५० किलोमीटर इतकी असणार आहे.


**जाहीर नोटीस** **ॲड. एस. एम. गोवर्धने**

**चौकशी अर्ज नंबर ७५/२०२४**

**दिंडोरी येथील महेरबान मा.कार्यकारी दंडाधिकारी, साहेब, दिंडोरी यांचे कोर्टात....**

**श्री.विष्णू किसन भरसट** **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत टिटवे, ता. दिंडोरी** **सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार यांच्या मुलीचे नाव **देवका विष्णू भरसट** असे असून अर्जदार यांचे मुलीचा जन्म मौजे ब्रम्हयाचापाडा, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे दिनांक १४/०१/१९८९ रोजी घरीच झालेला असून अर्जदार व त्यांचे कुटुंबियांकडून त्यावेळी मुलगी **देवका** हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत टिटवे यांचेकडील जन्म जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला करण्याचे राहून गेले. अर्जदार यांनी जन्म-मृत्यू कायदा कलम १३ (३) प्रमाणे सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी अर्जदार यांनी केलेल्या अर्जास कुणाचीही, कोणत्याही प्रकारे हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासून एक महिन्याचे आत अथवा दिनांक **१३/०९/२०२४** रोजी स्वतःअगर वकिलांमार्फत हजर होवुन लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कुणाची हरकत न आलेस पुढील आदेश केले जातील, याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली.

**सही/- लिपिक तहसील कार्यालय, दिंडोरी** (शिक्का) **सही/- कार्यकारी दंडाधिकारी तहसील कार्यालय, दिंडोरी**



**जाहीर नोटीस** **ॲड. एस. एम. गोवर्धने**

**चौकशी अर्ज नंबर ७७/२०२४**

**दिंडोरी येथील महेरबान मा.कार्यकारी दंडाधिकारी, साहेब, दिंडोरी यांचे कोर्टात....**

**सौ. मेघना रमेश बस्ते** **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत माळे-दुमाला, ता. दिंडोरी** **सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार हया मु. प्लॉट नंबर १९, मखमलाबाद रोड, स्वामी समर्थ केंद्राजवळ, स्वामीनगर, हॉटेल उमंग मागे, नाशिक येथील कायमच्या रहीवाशी आहेत. अर्जदार यांचे सासरे नामे जगन्नाथ मुरलीधर बस्ते हे मुळ गावी मौजे हस्ते-दुमाला, ता. दिंडोरी, जि.नाशिक येथे रहात असताना **दिनांक १७/०६/२०२२** रोजी वृध्दापकाळाने मयत झाले असून त्यांचा अंत्यविधी, दशक्रिया विधी व इतर कार्य हे अर्जदार व त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक यांनी हस्तेदुमाला, ता. दिंडोरी, जि.नाशिक या गावीच केलेले आहेत. त्यांचे मृत्युची नोंद करण्याचे राहून गेले असून अर्जदार यांनी जन्म-मृत्यु कायदा कलम १३ (३) प्रमाणे सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी अर्जदार यांनी केलेल्या अर्जास कुणाचीही, कोणत्याही प्रकारे हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासून एक महिन्याचे आत अथवा दिनांक **१३/०९/२०२४** रोजी स्वतःअगर वकिलांमार्फत हजर होवुन लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कुणाची हरकत न आलेस पुढील आदेश केले जातील, याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली.

**सही/- लिपिक तहसील कार्यालय, दिंडोरी** (शिक्का) **सही/- कार्यकारी दंडाधिकारी तहसील कार्यालय, दिंडोरी**



## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहीत निर्व्यसनी जोडपे पाहिजे.रहाण्याची सोय. **संपर्क:-सकाळी १० ते ५ नाशिक.मो.नं.९०४९०-३४९९९**

---

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

---

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो. नं.९०४९०-३४९९९**

---

न्यू अनारकली फॅशन &NX दुकानासाठी अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर व सेल्समन, हेल्पर पाहिजे. ठिकाण : एम.जी.रोड, भारत बुकसमोर, फावडे लेन,

---

**संपर्क- ९८८१३८३०१९**

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

### पाहिजेत

कॉलेजरोड नाशिक येथील नामांकित ब्युटी पार्लर व शासन मान्यताप्राप्त ब्युटी कल्चर कोर्सेस, ॲकेडमीसाठी अनुभवी ब्युटीशियन, उत्तम संवाद कौशल्य असलेल्या अनुभवी रिसेप्शनीस्ट, टेली कॉलर्स मुली, महिला पाहिजेत. - अपेक्षेसह बायोडेटा पाठवा. संपर्क ९३०९२४००७५, ८३७८८८७८६२

---

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरसाठी गरजू/ अनुभवी वायरमन, इलेक्ट्रिशियन, पाहिजेत, स्वतःचे वाहन आणि बाहेर गावी राहण्याची तयारी असणाऱ्यास प्राधान्य. **अनुभवानुसार पगार. संपर्क - : उर्जा उद्योग ९५६१०१९२२८**

---

बिल्डरच्या ऑफिसमध्ये ऑफिसबॉय व कोर्ट कचेरीचा माहितीगार माणूस व १० वर्षे अनुभवी वकील पाहिजेत. **मो.९३७३४२५००७**

---

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह भेटा- कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

### ज्योतिष

गायत्री ज्योषित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### Name Changed

My old Name was Sandeep Ramachandra Ingale has been changed to my new Name **Sandip Ramachandra Ingle** As per Aadhar No- 6668 8080 3220

---

My old Name was Nilesh Gangurde has been changed to my new Name **Nilesh Ramadas Gangurde** As per Aadhar No- 541317050672

---

I Shanta Govind Zade mother of No 15219571K Rank Hav Zade Pradip Govind is serving at 341 Fd Regt, C/O 99 APO Add:- Vill- Chincholi, Post- Chincholi, Teh- Sinnar, Dist- Nashik, Maharashtra 422102. That i have changed my Name & Date of birth from **Shanta Govind Zade** to Shantabai Govind Zade & DOB 10/05/1954 to 01/04/1948 due to wrongly entered in service record of my son as per **affidavit N0 14107/2024**

### विकणे आहे

संपूर्ण प्लॅन्ट विकणे आहे ३६/७ ऑईल एक्सपेलिअर २ कन्व्हेअर ५० एचपी मोटार ३००० एल रिफायनी स्पेअर पार्ट सेट २, स्टार-डेल्टा स्टार्टर **संपर्क- ग्रीन लिफ इंडस्ट्रीज ९४२२९९०२७८**

### ब्राह्मण वधू पाहिजे

मुलगी उंच असावी, समजूतदार, मनमिळाऊ, पदवीधर, वय २४ ते २७. **संपर्क मोबाईल नंबर ९५५२२७७०९७, ९५११६८०९९८**

### भाड्याने देणे आहे

संचेती टॉवरमागील पहिल्या मजल्यावरील १) 6'10"x6 SMALL ROOM 2) 23'x10" HALL 3)16'x11.10"- एकूण वापरलेले चटई क्षेत्र ४४४ फुट भाड्याने देणे. फक्त व्हॉटस्ॲप: 98693993772,

**जाहिरात छोटी किमया मोठी!**



**दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय परिस शिवाजी रोड, कसबेवणी शाखा वणी यांचे तर्फे**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१.मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा परिषद नाशिक, पोट तुकडी तालुका, पंचायत समिती दिंडोरी पैकी **मौजे कसबेवणी** या गावचे शिवारातील बिनशेती मिळकत **गट नं. ७१४/१/प्लॉट/१३** यांसी **क्षेत्र २.९१.१८आर.चौ.मी.** या मिळकतीवर ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे बांधीव मिळकतीचे वर्णन-खुली बखळ जागा २९१.१८ चौ. मी. त्यात शेड १ लोखंडी पत्र्याचे दुपाखी लांबी ५१X२२ यांसी एकुण **क्षेत्रफळ ३१३३ चौ.फुट** यांसी ग्रामपंचायत मिळकत **नं. ४८३३** यांसी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

**२.** वर कलम १ यात नमूद मिळकत श्री. भरत मुरलीधर पगार यांचे मालकीची व कब्जेवहीवाटीतील असून सदर मिळकतीवर दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. वणी या बँकेचे बोजा व्यतिरिक्त निर्वेध व बिनबोजाची असल्याचे सांगून कर्जदार श्री. भरत मुरलीधर पगार यांनी आमचे पक्षकार दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय परिस शिवाजी रोड, कसबेवणी शाखा वणी यांचेकडे उपरोक्त मिळकतीवर त्यांचेकरीता तारण कर्जाची मागणी केलेली आहे. सबब, उपरोक्त नमूद मिळकतीच्या स्वामित्व व निर्वेधपणाची खात्री करणेकामी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द केली आहे.

**३.** सबब, वर कलम १ मध्ये नमूद मिळकतीवर वर नमूद मिळकत मालकाव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणतेही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध जसे की, गहाण, दान, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र लिज, लिन, अगर तत्सम प्रकारचा हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात)** दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व साक्षांकीत कागदपत्रांसह हरकती नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या, मुदतीनंतर आलेल्या, लेखी व साक्षांकीत कागदपत्रांसह न आलेल्या हरकती उपरोक्त मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही व सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे पक्षकार वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर पुढील कार्यवाही करतील, यांची नोंद घ्यावी. कळावे. ही जाहीर नोटीस ता. ०९/०९/२०२४

**अधिकृत अधिकारी दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय परिस शिवाजी रोड, कसबेवणी शाखा वणी, ता. दिंडोरी** (शिक्का) **श्री.सागर मधुकर वाघमारे, (ॲडव्होकेट) ऑफीस - गाळा नं. ३५/क, दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समिती संकुल, निळवंडी रोड, दिंडोरी ता. दिंडोरी जि.नाशिक**



**जाहीर नोटीस** नि.नं:- प्रोसेस जमा **ॲड.रामराव भास्करराव गटकळ दिंडोरी न्यायालय,दिंडोरी**

**अ.नं.८७/२०२४**

**दिंडोरी येथील मे.तहसिलदार साहेब,दिडोरी यांचे न्यायालयात**

**श्री.गणेश बाबुराव बेंडकुळे** **अर्जदार**

**विरुद्ध**

**ग्रामसेवक/ सरपंच, ग्रामपंचायत खेडगाव** **सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार नामे **श्री.गणेश बाबुराव बेंडकुळे** यांची मुलगी नामे **कु. सानिका गणेश बेंडकुळे** हिचा जन्म मु.पो.खेडगाव, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथे **दि:२८/०२/२०१८** रोजी झालेबाबत व तशी जन्माची नोद ग्रामपंचायत खेडगाव, ता. दिंडोरी यांचे जन्म-मृत्यु रजिष्टरला होऊन तसा दाखला अर्जदारांना मिळणेकामी अर्जदारांनी दिंडोरी येथील **मे.तहसिलदार साहेब** यांच्या न्यायालयात चौ.अ.नं.८७/२०२४ चा अर्ज जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९७६ चे कलम १३-३ अन्वये दाखल केलेला आहे,

त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी नामे **कु.सानिका गणेश बेंडकुळे** हिची जन्माची नोंद ग्रामपंचायत खेडगाव,ता.दिडोरी यांचे जन्म-मृत्यु रजिष्टरला होऊन तसा दाखला अर्जदारांना मिळणेकामी कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी या नोटीसीचे प्रसिध्दीनुसार तारीख **:०१/१०/२०२४** रोजी **सकाळी १०:३० वाजता** मे.तहसिलदार साहेब दिंडोरी, यांचे न्यायालयात स्वतःअगर वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, कसदर तारखेस उपस्थित राहून आपले म्हणणे न मांडल्यास, सदर अर्जदार यांचे जन्माचे नोंदीबाबत कोणाचेही काही एक म्हणणे नाही,असे समजण्यात येऊन अर्जदाराचे अर्जाप्रमाणे जन्म नोंदीबाबत पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील, याची नोंद घ्यावी. ही नोटीस आज **ता. ३०/०८/२०२४** रोजी या न्यायालयाचे सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक- तहसील दिंडोरी** (शिक्का) **तहसीलदार साहेब दिंडोरी, ता.दिंडोरी,जि.नाशिक**

# अटल भूजल योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार : गुलाबराव पाटील

**नाशिक : अटल भूजल योजना सध्या राज्यातील १३ जिल्ह्यांतील ११०० गावांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. येत्या काळात ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविली जावी, यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे दिली.**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्या वतीने नाशिकरोडच्या मित्रा संस्थेत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धा सन २०२२-२३ चा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील बोलत होते. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार भास्करराव भगरे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय खंदारे, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या आयुक्त श्रीमती पवनीत कौर, अतिरिक्त संचालक डॉ. विजय पाखमोडे आदी उपस्थित होते.



पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील म्हणाले की, ठिबक सिंचनामुळे पाण्याची ५० टक्के बचत होते. त्यामुळे ठिबक सिंचनाचा वापर वाढला पाहिजे. गावकऱ्यांना पाण्याचे महत्त्व पटल्यास निश्चितच गावांच्या भूजल संपत्तीत वाढ होणार आहे. या योजनेसाठी गावांमध्ये लोकसहभाग वाढला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

श्री. पाटील म्हणाले की, गावा-गावांमध्ये पाणी अडविणे ही काळाची गरज असून यातूनच शाश्वत पाण्याचे स्त्रोत निर्माण होणार आहेत. विहिरींचे पुनर्भरण करणे गरजेचे आहे. पाणी बचतीबाबत जागृती होणे आवश्यक आहे. राळेगणसिद्धी, हिवरेबाजार या गावांच्या पाणीदार पॅटर्नचा अभ्यास राज्यातील गावांनी केला पाहिजे. पुढील काळात शेती हीच नोकरी समजून, तिला व्यावसायिकतेची जोड देण्यासाठी पाणी अडविणे आणि त्यानंतर काटकसरीने वापर करणे हाच सर्वोत्तम उपाय आहे, असे त्यांनी सांगितले. पालकमंत्री दादाजी भुसे म्हणाले की, भूजलाची पाणी पातळी वाढविण्यासाठी जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी अटल भूजल योजनेसारख्या योजनांमध्ये सहभाग घेऊन पाणी पातळी वाढवावी. शासनाने नार-पार प्रकल्पास मंजुरी दिली आहे. यातून दुष्काळी भागात जलसमृद्धी होणार आहे. शासन ठिबक सिंचनासाठी अनुदान देत असते. यासाठी प्रलंबित असलेले अनुदान लवकरात लवकर शेतकऱ्यांना देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. पाण्याची पातळी कमी झालेल्या गावांना पाणी योजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करण्याची गरज आहे. विकासकामांसाठी गावांनी राजकीय स्पर्धा बाजूला ठेवून काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

डॉ. खंदारे म्हणाले, राज्यातील शेती तसेच पिण्याच्या पाण्याच्या योजना भूजलावर अवलंबून आहेत. त्यामुळे गावा-गावांमध्ये अटल भूजल योजनेसारख्या योजना राबविणे आवश्यक आहे. या योजनेच्या यशस्वितेसाठी लोकसहभागही महत्त्वाचा आहे. प्रास्ताविकात आयुक्त पवनीत कौर यांनी अटल भूजल योजनेची अंमलबजावणी व उपयुक्तता याबद्दल माहिती दिली. यावेळी पुरस्कारार्थींच्या वतीने कऱ्हाटी ग्रामपंचायतीच्या सरपंच दीपाली लोणकर, जरूड ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर मानकर, किरकसाल गावाचे माजी सरपंच अमोल काटकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अटल भूजल योजनेच्या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींच्या यशकथा सांगणाऱ्या दृश्यश्राव्य चित्रफितीही याप्रसंगी दाखविण्यात आल्या.

**अशा आहेत पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती:-**

लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन साध्य होण्यासाठी अटल भूजल योजनेंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जळगाव, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, जालना, लातूर, धाराशीव, अमरावती, बुलढाणा व नागपूर या जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला होता. राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार कऱ्हाटी (जि. पुणे, ता. बारामती), द्वितीय पुरस्कार जरूड (जि. अमरावती, ता. वरूड) व तृतीय पुरस्कार किरकसाल (जि. सातारा, ता. माण) या ग्रामपंचायतींना देण्यात आला. यात अनुक्रमे १ कोटी, ५० लाख व ३० लाख अशा राज्यस्तरीय पुरस्काराच्या रकमेचा समावेश होता. जिल्हास्तरीय पुरस्कारात प्रथम पुरस्कार – ५० लाख, द्वितीय – ३० लाख व तृतीय क्रमांकाचा पुरस्कार – २० लाख अशी बक्षिसांची रक्कम होती. जळगाव जिल्ह्यातील प्रथम पुरस्कार सावखेडे (ता. रावेर), द्वितीय पुरस्कार उंदिरखेडे (ता. पारोळा) व तृतीय पुरस्कार खिरोदा (ता. रावेर), पुणे जिल्ह्यातील प्रथम पुरस्कार कऱ्हाटी (ता. बारामती), द्वितीय सोनोरी व तृतीय चांबळी (रावेर), सातारा जिल्ह्यात प्रथम पुरस्कार किरकसाल (माण), द्वितीय निढळ व तृतीय मांडवे (खटाव), सांगली जिल्ह्यात प्रथम पुरस्कार नांगोळे, द्वितीय बोरगाव (कवठेमहांकाळ) व तृतीय वडगाव (तासगाव), सोलापूर जिल्ह्यात प्रथम पुरस्कार भेंड, द्वितीय लोढेंवाडी व तृतीय सोलंकरवाडी (माढा), नाशिक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार वडगावपिंगळा, द्वितीय दातली (सिन्नर) व तृतीय कनकापूर (देवळा), जालना जिल्ह्यात प्रथम पुरस्कार आंबा (परतूर), द्वितीय बोररांजणी व तृतीय हातडी (घनसावंगी), लातूर जिल्ह्यात प्रथम पुरस्कार हरगुंळ (लातूर), द्वितीय जाजनूर (निलंगा) व तृतीय वडवळ (चाकूर), धाराशीव जिल्ह्यात प्रथम पुरस्कार खेड (धाराशीव), द्वितीय खामसवाडी (धाराशीव) व तृतीय भगतवाडी (उमरगा), अमरावती जिल्ह्यात प्रथम पुरस्कार जरूड, द्वितीय झटामझरी (वरूड) व तृतीय अंबाडा (मोर्शी), बुलढाणा जिल्ह्यात प्रथम निपाणा, द्वितीय शेलगाव बाजार, तृतीय वरूड (मोताळा) व नागपूर जिल्ह्यात प्रथम खेडी गेवारगोंदी (नरखेडी), द्वितीय खुर्सापार (कटोल) व तृतीय डोर्ली भांडवलकर (कटोल) या गावांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कारांच्या माध्यमातून राज्यातील ३६ ग्रामपंचायतींना १३ कोटी ८० लाखांच्या पुरस्काराच्या रकमेचे वाटप करण्यात आले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका निफाड** पैकी **मौजे पालखेड** या गांवचे शिवारातील **गट नंबर ३५** यांसी क्षेत्र २.९८.०० हे. आर. चौ.मी. + पो.ख. ००.०१.०० हे. आर. चौ.मी. यांसी आकार रु ७-०८पै. यापैकी **राहुल कैलास शिंदे, लिलाबाई कैलास शिंदे** यांचे मालकीचे **क्षेत्र ०.४९.०० हे. आर. चौ.मी.** यांसी आकार रु १-१६ यांसी चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे.

सदर मिळकत **राहुल कैलास शिंदे, लिलाबाई कैलास शिंदे** यांचे मालकीचे क्षेत्र आहे. राहुल कैलास शिंदे, लिलाबाई कैलास शिंदे यांनी सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याचे खात्रीलायक सांगितले. सदर मिळकतीचे टायटल व्हेरीफीकेशनसाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सबब, सदरील मिळकतीत कोणाचेही, कुठल्याही, कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार जसे गहाण, दान, लिन, लिज, विसार पावती, करारनामा, साठेखत करारनामा, दावा, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, विकसनकरारनामा, जनरल मुखत्यारपत्र, बोजा, अथवा कोणताही दस्ताऐवज दिवाणी अगर महसुल कोर्टाचे विषय असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात) दिवसांचे आत** साक्षांकीत कागदपत्रानिशी आमचेकडे लेखी हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत अगर तक्रार न आल्यास सदर मिळकतीचे टायटल स्वच्छ, निर्वेध व बिनबोजाचे आहे, असे समजून तसा निर्वेधपणाचा दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेली व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस. दि.०९/०९/२०२४.

**महेश अशोकराव पवार,** ॲडव्होकेट
तळमजला, हिरामोहन संकुल, पिंपळगांव (ब), ता.निफाड, जि.नाशिक. मो.९९२३६९६५४५



## अभ्युदय को-ऑप. बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

नोंदणीकृत कार्यालय: ३६/२५१२, अभ्युदय नगर, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ४०००३३.

### सभासदांना सूचना

सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की **अभ्युदय को-ऑप. बँक लिमिटेडची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता, अभ्युदय बँक हॉल, अभ्युदय बँक बिल्डिंग, पहिला मजला, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई -** ४०० ७०३ येथे घेण्यात येणार आहे. सभेपुढील कामकाजाचे विषय खालील प्रमाणे आहेत.

१) दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन व तो कायम करणे.
२) दिनांक **३१ मार्च, २०२४** वर्ष अखेरचा लेखापरिक्षित ताळेबंद व नफातोटा पत्रक, प्रशासक मंडळाचा अहवाल व वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल यांस मान्यता देणे.
३) २०२३-२४ या वर्षाचा दीर्घ नमुन्यातील लेखापरिक्षीत अहवाल (**LFAR**) आणि तद्नंतर त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती घेणे .
४) २०२४-२५ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे, त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार प्रशासक मंडळास देणे. (रिझर्व बँकेच्या मंजूरीस अधीन राहून)
५) बँकेच्या सद्याच्या उपविधींमधील दुरुस्त्यांबाबत (वेबसाइटवर उपलब्ध आहे) प्रशासक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करणे व त्यास मान्यता देणे. (रिझर्व बँक व सेंट्रल रजिस्ट्रार यांचे मंजूरीस अधीन राहून)
६) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे २०२३-२४ या आर्थिक वर्षात येणेबाकी असलेल्या कर्जाची माहिती घेणे. (मल्टी स्टेट कॉ-ऑप सोसायटी ॲक्ट २००२ कलम ३९(३) अनुसार)
७) ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची, की ज्यांची नावे ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या हजेरी बुकात सभेस उपस्थित म्हणून नाहीत, अशा सभासदांची गैरहजेरी माफ करणे.
८) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

मा.प्रशासक मंडळाच्या आदेशावरुन

स्थळ : मुंबई
दिनांक : १० सप्टेंबर, २०२४

पी. एस. सालियन
मुख्य कार्यकारी अधिकारी

नोंद:-
१) सभेच्या नियोजित वेळेपासून अर्ध्या तासात आवश्यक ती गणसंख्या नसेल तर सभा उपविधी क्रमांक ३१ (iii) नुसार तहकूब करण्यात येईल व अशी तहकूब केलेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १०:३० वाजता घेण्यात येईल व त्या सभेमध्ये कामकाजाचे दिलेले विषय हाताळण्यात येतील.त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) सभासदांना वार्षिक जमाखर्च / ताळेबंद पत्रकासंबंधी कोणत्याही प्रकारची माहिती हवी असल्यास त्यांनी तसे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना के. के. टॉवर, जी. डी. आंबेकर मार्ग, परेल व्हिलेज, मुंबई -४०० ०१२ येथे दिनांक **२० सप्टेंबर, २०२४** पर्यंत लेखी कळवावे, जेणेकरून आवश्यक माहिती उपलब्ध करून देता येईल.
३) बँकेचे ओळखपत्र धारण करणाऱ्या सभासदांनाच वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होता येईल. ज्या सभासदांनी अजूनही ओळखपत्र प्राप्त केले नसेल त्यांनी आपले दोन "आयकार्ड" आकाराचे फोटो (३ से.मी X२ से.मी.) शेअर डिपार्टमेंट मध्ये जमा करून आपले ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे.
४) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या अधिकृत वेबसाइट वर उपलब्ध आहे.


# प्रेमाच्या आड येणाऱ्या सासूचा सुनेकडून खून

**नागपूर : विधवा सुनेने प्रेमाच्या आड येणाऱ्या सासूचा काटा काढल्याची घटना उघडकीस आली आहे.**

नागपूर येथील सुनीता राऊत या मुलगा अखिलेश, सून वैशाली आणि पाच वर्षांची नात स्विटीसोबत राहत होते. २०२३ मध्ये अखिलेशचा आजारपणात मृत्यू झाला. तेव्हापासून विधवा सून मुलगी व सासूसोबत राहायला लागली. एकाकी पडलेल्या वैशालीचे काही दिवसांत अनिल नावाच्या युवकासोबत सूत जुळले. तो तिच्या पतीचा मित्र होता. दोघांचे प्रेमसंबंध बहरल्यानंतर चोरुन भेटी व्हायला लागल्या. तो सासू बाहेर गेल्यावर घरी यायला लागला. विधवा सूनेच्या प्रेमसंबंधाची कुणकुण सासू सुनीता यांना लागली. त्यामुळे त्यांनी कुटुंबाची इभ्रत वाचविण्यासाठी सुनेची समजूत घातली. तरीही दोघांचे प्रेमसंबंध कायम होते. त्यामुळे सासू वारंवार तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिविगाळ करायची. त्यामुळे सुनेने सासूचा काटा काढायचे ठरविले. तिने आपले दोन्ही चुलत भाऊ श्रीकांत ऊर्फ समीर नरेंद्र हिवसे (२५) आणि रितेश प्रकाश हिवसे (२७, रा. भांडारगोंडी, ता. पांढुर्णा-मध्यप्रदेश) यांना कटात सहभागी करुन घेतले. सासूच्या मृत्यूनंतर दोन भूखंड आणि घर विकून पैसे मिळाल्यानंतर दोन लाख रुपये देण्याचे ठरविले. दोघांनीही सुनीता यांचा खून करण्यासाठी होकार दर्शविला. अजनीचे ठाणेदार नितीनचंद्र राजकुमार आणि लक्ष्मण केंद्रे यांना सुनीता राऊत यांच्या मृत्यूबाबत संशय आला.

घटनेच्या १२ दिवसांपर्यंत सूक्ष्म तपास केला. त्यांनी पाच वर्षांच्या मुलीला चॉकलेट-आईसक्रिम देऊन घटना विचारली. शेजाऱ्यांमध्ये जाऊन घटनेची चौकशी केली. वैशालीच्या हालचालींवर थोडा संशय बळावला. अंत्यसंस्कार झाल्यामुळे कोणताही धागा नसताना देखील तांत्रिक पुरावे गोळा केले. त्यात खात्री झाल्यानंतर वैशालीला ताब्यात घेतले. तिला वारंवार खोटे बोलत असल्याने तिला पोलिसी खाक्या दाखविल्या. त्यामुळे तिने सुपारी देऊन खून केल्याची कबुली दिली.

**असे घडले हत्याकांड**

सून वैशालीने २८ ऑगस्टला दोन्ही चुलत भाऊ रितेश आणि श्रीकांत यांना नागपुरात बोलावले. मध्यरात्री मागच्या दारातून घरात घेतले. वैशालीने सासूचे उशीने नाक–तोंड दाबले तर दोघांनी सासूचा गळा हाताने आवळला. मध्यरात्रीच दोघेही निघून गेले तर सूनेने दुसऱ्या दिवशी सासू हृदयविकाराच्या धक्क्याने मरण पावल्याचा बनाव केला. नातेवाईकांनीही सुनेच्या बोलण्यावर विश्वास करुन अंत्यसंस्कार पार पडले. अशा प्रकारे हत्याकांड दाबल्या गेले.


## Guru Gobind Singh Foundation's
# GURU GOBIND SINGH POLYTECHNIC

Khalsa Educational Complex, Wadala-Pathardi Road, Guru Gobind Singh Marg, Nashik-422009. Tel : (0253) 2376779, 7768004583 / 7768004584
Email ID: ggsp.nashik@ggsf.edu.in Website : www.ggsf.edu.in

**DTE CODE : 5240**

All Programme CE,CO,EE,EJ,ME have been Accredited by NBA, New Delhi (2012-15, 2017-20, 2020-23)

**ADMISSION TO FIRST YEAR DIPLOMA IN ENGINEERING**

**INSTITUTE LEVEL ADMISSIONS & PROBABLE VACANT SEATS AFTER CAP 2024-2025**

Applications are invited from eligible and aspiring candidates for admission to **First Year Diploma** courses in Engineering against **'Institute Level Seats' and 'Probable Vacant Seats after CAP'**. Blank application forms are available in the institute office.

**COURSES OFFERED**

| Course Name | Sanctioned Intake | DTE Choice Code |
|---|---|---|
| Civil Engineering | 90 | 524019110 |
| Computer Engineering | 120 | 524024510 |
| Electrical Engineering | 60 | 524029310 |
| Electronics & Tele. Com. | 60 | 524037210 |
| Mechanical Engineering | 120 | 524061210 |
| Mechatronics Engineering | 60 | 524099710 |

**ADMISSION TO DIRECT SECOND YEAR OF POST SSC DIPLOMA IN ENGINEERING 2024-2025**

Applications are invited from eligible and aspiring candidates for admission to Direct Second Year Diploma courses in Engineering against 'Probable Vacant Seats after CAP'.
Detailed information about branch wise vacancy and admission schedule will be made available on Institute Notice Board and Website from time to time for First year & Direct Second year.
**Eligibility:- for details of eligibility please refer to DTE Website.**
**First Year:- https://poly24.dtemaharashtra.gov.in/diploma24/**
**D. Second Year:- https://dsd24.dtemaharashtra.gov.in/dsd24/**
All Matters related to such admission will be handled by institute level admission committee.
**Note:-** It is mandatory to get documents verified & confirmed at Facilitation Centre for Institute level seats & probable vacant seats after CAP.


# संतप्त महिलांनी अवैध दारू दुकान पेटवले

**यवतमाळ: मारेगाव तालुक्यातील वनोजादेवी येथील बस थांब्याजवळ सुरू असलेले देशी, विदेशी दारूचे अवैध दुकान गावातील महिलांनीच पेटवून दिले.**

पोलीस, ग्रामपंचायतीला वारंवार विनंती करूनही या दुकानावर कारवाई होत नसल्याने संतप्त झालेल्या महिलांनी रविवारी सायंकाळी या दुकानात शिरून तेथील दारू व इतर साहित्य पेटवून दिले. या घटनेने खळबळ उडाली. वनोजादेवी येथे बस थांब्याजवळ अवैध दारू विकली जात असल्याने गावातील अनेक कुटुंबे व्यसनाधीनतेमुळे उद्ध्वस्त झाली. त्यामुळे गावातील महिलांनी एकत्र येत हे दुकान गावातून हटवण्याची मागणी वारंवार प्रशासनाकडे केली. मात्र त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. दारू विक्रेता मुजोरी करून दारू विकत होता. रविवारी या दुकानात नेहमीपेक्षा अधिक ग्राहक होते. याची माहिती मनसेच्या महिला तालुका प्रमुख उज्वला चंदनखेडे, वनोजा येथील मनसे युवाध्यक्ष रोशन शिंदे, सीमा शिंदे, उज्वला ढोके यांना मिळाली. त्यांच्या नेतृत्वात अनेक महिलांनी या दारू दुकानावर धाव घेतली. संतप्त महिला बघताच अवैध दारू विक्रेता चंद्रकांत सुधाकर भोसले (रा. नांदेपेरा, ता. वणी) हा घटनास्थळी मुद्देमाल सोडून पळून गेला.

यावेळी महिलांनी देशी दारूच्या ५२ आणि विदेशी मद्याच्या सहा बॉटल ताब्यात घेत दारूच्या दुकानास आग लावली.

# एटीएममधून पैसे काढणाऱ्या निवृत्त बँक अधिकाऱ्याची फसवणूक

**पुणे : एटीएममधून पैसे काढणाऱ्या निवृत्त बँक अधिकाऱ्याला मदत करण्याच्या बहाण्याने चोरट्यांनी ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला.**

याबाबत निवृत्त बँक अधिकाऱ्याने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ८१ वर्षीय बँक अधिकारी सिंहगड रस्ता परिसरात राहायला आहेत. ४ सप्टेंबर रोजी कामानिमित्त शास्त्री रस्त्यावर आले होते. शास्त्री रस्त्यावरील एका बँकेच्या एटीएममधून ते पैसे काढत होते. त्यावेळी एटीएममधून पैसे निघाले नाही. एटीएममध्ये त्यांच्या मागोमाग एक चोरटा शिरला होता. पैसे न निघाल्याने चोरट्याने त्यांना मदत करण्याचा बहाणा केला.

चोरट्याने त्यांच्याकडून एटीएम कार्ड घेतले. त्यानंतर चोरट्याने एटीएममधून पैसे काढण्याचा बहाणा केला. चोरट्याने त्याच्याकडील कार्ड त्यांना दिले. त्यांच्याकडील कार्ड चोरून चोरटा पसार झाला. काही वेळानंतर चोरट्याने कार्ड बदलल्याचे त्यांच्या लक्षात आले. कार्ड बंद करण्यासाठी ते बँकेत निघाले. चोरट्याने निवृत्त बँक अधिकाऱ्याच्या कार्डचा गैरवापर करून खात्यातून ५० हजार रुपये चोरून नेले. सहायक पोलीस निरीक्षक पवार तपास करत आहेत.

# सर्पदंशाने मायलेकींचा मृत्यू

**गोंदिया :** देवरी तालुक्यातील येळमागोदी गावात मध्यरात्री झोपलेल्या मायलेकींना विषारी सापाने दंश केला. त्यांना चिचगड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान दोघींचा मृत्यू झाला. या घटनेमुळे चिचगड परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. कमळाबाई सुखीराम उसेंडी (३०) रा.येळमागोदी, मंजु सुखीराम उसेंडी (०६) रा.येळमागोदी असे मृत मायलेकींची नावे आहेत. रविवारी मध्यरात्रीनंतर ही घटना घडली. कमळाबाई व तिची चिमुकली लेक मंजु हे दोघे जवळ-जवळ झोपले होते. रात्री २ वाजता सुमारास विषारी सापाने दोघांना दंश केला. दोघींना चिचगड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र कमळाबाईची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला लगेच गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले. मंजुवर चिचगड रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले. मात्र दोन्ही मायलेकींचा उपचारदरम्यान मृत्यू झाला.


## AUTHUM ऑथम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

रजि. ऑफिस: ७०७ रहेजा सेंटर फ्री प्रेस जनरल मार्ग, नरीमन पाईंट,
मुंबई-४०००२१, फोन-(०२२) ६७४७२११७, फॅक्स-(०२२) ६७४७२११८ ई-मेल: info@authum.com

**परिशिष्ट ४ अ (नियम ८ (६) मधील तरतूद पहावी) ई-लिलाव विक्रीसाठी जाहीर सूचना (परिशिष्ठ ४-अ) (नियम ८ (६)**

ऑथम इन्व्हेसमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांचेकडे गहाण असलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री (रिलायन्स होम फायनान्स लिमिटेडच्या धनकोंनी ठरविलेली वसुली योजना RBI Circular no. RBI/2018-2019/203.DBR no.BP.BC.45/21.04.048/2018-2019. प्रमाणे तणावग्रस्त मालमत्तेचे सामंजस्यपूर्वक वसुली मे.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३ मार्च२०२३ च्या आदेशाप्रमाणे व समभागधारकांनी दिनांक २५ मार्च २०२३ रोजी पारित केलेला विशेष ठरावाप्रमाणे. RHFL यांनी आपला संपूर्ण व्यवसाय चालू स्थितीत (going concern) मे.रिलायन्स कमर्शिअल फायनान्स यांचेकडे हस्तांतरीत केला आहे आणि त्याअर्थी कर्जदारांच्या सर्व कर्जाविषयी दायित्वे व अधिकार RHFL यांना प्राप्त झाले आहेत. ज्याअर्थी RHFL यांच्या कर्जवितरण व्यवसायाचे विलगीकरण होऊन (दिनांक १०/०२/२४ च्या NCLT आदेशाप्रमाणे) AIIL यांना तो सुपूर्द करण्यात आलेला आहे.) दि. रूबी, ११ वा मजला, नॉर्थ वेस्ट विंग, प्लॉट क्र. २९जे. के. सावंत मार्ग, दादर, मुंबई ४०००२८ व शाखा कार्यालय, अपबीट, को वर्क्स, द्वारा मोरेश्वर लक्ष्मणराव महाले, बंगला क्र. ७, पहिला मजला, गुरूदत्त को-ऑप हौसिंग सोसायटी, पारिजातनगर, नाशिक (मनपा) ४२२००५ SARFAESI ACT 2002 प्रमाणे.

ज्याअर्थी ऑथम इन्व्हेसमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारी यांनी कायद्याच्या कलम १३ (२) प्रमाणे सूचना (नोटीस) देऊन पुढील मालमत्ता यात उल्लेखिलेल्या कर्जखाते क्रमांकाप्रमाणे ताब्यात घेतलेल्या आहेत व कायद्याप्रमाणे जसे आहे जेथे आहे ''जसे आहे जे आहे'' ''जे काही आहे'' व ''अपरिवर्तन तत्त्वावर विक्री करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. त्याअर्थी खाली सही करणार हे ऑथम इन्व्हेसमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला येणे असलेल्या रकमेसाठी ई-ऑक्शन प्लॅटफॉर्मच्या www.bankeauctions.com या वेबसाईटद्वारे विक्री करणार आहेत.

| कर्जदार/सहकर्जदार/ जामिनदार | मागणी सूचना तारीख व रक्कम | प्रत्यक्ष ताबा तारीख एकूण येणे | राखीव किंमत/बयाणा रक्कम/ बोली वाढीची रक्कम |
|---|---|---|---|
| कर्जखाते क्रमांक RHAHNAS000015257 **शाखा: अपबीट को वर्क्स, द्वारा मोरेश्वर लक्ष्मणराव महाले, बंगला क्र. ७, पहिला मजला, गुरूदत्त को-ऑप हौसिंग सोसायटी पारिजातनगर, नाशिक (मनपा) ४२२००५** १. श्री. रवींद्र शिवाजी सैंदाणे २. श्रीमती शालिनी रवींद्र सैंदाणे | ११ जुलै २०१६ आणि रक्कम रुपये ६३,४१,३१६/- (त्रैसष्ट लाख एकेचाळीस हजार तीनशे सोळा रुपये मात्र) | ०३ नोव्हेंबर २०२३ ०३ सप्टेंबर २०२४ रोजी एकूण येणे रक्कम रुपये ३१,७१,७६८/- (एकतीस लाख एकतीस हजार सातशे अडूसष्ट रुपये मात्र) | रु. ८,८०,०००/- (आठ लाख ऐंशी हजार रुपये मात्र) बयाणा रक्कम ८८,०००/- (अठ्ठ्याऐंशी हजार रुपये मात्र) |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट क्र. बी-६, पहिला मजला, कुलस्वामिती हाईटस्, प्लॉट क्र. ६२, ६३, ६४ गट क्र. ५२ ४, अे २ १ २ ४ ५ ६ अे पार्ट, विंग बी एक्स्लो पॉईंट चुंचाळे शिवार अंबड लिंक रोड, ता.नाशिक, महाराष्ट्र - ४२२००९.

| मालमत्ता पाहणी/तपासणी तारीख | बयाणा रक्कमेची अंतिम तारीख | ई-लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|
| १८ सप्टेंबर २०२४ | २६ सप्टेंबर २०२४ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत | २७ सप्टेंबर २०२४ |

सर्व रक्कम डिमांड ड्राफ्टद्वारे ऑथम इन्व्हेसमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड नाशिक यांच्या नावाने किंवा RTGS द्वारे/NEFT द्वारे खाली तपशीलाप्रमाणे
अ) खात्याचे नाव ऑथम इन्व्हेसमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड CHD खाते ब) बँकेचे नाव: एचडीएफसी बँक लि. क) खाते क्र. ९९९९९९१७०७१९८३
ड) आएफएससी कोड-HDFC 0001119.

ऑनलाईन ई-लिलावाच्या अटी व शर्ती : १) '' जसे आहे जेथे आहे'' ''जे काही आहे'' आणि ''अपरिवर्तनीय (WITHOUT RECOURSE) ''तत्त्वावर ही मालमत्ता विक्री होणार आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या वॉरंटी इंडेम्निटी लागू नाहीत.
२) अधिक तपशील, मदत ऑनलाईन बिडिंग बद्दल मार्गदर्शनासाठी इच्छुक बोलीदारांनी संपर्क करावा. सेवा पुरवठादार मे. सी. १ इंडिया प्रा. लि., प्लॉट क्र. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४ गुडगाव, हरियाणा - १२२००३ (संपर्क क्र. ७२९१९८११२४, २५, २६) सहाय्यक ई-मेल: support@bankeauctions.com श्री. भाविक पंड्या मो. नं. ८८६६८२९३७. ई-मेल: Gujarat@c1india.com
(३) अधिक चौकशी व माहितीसाठी प्राधिकृत अधिकारी श्री. रणजित कुमार दुबे मो.नं. ९३२४६७११७५ यांच्याशी संपर्क साधावा.
(४) हे प्रगटन म्हणजेच वरील कर्जदार/गहाणदार/जामिनदार यांना त्यांच्या कर्जखात्याच्या वसुलीसाठी लिलाव विक्री करण्याबद्दल कायद्याच्या नियम ८ (६) प्रमाणे सुरक्षित व्याज सक्त वसुली २००२ प्रमाणे देण्यात येणारी १५ दिवसांची सूचना (नोटीस) समजावी.
तपशीलवार नियम अटीशर्तीसाठी कृपया वेबसाईटवर संपर्क करा. (कोड १७६८५५ वापरून NIT कागदपत्रे पहा.) (https://www.bankeauctions.com)

स्थळ; नाशिक
तारीख: १० सप्टेंबर २०२४

सही/- प्राधिकृत अधिकारी



# ATAL REALTECH LIMITED

**Corporate Identity Number: L45400MH2012PLC234941**
**Registered Office:** Unit No. 301 and 302, ABH Developers Town Square, S No. 744, Nashik, Maharashtra, India, 422002.
**Tel:** +91 253 - 2993859 | **Website:** www.atalrealtech.com | **Email:** atalrealtech@gmail.com, info@atalrealtech.com
**Contact Person:** Alok Singh, Company Secretary & Compliance Officer

## PROMOTER: MR. VIJAYGOPAL PARASRAM ATAL

**ISSUE OF 3,70,05,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 2.00/- (RIGHTS EQUITY SHARES) OF ATAL REALTECH LIMITED ("ARL" OR THE COMPANY OR THE "ISSUER") FOR CASH AT A PRICE OF ₹ 7/- (RUPEES SEVEN ONLY) PER RIGHTS EQUITY SHARE (INCLUDING A PREMIUM OF ₹5/- (RUPEES FIVE ONLY) PER RIGHTS EQUITY SHARE) ('ISSUE PRICE') FOR AN AMOUNT ₹ 2,590.35 LAKHS ON A RIGHTS ISSUE BASIS TO THE ELIGIBLE SHAREHOLDERS IN THE RATIO OF 1 (ONE) RIGHT SHARE FOR EVERY 2 (TWO) EQUITY SHARES HELD BY SUCH ELIGIBLE SHAREHOLDERS AS ON THE RECORD DATE, AUGUST 22, 2024 ('ISSUE'). THE ISSUE PRICE IS 3.5 TIMES THE FACE VALUE OF THE EQUITY SHARE. FOR FURTHER DETAILS, KINDLY REFER TO THE SECTION TITLED 'TERMS OF THE ISSUE' BEGINNING ON PAGE 121 OF THE LETTER OF OFFER.**

**NOTICE TO ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF OUR COMPANY**

| RIGHTS ISSUE PERIOD EXTENDED | |
|---|---|
| ISSUE CLOSING DATE (OLD) | ISSUE CLOSING DATE (NEW) |
| TUESDAY, SEPTEMBER 10, 2024 | WEDNESDAY, SEPTEMBER 18, 2024 |

**ASBA*** **Simple, Safe, Smart way of Application - Make use of it!!!**
***Application Supported by Blocked Amount (ASBA) is a better way of applying to issues by simply blocking the fund in the bank account, investors can avail the same. For further details read section on ASBA below.**

Please note that in accordance with provisions of applicable circulars issued by SEBI, all QIBs, Non-Institutional Investors and Retail Individual Investors complying with the eligibility conditions prescribed by SEBI, shall only invest in the Issue through ASBA process, unless otherwise permitted by regulatory authorities or under applicable law. Accordingly, all Eligible Equity Shareholders who (a) hold Equity Shares in dematerialized form, (b) have not renounced their Rights Entitlement in part or in full, and (c) are not Renouncees, shall use the ASBA process to make an application in the Issue. Eligible Equity Shareholders who have renounced their Rights Entitlement in part, Renouncees and Eligible Equity Shareholders holding Equity Shares in physical form are not eligible ASBA Investors and must apply for Rights Equity Shares only through the non-ASBA process, irrespective of the application amounts/applicant category.

ASBA Investors should note that the ASBA process involves application procedures that may be different from the procedure applicable to non-ASBA process. ASBA Investors should carefully read the provisions applicable to such applications before making their application through the ASBA process. ***For details, see "Terms of the Issue - Procedure for Application" on page 121 of the Letter of Offer.***

**This is to inform the Eligible Shareholders of the Company that the date of closure of the Rights Issue, which opened on Monday, 2nd September, 2024 and scheduled to close on Tuesday, 10th September, 2024 has now been extended by the Company from Tuesday, 10th September, 2024 to Wednesday, 18th September, 2024, vide the Board Meeting dated 9th September, 2024 in order to provide an opportunity to shareholders to exercise their rights in the Rights Issue.**

**ACCORDINGLY THE LAST DATE OF SUBMISSION OF THE DULY FILLED IN CAF (ALONG WITH THE AMOUNT PAYABLE ON APPLICATION) IS WEDNESDAY, 18TH SEPTEMBER, 2024. EQUITY SHAREHOLDERS OF THE COMPANY WHO ARE ENTITLED TO APPLY FOR THE RIGHTS ISSUE AS MENTIONED ABOVE ARE REQUESTED TO TAKE NOTE OF THE ISSUE CLOSURE DATE AS WEDNESDAY, 18TH SEPTEMBER, 2024. ACCORDINGLY, THERE IS NO CHANGE IN THE LETTER OF OFFER, ABRIDGED LETTER OF OFFER, ENTITLEMENT LETTER, APPLICATION FORM AND STATUTORY ADVERTISEMENT EXCEPT FOR THE MODIFICATION IN THE ISSUE CLOSING DATE AND THE RESULTANT CHANGE IN THE INDICATIVE TIMELINE OF THE POST ISSUE ACTIVITIES ON ACCOUNT OF CHANGE IN THE ISSUE CLOSING DATE.**

**For ATAL REALTECH LIMITED**
**Sd/-**
**Alok Singh**
**Company Secretary**

**Place:** Nashik
**Date:** September 10, 2024

## महत्त्वाचे

### आराई येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सप्ताहाचे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

बागलाण तालुक्यातील आराई येथे श्रीराम मंदिरात श्रीराम भजनी मंडळ आयोजित श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह व श्री गणरायांची स्थापना करून मोठ्या उत्साहात सुरु झाला. प्रारभी श्री गणेशजी व छत्रपती शिवाजी महाराजांची आरती केली जाते. सात दिवस चालणाऱ्या सप्ताहात रोज संध्याकाळी भव्य हरिपाठ होत असतो.हरिपाठाच्या कार्यक्रम बघायला गावातील सर्व महिला व ग्रामस्थ हजर असतात. त्याच प्रमाणे रोज रात्री ९वाजता जिल्ह्यातील नामांकित किर्तनकारांचा समाजप्रबोधन प्रवचनाचा कार्यक्रम ठेवला जातो. गावातील भजनी मंडळ, व सर्व सेवेकरी यांना दुपारी व संध्याकाळी वेगवेगळ्या अन्नदात्यांकडून भोजन दिले जाते. गावातील दानशूर व्यक्ती आपल्या पूर्वजांच्या स्मरणार्थ दैनंदिन किर्तन सेवेचा आर्थिक खर्च देत असतात. एकंदरीत सात दिवस चालणाऱ्या पारायण सप्ताह काळात संपूर्ण आराई गांव हरिनामात लीन होत असते. असा भव्य दिव्य सप्ताह सोहळा परिसरातील भाविकांना बघण्यासाठी नमस्ते वारकरी यु ट्यूब चॅनेल वर लाईव्ह सुद्धा बघायला मिळतो. सप्ताह अखेरच्या दिवशी सर्वांना सामुदायिक अन्नदान देऊन माऊलींचा पालखी सोहळा असतो. देव मामलेदार संतशिरोमणी यशवंतराव महारांजाच्या पुण्यपावन बागलाण प्रातांत हा अद्वितीय पारायण सोहळा आराई गावात बघायला मिळतो. खरं तर प्रत्येक गावात असे धार्मिक ऊत्सव होणे अत्यंत गरजेचे आहे. अशा धार्मिक कार्यक्रमातून नव्या पिढीस संत महतीची गोडी लागून धर्माची अत्याधिक ओढ लागण्यास चालना मिळेल.

### कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर प्रज्ञा वाघ हिची निवड



**सटाणा : प्रतिनिधी**

श्री शक्ती संस्था संचलित येथील डिव्हाईन स्कूलची विद्यार्थीनी प्रज्ञा पद्माकर वाघ या खेळाडूची ५७ किलो वरील वजनी गटात कुस्ती खेळात जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवित विभागीय स्तराला निवड झाली. तसेच शाळेतील १४ वर्षे आतील मुले - मुली तालुक्यांमध्ये बारा विद्यार्थ्यांचा सहभाग घेत महेश शेवाळे- ५२ किलो वजनगट, महेश कैलास शेवाळे- ५७ किलो वजनगट, नेहा नितीन अहिरे ५८ वजनगट, प्रज्ञा पद्माकर वाघ ५७ किलो वजनगट आदी खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. प्रज्ञा पद्माकर वाघ, नेहा नितीन अहिरे, देव पवार या सर्व खेळाडूंचे संस्थेचेअध्यक्ष डॉ. अपूर्व हिरे व संस्थेचे सचिव डॉ. दीपक सोनवणे, विश्वस्त जयसिंग दात्रे व मुख्याध्यापिका रेणुका सोनवणे, क्रीडाशिक्षिका मीना गायकवाड, मनोज चौधरी, वामन चव्हाण आदींनी अभिनंदन केले आहे.

### मखमलाबाद विद्यालयात श्री गणरायाची प्राणप्रतिष्ठा



**पंचवटी :**

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री गणरायाची प्राणप्रतिष्ठा मविप्र संचालक रमेश पिंगळे व शोभा पिंगळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडली. प्राचार्य संजय डेर्ले व ज्येष्ठ शिक्षिका सविता आहेर यांच्या हस्ते रमेश पिंगळे व शोभा पिंगळे यांचे स्वागत करण्यात आले. विघ्नहर्ता श्री गणरायाची प्रवेशद्वारापासून ते व्यासपिठापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर मंत्रोच्चारात विधीवत पूजा करण्यात आली. गीतमंचाने सुरेल अशी आरती सादर केली. शिक्षिका सायली मोरे व ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी यादव तांबे यांना वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्य राजेंद्र गाडे, ज्युनियर कॉलेज प्रमुख प्रा. उज्वला देशमुख, शालेय पंतप्रधान कु. स्वरुप पिंगळे, उपपंतप्रधान कु. सिध्दी पिंगळे, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व शालेय मंत्रीमंडळातील, गीतमंचातील विद्यार्थी उपस्थित होते.

# बासमती तांदळाच्या निर्यातीत १५% वाढ

## भारत हा जगातील बासमती तांदळाचा सर्वात मोठा उत्पादक आणि निर्यातदार

**लासलगाव : समीर पठाण**

**२०२३-२४ या आर्थिक वर्षात बासमती तांदूळ निर्यातीत भारताची उल्लेखनीय कामगिरी झाली आहे. शिपमेंट्स मध्ये १५% वाढ नोंदवली गेली जे विक्रमी ५.२४ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले तर मूल्याच्या दृष्टीने बासमती तांदूळ निर्यातीत २२% वाढ झाली आहे, जी ५.८३ अब्जच्या पुढे गेली आहे. भारत हा जगातील आता बासमती तांदळाचा सर्वात मोठा उत्पादक आणि निर्यातदार देश ठरला आहे.**



भारतातून परदेशात बासमती तांदळाची मागणी सध्या प्रचंड वाढली आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक आणि अमेरिकेत भारताच्या तांदळाला मोठी मागणी वाढली असून एप्रिल ते जुलैमध्ये बासमतीच्या निर्यातीत १५ टक्क्यांची वाढ झाली आहे.गेल्या वर्षी बासमती तांदळाची निर्यात साधारण १.७७४ अब्ज एवढी होती.

भारत हा जगातील बासमती तांदळाचा मोठा उत्पादक आहे. २०२३-३४ वर्षात भारतानं ५.८३ अब्जाहून अधिक किमतीचा सुगंधी तांदूळ निर्यात केला.ज्यापैकी दोन तृतीयांशाहून अधिक तांदूळ पश्चिम आशियामध्ये निर्यात झाला. द बिझनेस लाइनच्या अहवालानुसार भारताने यावर्षी एप्रिल-जुलै दरम्यान १९.१७ लाख टन बासमती तांदळाची निर्यात केली आहे तर वर्षभरापूर्वी याच कालावधीत १६.०९ लाख टन निर्यात झाली होती. म्हणजेच गतवर्षीच्या तुलनेत यंदा प्रमाणानुसार १९ टक्क्याने निर्यात वाढली आहे.

**सौदी अरेबीयाला बासमतीची निर्यात १९ टक्क्यांनी वाढली**

एप्रिल ते जुलैमध्ये सौदी अरेबीयाला ३.८१ लाख टन बासमतीची निर्यात करण्यात आली होती. तर वर्षभरापूर्वी हा आकडा ३.०३ लाख टन एवढा होता.ही निर्यात १९ टक्क्यांनी वाढली असून इराणमध्येही मागणी वाढल्यानं निर्यातीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले.

**अमेरिकेत बासमतीची निर्यात ४२ टक्क्यांनी वाढली**

भारतातून अमेरिकेला बासमती तांदळाची निर्यात तब्बल ४२ टक्क्यांनी वाढली आहे. यंदा भारतानं ९०,५६७ टन निर्यात केली असून मागच्या वर्षी ही निर्यात ६३७०० टन होती. अमेरिकेत सध्या सुगंधी बासमती तांदळाला मोठी मागणी असून मागील वर्षाच्या तुलनेत ४२ टक्क्यांनी निर्यात वाढली आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक आणि युनायटेड स्टेट्स सारख्या देशांच्या मागणीनुसार चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल–जुलै कालावधीत भारताच्या बासमती तांदळाची निर्यात जवळपास १५ टक्क्यांनी वाढून २.०३६ अब्ज झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत बासमतीची निर्यात १.७७४ अब्ज होती.

**सौदी अरेबीयाला बासमतीची निर्यात १९ टक्क्यांनी वाढली**

एप्रिल ते जुलैमध्ये सौदी अरेबीयाला ३.८१ लाख टन बासमतीची निर्यात करण्यात आली होती. तर वर्षभरापूर्वी हा आकडा ३.०३ लाख टन एवढा होता.ही निर्यात १९ टक्क्यांनी वाढली असून इराणमध्येही मागणी वाढल्यानं निर्यातीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले.



नाशिक : मविप्रच्या फार्मसी महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात सहभागी झालेले विद्यार्थी. समवेत मान्यवर व प्राध्यापकवृंद व वैद्यकीय पथक.

## मविप्रच्या फार्मसी कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर

**नाशिक : वार्ताहर**

**मविप्रच्या फार्मसी महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. डी. व्ही. डेर्ले यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढीचे प्रमुख नितीन गायकवाड आणि डॉ. श्रुतिका पवार उपस्थित होते.**

डॉ. श्रुतिका पवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व सांगत रक्तदानासाठी प्रोत्साहन दिले. तसेच, रक्तदानामुळे समाजातील गरजूंना होणारे फायदे, यावर माहिती देऊन प्रत्येकाला रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. प्रा. सावकारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. घनश्याम जाधव व डॉ. कृष्णा मुंडलोड यांनी परिश्रम घेतले.

शिबिरात सहभागी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे वैद्यकीय इतिहास तपासल्यानंतर त्यांना रक्तदानासाठी निवडण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श दिसून आला.

# कुटुंब, समाजव्यवस्थेवर व्यसनाधिनतेचा परिणाम : प्राचार्य डॉ. देशमुख

## मविप्र समाजकार्य महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियानाचे उद्घाटन

**नाशिक : वार्ताहर**

**नशा म्हणजे व्यसन. मोबाइलचे व्यसन, अंमली पदार्थांचे व्यसन, असे अनेक प्रकारचे व्यसन असते. माणसाला एखादी गोष्ट वारंवार करावीशी वाटणे व ती करणे, अन्यथा बेचैन होणे म्हणजे व्यसन. व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्तीच्या आयुष्याची वाताहत तर होतेच. पण ती व्यक्ती, तिचे कुटुंब व समाजव्यवस्थेवरही याचा गंभीर परिणाम होतो, असे प्रतिपादन मविप्रच्या समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले.**

समाजकार्य महाविद्यालयात आयोजित नशामुक्त भारत अभियानाच्या उद्घाटनाप्रसंगी 'व्यसनाधीनता व आजचा युवक' या विषयावरील कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. समाजकार्य महाविद्यालय, मन:शांती व्यसनमुक्ती केंद्र-इगतपुरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नशामुक्त भारत अभियानाचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर इगतपुरी येथील मन:शांती व्यसनमुक्ती केंद्राचे मुख्य संचालक हुकूमचंद पाटील, ट्रान्स्फोर्मेशन कोच, समुपदेशक रघुवीर नायक, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. घनशाम जगताप, महाविद्यालयातील 'नशा मुक्त भारत अभियान' कार्यक्रम समन्वयक प्रा. चंद्रप्रभा निकम आदी मान्यवर उपस्थित होते. राजश्री खडताळे हिने सूत्रसंचालन केले. कल्याणी माळी हिने आभार मानले. या कार्यक्रमात प्रशिक सोनवणे यांनी सर्वांना नशामुक्त भारत अभियान शपथ दिली. यावेळी प्रा. सोनल बैरागी, डॉ. प्रतिभा पगार, डॉ. मनिषा शुक्ल, प्रा. प्रतिमा पवार शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.





नाशिक : समाजकार्य महाविद्यालयात आयोजित नशामुक्त भारत अभियानाच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विलास देशमुख. व्यासपीठावर मान्यवर.

**मोबाइलचे व्यसन घातक : पाटील**

९५ टक्के समाजातील व्यक्तींना मोबाइलचे व्यसन जडले आहे. स्मार्ट फोन, लॅपटॉप यांचा अति वापर करतात. त्यामुळे त्याचे दुष्परिणाम होतात. त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते, शांत झोप लागत नाही, नातेसंबंधावर परिणाम होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नैतिक जबाबदारी घेऊन शाळकरी, किशोरवयीन मुले, तरुण यांच्यासोबत काम करा, त्यांना मोबाइलच्या अति वापरापासून परावृत्त करा, त्यांना मन:शांती व्यसनमुक्ती केंद्र, इगतपुरी येथे पाठवा. नशामुक्त भारत अभियानात सहभागी व्हा, असे आवाहन प्रमुख वक्ते हुकूमचंद पाटील यांनी केले.

**व्यसनामुळे आयुष्य बरबाद : नायक**

रघुवीर नायक म्हणाले, गुटखा, तंबाखू, व्हाइटनर, पेट्रोल, आयोडेक्स, लीगल ड्रग्ज म्हणून मान्यता असलेली दारू, अतिखाणे, अति टीव्ही पाहणे, गेम खेळणे, जुगार खेळणे यासारख्या व्यसनांमुळे शारीरिक, मानसिक, आर्थिक, अध्यात्मिक परिणाम दिसून येतात. बालपणी लागलेले व्यसन लवकर सुटत नाही आणि व्यक्तीचे आयुष्य बरबाद होते. सामाजिक कलंक लागतो, नातेवाइक, समाज जवळ येत नाही, सहकार्य करत नाही. मानसन्मान मिळत नाही, असेही प्रतिपादन नायर यांनी सांगितले.

**देशभरात २७२ जिल्ह्यांमध्ये अभियान**

भारतात केंद्रशासित प्रदेशांसह ३२ राज्ये, २७२ जिल्हयांमध्ये शाळा, महविद्यालये, विद्यापीठे तसेच समूहांमध्ये प्रभावी काम व अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक न्याय, सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकारने नशामुक्त अभियानाची सुरुवात केली. यामध्ये ५०० पेक्षा जास्त सामाजिक संस्थांचा सहभाग आहे. महिला, पुरुष, मुले, विद्यार्थी व स्वयंसेवक यात जोडले गेले आहेत.

### चक्रधर स्वामी अवतार दिन साजरा

**नाशिक : वार्ताहर**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या गंगापूर रोडवरील मराठा हायस्कूलमध्ये शिक्षक दिन व श्री चक्रधर स्वामी अवतार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल व रामनाथ रायते उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. आजचा हा कार्यक्रम सकाळ सत्र व दुपार सत्र या दोन्ही सत्रात घेण्यात आला. सकाळ सत्रात इयत्ता सहावी अ च्या वर्गाने सदर कार्यक्रम सादर केला. तर दुपार सत्रात इयत्ता दहावी ल च्या वर्गाने हा कार्यक्रम सादर केला. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला व शिक्षकांप्रती आदर व्यक्त केला. आजच्या या कार्यक्रमात सर्व शिक्षकांचा पेन, भेटकार्ड व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

## मानसिक शांतीसाठी वाचन आवश्यक : डॉ. चौधरी

**नाशिक : प्रतिनिधी**

**आजच्या आधुनिक युगात हाती मोबाइल आल्यापासून अभ्यासाची पुस्तके वगळता अन्य पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांकडून कमी झाले असल्याचे दिसून येते असले तरीही आपल्याला जी-वनात यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थी दशेपासूनच वाचनाची गोडी लागणे आवश्यक आहे. प्रत्येकालाच मानसिक शांती जशी आवश्यक आहे तसे वाचनही गरजेचे असल्याचा सल्ला नाशिक पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी विद्यार्थ्यांना दिला.**



मुख्यमंत्री माझी शाळा सुदंर शाळा उपक्रमाचे मागील वर्षाचे तालुकास्तरावरील प्रथम पारितोषिक पटकाविणाऱ्या येथील देवळाली हायस्कुलमध्ये नाशिक पंचायत समिती शिक्षण विभागाच्यावतीने समग्र शिक्षा अभियानांतर्गत तालुकास्तरीय 'ग्रंथ प्रदर्शन व पुस्तक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी डॉ. चौधरी विद्यार्थ्यांशी संवाद साधत होत्या. व्यासपीठावर शिक्षण विस्तार अधिकारी बी. डी. जगताप, विषयतज्ज्ञ एस. पी. भाबड, भगूर केंद्रप्रमुख एस. डी. सूर्यवंशी, मुख्याध्यापक हेमंत मोजाड, उपमुख्याध्यापिका लतीफा खान, पर्यवेक्षिका वंदना पेंढारकर आदी ऊपस्थित होते. तत्पूर्वी शाळेत टाळ मृदूंगाच्या गजरात ग्रंथदिंडी काढण्यात आली. मोनिता लोखंडे, मनीषा सेवलीकर, किशोर शिंदे, वैशाली जाधव, आरती ठोके, चंद्रकांत आहिरे, श्रद्धा बऱ्हे आदींनी परिश्रम घेतले.

## लासलगाव महाविद्यालयात करिअर कट्टा कार्यशाळा

**लासलगाव : वार्ताहर**

**येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र विद्यार्थी तंत्र सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा आयोजित विद्यार्थी संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**



सदर कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र समिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक वृत्ती निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांमधून रोजगार देणारे हात निर्माण व्हावे व विविध स्पर्धा परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांनी करावी हा हेतू समोर ठेवून करिअर कट्ट्याची स्थापना केल्याचा हेतू विशद केला तसेच महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी करीअर कट्यांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अदिनाथ मोरे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी करिअर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ. आर. डी. खुर्चे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. भूषण हिरे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ.संजय निकम उपस्थित होते. सूत्रसंचालन मानसशास्त्र विभागाचे प्रा. किशोर अंकुळनेकर यांनी केले. तर आभार स्पर्धा परीक्षा विभाग सदस्य डॉ. मारोती कंधारे यांनी मानले.

## निधन वार्ता

### छगन खैरनार

**नाशिक : वार्ताहर**



काठे गल्ली येथील पंचायत समितीचे सेवानिवृत्त तालुका मास्तर छगन त्र्यंबकशेठ खैरनार (८२) मूळ रा. निवाणेकर यांचे वृद्धाकाळाने निधन झाले. रायगड जिल्ह्य शिंपी समाजाचे ज्येष्ठ सल्लागार बापूराव खैरनार यांचे थोरले बंधू व विठ्ठल मंदिर ट्रस्टचे सहसंघटक महेंद्र खैरनार यांचे ते वडील होत.

### वाळू अपसुंदे

**दिंडोरी प्रतिनिधी**



दिंडोरी तालुक्यातील जांबुटके ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व वाघाड पाणी वापर संस्थेचे संस्थापक संचालक वाळू खंडेराव अपसुदे (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले व मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शुयमा ब्राह्मण संस्थेच्या पुरस्कारांचे दिमाखदार वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

**शुयमा ब्राह्मण संस्था नाशिकचे, यजुर्वेद मंदिरातील, कै बिंदू रामराव देशमुख सभागृहात २ विशेष पुरस्कार, ३० दीपस्तंभ आणि ३ कैवल्य पुरस्कारांचे वितरण प्रमुख पाहुणे प्रभाकर मोराणकर, सी. एल. कुलकर्णी, माधुरी कुलकर्णी, रुपाली जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.**



प्रमुख पाहुणे, डॉ शामा कुलकर्णी, सुहास भणगे, जोशी, रुपाली जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. सुरवातीला दीपप्रज्वलन, महर्षी याज्ञवल्क्य यांच्या तसेच देणगीदार हरिश्चंद्र (आबा) देशमुख, लता इंगे, राधाबाई मुरलीधर अधृंटकर, मुरलीधर नारायण अधृंटकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी पं. रवींद्र देव, पं. उपेंद्र देव, पं. वैभव दीक्षित, पं. आंबेकर गुरुजी यांनी मंत्रघोष केला. सन्मानपत्र, पुणेरी पगडी, शाल असे सत्काराचे स्वरूप होते. सत्कारमूर्तींचे सौभाग्यवतींना शाल ओटी याने सन्मानित करण्यात आले. संस्था कार्याध्यक्ष तुषार जोशी यांनी सर्वांचे स्वागत केले. संस्था कार्यवाह भानुदास शौचे यांनी प्रास्ताविक केले. संस्था अध्यक्ष सतीश शुक्ल यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. राजश्री शौचे यांनी आभार मानले. उदय जोशी यांनी कैवल्य पुरस्कार आणि राजश्री शौचे यांनी दीपस्तंभ पुरस्कार सन्मानपत्राचे वाचन केले.

सूत्रसंचालन रोहिणी कुलकर्णी यांनी केले. सत्कारमूर्ती यांचा परिचय सह कार्याध्यक्ष पं. वैभव दीक्षित, उदय जोशी, मंजुषा अगस्ते, ऋत्विका शौचे, दीपक कुलकर्णी, राजश्री कुलकर्णी, राजन कुलकर्णी, रत्नप्रभा गर्गे यांनी करून दिला.

त्रंबकेश्वर ब्राह्मण संस्था अध्यक्ष ॲड. श्रीकांत गायधनी, मालेगाव ब्राह्मण संस्था अध्यक्ष नंदकुमार पाठक तसेच शुयमा ब्राह्मण सबस्थेचे सतीश शुक्ल, अनिल देशपांडे, गणेशोत्सव कार्याध्यक्ष अवधूत कुलकर्णी, पं. वैभव दीक्षित, राजश्री शौचे, पं. रवींद्र देव, पं उपेंद्र देव, महेंद्र गायधनी, ऋत्विका शौचे, मंजुषा अगस्ते, उदय जोशी, राजश्री कुलकर्णी, अवधूत कुलकर्णी, दीपक कुलकर्णी, उपेंद्र शुक्ल, स्मिता जोशी, शुभांगी कुलकर्णी, अनिता कुलकर्णी, शांता जाधव, गजानन जाधव यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# आयटीआयच्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी

## मविप्र आयटीआयमध्ये गुरुवारी भव्य रोजगार मेळावा

**नाशिक : वार्ताहर**

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध ट्रेडचे प्रशिक्षण घेत असलेल्या किंवा प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नाशिकमधील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मराठा विद्या प्रसारक संस्थेने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.**

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये येत्या गुरुवारी (दि.१२) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत आयटीआय विविध ट्रेड उत्तीर्ण किंवा ॲपियर, (अंतिम परीक्षेस बसलेल्या) विद्यार्थ्यांसाठी प्रेंटिस/ ट्रेनिंगसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये नाशिक येथील सातपूर, अंबड एमआयडीसीमधील नामांकित महिंद्रा महिंद्रा, बॉश, बजाज सन्स लिमिटेड व इप्कॉस टीडीके (ढउ्य) या कंपन्या सहभागी होणार आहेत. या मेळाव्यात विविध कंपन्यांचे व्यवस्थापन अधिकारी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेणार आहेत. यात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी 'मराठा विद्या प्रसारक समाज संचलित औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उदाजी मराठा बोर्डिंग आवार, माणिकनगर, गंगापूर रोड नाशिक - १३' या ठिकाणी मुलाखतीसाठी उपस्थित राहून नोकरीसाठीच्या या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व संस्थेचे पदाधिकारी, संचालक, शिक्षणाधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ७५८८०१३०८३, ९०२८११२८३५, ९४२३१३७१४०, ७५८८५५१६३७ या मोबाइल क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य आर. बी. पाटील यांनी केले आहे.

विशेष



## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे तहसीलदारांना निवेदन

**सिन्नर : प्रतिनिधी**

राज्यात शिक्षकदिनाचा उत्साह असताना कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी शासनाचा निषेध म्हणुन अन्यायदिन साजरा केला. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांतर्फे विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे समन्वयक प्रा.अशोक गुरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देत शिक्षकांच्या तातडीच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. यात १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अर्धवेळ, विनाअनुदानित, तसेच अंशत: अनुदानावरील नियुक्त शिक्षकांना, तसेच १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. मान्यताप्राप्त आयटी शिक्षकांचे समायोजन, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा कार्यभार सतत तीन वर्ष कमी झाला किंवा शून्य झालं तरच अतिरिक्त घोषित करावे. कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्यांना पदोन्नती वेतन वाढ, अर्धवेळ शिक्षक पूर्णवेळ झाल्यावर त्यांच्या अर्धवेळ सेवेचा कालावधी वेतनवाढ, इतर लाभांसाठी ग्राह्य धरावा अशा विविध १८ मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी प्रा. आर. टी सोनवणे, प्रा जी. एच. कोळी, प्रा. एस. जी. भागवत, प्रा. अजय पानसरे, प्रा. के. आर. काळे, प्रा. सुनील शिंदे, प्रा. डी. जे. पगार, प्रा. डी. आर. आरोटे, प्रा. एस. डी. पगार, श्रीमती आर. पी. कदम, श्रीमती बाजारे, श्रीमती सोनवणे, श्रीमती कढणे, श्रीमती शिंदे, श्रीमती जाधव असे अनेक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक उपस्थित होते.



## ईरा इंटरनॅशनल स्कुलमध्ये शाडूमाती गणेश कार्यशाळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील ईरा इंटरनॅशनल स्कुलमध्ये नर्सरी ते इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शाडु मातीपासून गणेश मुर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी शाडु मातीपासुन गणेशमुर्ती बनविल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासासोबतच व्यक्तीमत्व विकास घडतो असे प्रतिपादन प्राचार्य राजेंद्र शिंदे यांनी केले. शाळेच्या कलाशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे शाळेत शाडुमातीच्या गणेशमुर्तीचीच स्थापना करण्यात आली. कलेमध्ये आवड असणाऱ्या काही शिक्षकांनी या कार्यशाळेत आपला सहभाग नोंदवला. कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक किरण मोरे, इंजी. मयुर आव्हाड, प्राचार्य राजेंद्र शिंदे, सि. ई. ओ. संगीता नय्यर, पुर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सरिता सिंग आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## दापूर शाळेतील शिक्षकांचा गौरव

**सिन्नर : प्रतिनिधी**

दापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शिक्षक दिनानिमित्त शाळेतील मुख्याध्यापक जाधव, तसेच शिक्षक कदम, श्रीमती राजपूत, जाधव, कोकाटे, गोराडे, झनकर, नीता वायळ आदी सर्व शिक्षकांचा सत्कार शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अमोल आव्हाड यांनी केला. तसेच सर्व गुरुजन वर्गाकडून शाळेतील मुलांची समाजाची व देशाची चांगली सेवा घडो अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## शिवराज मावळे मंडळाची आदर्श गणेश स्पर्धा

**सिन्नर : प्रतिनिधी**



शहरातील आडवा फाटा येथील शिवराज मावळे मित्र मंडळाच्यावतीने आदर्श गणेश मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णानंद कासार यांनी दिली. आमदार पुरस्कार २०२४ आदर्श गणेश मंडळ स्पर्धेत आकर्षक मुर्ती, आदर्श नियोजन आणि भव्य देखावा परिक्षण दरम्यान विचारात घेतला जाणार आहे. स्पर्धेतील प्रथम विजेत्यास रु. ७००७, द्वितीय विजेत्यास रु. ५००१ तर तृतीय क्रमांकास ३००१ रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १२ सप्टेंबर २०२४ पर्यंत ९८८१४५००४६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई अन्यायकारक

### स्टाईस ७ एकरावर सीईटीपी प्लान्ट उभारणार असल्याची चेअरमन आवारे यांची माहिती

**सिन्नर : प्रतिनिधी**

**इतरत्र जमीनी उपलब्ध नसल्याने सिन्नरला मोठ्या प्रमाणात उद्योग वाढीस वाव आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने रासायनिक कंपन्यांना क्लोजर नोटीसा देणे अन्यायकारक असून शेतकरी आणि शासनाने स्टाईसला वेळ दिल्यास तातडीने ७ एकरावर ५ लाख लिटर क्षमतेचा सीईटीपी प्लान्ट उभारुन रासायनिक कंपन्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची समस्या दूर करण्याचे आश्वासन स्टाईसचे चेअरमन नामकर्ण आवारे यांनी पत्रकार परिषदेत दिले.**



सीईटीपी प्लान्टचा डीपीआर तयार करण्यात आला असून त्यासाठी शासनाच्या पायाभूत सुविधा योजनेतून २४ कोटींचा निधी उभारला जाणार असल्याची माहिती आवारे यांनी यावेळी दिली. याशिवाय हा प्रकल्प उभारल्यानंतर नियम न पाळणाऱ्या उद्योगांवर कारवाई करण्यासाठी स्टाईस स्वतः पुढाकार घेईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

१०० एकरावर रसायन मिश्रीत पाण्याची समस्या असून ती दूर करण्यासाठी स्टाईस सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ क्लोजर नोटीसा देऊन अतातायीपणा करत असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रदूषण नियंत्रण मंडळाने टोकाची भुमिका घेतल्यास उद्योग इतर राज्यात चालले जातील त्यामुळे १५५० कामगारांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण होईल अशी भिती त्यांनी व्यक्त केली.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नव्या नियमावलीनुसार झीरो डिस्चार्ज प्लान्टचा खर्च कोटींच्या घरात असून लघु आणि मध्यम उद्योगांना तो परवडणारा नाही. त्यामुळे सीईटीपी प्लान्ट उभारण्यासाठी पुढाकार घेतल्याची माहिती उद्योजक श्रीकांत करवा यांनी दिली.

रासायनिक कारखान्यांमुळे प्रदूषणाची समस्या मुसळगाव सारखीच माळेगाव औद्योगिक वसाहतीतही निर्माण झाली होती. मात्र तेथील उद्योगांनी ईटीपी प्लान्ट सुरु केल्याने ती मार्गी लागली. मुसळगावमध्ये रासायनिक उद्योगांना क्लोजर नोटीस न देता एक वर्षाची मुदत द्यावी, त्यामुळे येथील उद्योग बाहेर जाणार नाही आणि रोजगाराची समस्याही भेडसावणार नाही अशी अपेक्षा सिमाचे सचिव बबन वाजे यांनी व्यक्त केली.

केमिकल कंपन्यांमुळे होणारे प्रदूषण, त्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी ईटीपी प्लान्ट गरजेचा आहे. मोठ्या उद्योगांना ते शक्य असले तरी छोट्या उद्योगांना ही बाब महागडी आहे त्यामुळे सिन्नर एन्व्हायरो फाऊंडेशनच्या माध्यमातून स्टाईसने सीईटीपी प्लान्ट सुरु करण्याचा निर्धार केला आहे. मात्र त्यासाठी शासनाने वेळ वाढवून देणे आवश्यक असल्याचे मत साईटेक कंपनीचे संचालक प्रविण गद्रे यांनी व्यक्त केले.

यात्रसंगी व्हा. चेअरमन सुनील कुंदे, संचालक कैलास वाकचौरे, अरुण चव्हाणके, अतुल अग्रवाल, नवनाथ निफाडे, व्यवस्थापक कमलाकर पोटे आदींसह उद्योजक उपस्थित होते.

### आमदार कोकाटेंच्या पुढाकाराने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य

रासायनिक उद्योगांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयापुढे साखळी उपोषण सुरु केले होते. त्यांच्या मागण्यांची दखल घेत उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आमदार माणिकराव कोकाटे यांनी टँकरद्वारे शेतकऱ्यांना आणि त्यांच्या जनावरांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. त्याचप्रमाणे तालुका कृषी अधिकाऱ्यांमार्फत रब्बी हंगामातील पिकांच्या भरपाईची रक्कम उद्योजकाने देण्याचे तत्वतः मान्य केले. शेतकऱ्यांच्या मुलांना नोकऱ्या उपलब्ध करुन द्याव्यात अशा सूचना स्टाईसच्या पदाधिकाऱ्यांना केल्या. संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेरील दोन रबर उद्योग तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले.

### सिन्नर एन्व्हायरो फाऊंडेशनची स्थापना

रासायनिक कंपन्यांचे ४ प्रतिनिधी आणि स्टाईसचे अध्यक्ष अशा ५ सदस्यांचा समावेश असलेले सिन्नर एन्व्हायरो फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. त्यामाध्यमातून ७ एकरावर ५ लाख लिटर क्षमतेचा सीईटीपी प्लान्ट उभारला जाणार आहे. पायाभूत सुविधा विकास योजनेतून ७५ टक्के रक्कम शासनाकडून उपलब्ध केली जाणार आहे तर २५ टक्के रक्कम संस्था खर्च करणार असल्याची माहिती चेअरमन आवारे यांनी दिली.

# सिन्नर-नाशिक मार्गावर धावणार इलेक्ट्रीक बस

### रात्री ८ वाजेपर्यंत सेवा देण्याची मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**



महाराष्ट्र ई-वाहन धोरण सन २०२१ नुसार परिवहन महामंडळातील किमान १५ टक्के वाहने ही इलेक्ट्रिक प्रकारातील राहतील असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक-सिन्नर मार्गावरही ही सेवा सुरु करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मात्र, सिन्नरला दुपारी ४.२५ पर्यंतच बससेवेचा वेळ असून हा वेळ वाढवून रात्री ८ वाजेपर्यंत करण्याची मागणी प्रवासी संघटनेकडून करण्यात आली आहे. राज्यातील जनतेला पुरेशा प्रमाणात व पर्यावरण पुरक सेवा देण्याच्या उद्देशाने महामंडळाने ५१५० इलेक्ट्रिक बस रस्त्यावर आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात नाशिक विभागात १४ ई- बसेस सुरु करण्यात आल्या आहेत.

या बस नाशिक-बोरीवली, नाशिक- सप्तश्रृंगी गड या मार्गावर सुरु झाल्या आहेत. तर दुसऱ्या टप्प्यात १० ई- बसेस प्राप्त झाल्या आहेत. या बस नाशिक-शिर्डी, नाशिक-सिन्नर व नाशिक-त्र्यंबक मार्गावर सुरु करण्यात आल्या आहेत. सकाळी ५ तेरात्री १० वाजेपर्यंत दर एक तासाच्या अंतरानेया बस सुरु राहणार आहेत. सिन्नर व शिर्डीसाठी असलेल्या बसेस ठक्कर बसस्थानक व महामार्ग बसस्थानक येथुन सुरु झाल्या आहेत. या बस सेवेमध्ये ५ ते १० वर्षापर्यंतच्या मुलांना अर्ध्या तिकीटाची सवलत असणार आहे. तसेच महिला, जेष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती व त्यांचे साथीदार, अर्जुन, द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थी, विद्यमान तसेच माजी विधानसभा/विधान परिषद सदस्य, अधिस्विकृतीधारक पत्रकार, शहीद सन्मान योजने अंतर्गत शहीद जवानांच्या विरपत्नी यांना सवलतीच्या दराने प्रवास करता येणार आहे. सकाळी ५ वाजेपासून एक तासाच्या फरकाने या बस नाशिकहून सिन्नर, त्र्यंबकेश्वरसाठी नवीन सीबीएस बसस्थानकावरून सुटणार आहेत. शिर्डीसाठी सकाळी ६.३०, ७, ८ वाजता, दुपारी ३, ३.३०, ४.३० वाजता व अखेरची बस सायंकाळी ८ वाजता सोडली जाणार आहे.

### नियमित प्रवाशांची सोय

सिन्नरहून नाशिकला दररोज हजारो नागरिक कामानिमित्ताने ये-जा करतात. त्यामुळे परिवहन मंडळाला या मार्गावर चांगले उत्पन्न मिळते. नव्याने सुरु झालेल्या ई-बसेसचा सिन्नर-नाशिक मार्गावरचा वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ४.१५ पर्यंतचाच आहे. मात्र, दररोज ये-जा करणाऱ्या नोकरदारांचे काम सुटण्याची वेळ है ही ५.३० ते ६.३० पर्यंतची आहे. त्यामुळे या बसेस किमान ८ वाजेपर्यंत सुरु रहाव्यात अशी मागणी प्रवासी संघटनेने केली आहे.



# भोकणी येथे केंद्रीय जलशक्ती पथकाची भेट

### अटल भुजल योजनेच्या कामकाजाची केली पाहणी

**भोकणी : वार्ताहर**

सिन्नर तालुक्यातील भोकणी येथे अटल भूजल योजने अंतर्गत भूजल सर्वेक्षण विभाग भारत सरकारच्या जलशक्ती केंद्रीय पथकाने नुकतीच भेट दिली.

भोकणी ग्रामपंचायतने अटल भूजल योजने अंतर्गत पाझर तलाव, बंधारा, पाझर तलावातील गाळ उपसा, मग्रारोहया अंतर्गत मिशन भगीरथ, प्रयास स्माशनभुमी, पाझर तलाव दुरुस्ती, स्वच्छ भारत अंतर्गत पाझर खड्डे शोषखड्डे, विचार शाप, मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत पाझर तलाव, बंधारा दुरुस्ती, अस्तरीकरण सांडवा बांधकाम, खोलीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, शासकीय इमारत आदी कामांची पाहणी केंद्रीय पथकाकडून करण्यात आली.

या पथकात केंद्र सरकारचे सहसचिव नितीन खाडे, केंद्रीय भूजल मंडळाचे वैज्ञानिक कुमार नंदा, जलशक्ती मंत्रालयाचे गिते, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे भूवैज्ञानिक कांबळे आदी अधिकारी उपस्थित होते.

भोकणी गाव व गावांतर्गत भूजल सर्वेक्षणासंदर्भात झालेली कामे भूजल पातळी वाढविण्यासाठी उपयुक्त असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी भोकणी ग्रामपंचायतचे सरपंच अरुण वाघ, सदस्य शरद साबळे, ग्रामसेवक योगेश राहाणे, ग्रामपंचायत कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, महिला बचत गटाच्या सदस्या व ग्रामस्थ उपस्थित होते.

# तीस गावांतील ४९ नवबौद्ध व दलित वस्त्यांचा होणार कायापालट

### आमदार कोकाटेंच्या प्रयत्नातून ३.८० कोटींचा विकासनिधी मंजूर

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ३० गावांतील ४९ नवबौद्ध व दलित वस्त्यांच्या विकासासाठी आमदार माणिकराव कोकाटे यांच्या प्रयत्नांतून ३ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

नाशिक जिल्हा परिषदेत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांच्या विकास करण्यासाठी ग्रामपंचायत मार्फत प्रस्ताव बनवून ते जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात सादर करण्यात आले होते. या प्रस्तावांना मंजुरी देण्याची शिफारस आमदार माणिकराव कोकाटे यांनी केली. त्यानुसार जिल्हा परिषदेने नुकतीच या कामांना मंजुरी दिली आहे. त्यानुसार ग्रामीण भागात रस्ते काँक्रीटीकरण, पाण्याची सुविधा, भूमीगत गटार व स्ट्रीट लाईट आदी कामे होणार आहेत. त्यामुळे या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण होणार आहेत.

ब्राम्हणवाडे येथील पंचशील नगर येथे ५ लक्ष व आंबेडकर नगर येथे १५ लक्ष रुपये निधीतून रस्ता काँक्रीटीकरण, दोडी खु येथील राजवाडा येथे भूमिगत गटारसाठी ५ लक्ष रुपये निधी, हिवरगाव येथील राजवाड्यात भूमिगत गटारसाठी ३ लक्ष रुपये, लोणारवाडी येथे अण्णाभाऊ साठे नगर ४लक्ष व आंबेडकर नगर येथे ३ लक्ष रुपये रस्ता काँक्रीटीकरणसाठी, मनेगाव येथील आंबेडकर नगर येथे रस्ता काँक्रीटीकरणसाठी ५ लक्ष रुपये, मुसळगाव येथील काँक्रीटीकरणसाठी पंचशील नगर येथे ५ लक्ष व आंबेडकर नगर येथे १० लक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथे पाणीपुरवठ्यासाठी १० लक्ष, मिरगाव राजवाडा येथे पाणीपुरवठ्यासाठी ५ लक्ष,मिठसागरे राजवाडा येथे रस्ता काँक्रीटीकरणसाठी १० लक्ष,निमगाव देवपूर येथे भूमिगत गटारसाठी ५ लक्ष रुपये,पाथरे खु राजवाडा येथे सार्वजनिक शौचालयासाठी ५ लक्ष,सायाळे येथे गोरेवाडी पाणीपुरवठा ५ लक्ष, वडांगळी राजवाडा येथे रस्ता काँक्रीटीकरण १० लक्ष, वडझिरे गौतम नगर येथे भूमिगत गटारसाठी ५ लक्ष, कोळगाव माळ राजवाडा रस्ता काँक्रीटीकरणसाठी ५ लक्ष, सुरेगाव राजवाडा भूमिगत गटारसाठी १० लक्ष, ठाणगाव आंबेडकर नगर येथे काँक्रीट रस्ता व भूमिगत गटारसाठी १५ लक्ष, दोडी बु रोहिदास नगर भूमिगत गटार ७ लक्ष,रस्ता काँक्रीटीकरण ५ लक्ष,आंबेडकर नगर काँक्रीटीकरण १० लक्ष, राजवाडा रस्ता काँक्रीटीकरण ७ लक्ष, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर भूमिगत गटारसाठी १५ लक्ष, आंबेडकर नगर येथे एलईडी स्ट्रीट लाईट ७.५ लाख,राजवाडा येथे पाणी टाकी बांधणे ७ लक्ष,दोडी खु येथे राजवाडा येथे सार्वजनिक शौचालयसाठी १० लक्ष, गुळवंच बिरोबा वस्ती रस्ता काँक्रीटीकरण १० लक्ष, आडवाडी उघडे वस्ती रस्ता काँक्रीटीकरण ५ लक्ष, डुबेरे येथे आंबेडकर नगर रस्ता काँक्रीटीकरण १० लक्ष, रोहिदास नगर येथे सार्वजनिक शौचालयासाठी १० लक्ष,अण्णाभाऊ साठे नगर येथे सार्वजनिक शौचालयासाठी १० लक्ष,सांगवी रमाई नगर येथे पाणीपुरवठ्यासाठी ४ लक्ष,कासारवाडी जगताप वस्ती रस्ता काँक्रीटीकरण ७ लक्ष, कणकोरी आंबेडकर नगर येथे भूमिगत गटार ९ लक्ष, रस्ता काँक्रीटीकरण ९ लक्ष, एलईडी स्ट्रीट लाईट ७.५ लक्ष, शेरेओढा येथे एलईडी स्ट्रीट लाईट ७.५ लक्ष, पिंपळे रुपवते वस्ती येथे पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेसाठी ११ लक्ष, मानोरी येथे आंबेडकर नगर येथे भूमिगत गटार ६ लक्ष,अण्णाभाऊ साठे नगर येथे रस्ता काँक्रीटीकरण १० लक्ष, भूमिगत गटार ६ लक्ष, आहिरे वस्ती येथे रस्ता काँक्रीटीकरण १० लक्ष, पाडळी राजवाडा वस्ती येथे भूमिगत गटार ४ लक्ष, बेलू राजवाडा भूमिगत गटार व रस्ता काँक्रीटीकरण प्रत्येकी १० लक्ष,पंचाळे भूमिगत गटार व रस्ता काँक्रीटीकरणसाठी प्रत्येकी ८ लक्ष रुपये निधी मंजूर झाला आहे. संबंधित गावांतील ग्रामस्थांनी आमदार माणिकराव कोकाटे यांचे आभार मानले आहेत.

### दलित वस्त्यांना मूलभूत सुविधा



गेल्या चार वर्षांत जिल्हा स्तरावरून व राज्यशासनाकडून दलित वस्त्यांसमध्ये मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणला आहे.विकासाची ही शृंखला यापुढेही अशीच सुरू ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहे.आताही ३ कोटी ८० लाख रुपयांतून विकास कामे होणार आहेत. राज्यशासनाकडून यापूढेही निधी मिळणार आहे.त्यामुळे दलित वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मूलभूत विकास कामे होत असल्याने या वस्त्यांचा यातून कायापालट होणार आहे.

**आमदार माणिकराव कोकाटे**

### महिला व बालविकास विभागाकडून ८ गावांमध्ये अंगणवाड्या

जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागामार्फत आमदार माणिकराव कोकाटे यांच्या प्रयत्नांतून ८ गावांमध्ये प्रत्येकी ११ लाख २५ हजार अंदाजपत्रकीय रकमेच्या अंगणवाडी इमारती बांधण्यात येणार आहेत. कोनांबे, औंढेवाडी,महाजनपूर, सुरेगाव,भोकणी, सोनांबे ,कीर्तांगळी व दातली या ८ गावांसाठी प्रत्येकी ११लाख २५ हजार प्रमाणे एकूण ९० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

# अखेर मुहूर्त ठरला, कोपरगावकरांसाठी रविवार ठरणार सुवर्ण दिवस'

### आ.आशुतोष काळेंची गुड न्यूज; ५ नं.साठवण तलावाचे होणार जलपूजन

**वावी : वार्ताहर**

कधी होणार, कधी होणार याची संपूर्ण कोपरगावकरांना लागलेली ओढ संपुष्टात आली असून रविवार १५ सप्टेंबर कोपरगावकरांसाठी सुवर्ण दिवस' ठरणार आहे. दुपारी ३ वाजता ५ नंबर साठवण तलावाचे जलपूजन करण्यात येणार असल्याची गुड न्यूज आ.आशुतोष काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोपरगावकरांची तहान भागविण्यासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या ५ नंबर साठवण तलावाचे जलपूजन कार्यक्रमाच्या सुवर्ण क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी ५ नंबर साठवण तलावाचे काम व्हावे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ९ दिवस धरणे आंदोलन केले. निवडून आल्यावर दोनच महिन्यात दगडमाती उचलण्याच्या कामाला प्रारंभ केला. त्यामुळे कोपरगाव नगरपरिषदेचे ५ नंबर साठवण तलावासाठीचे जवळपास सात ते आठ कोटी रुपये वाचले. त्यानंतर साठवण तलावाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु झाले. कोपरगाव नगरपरिषद अधिकारी व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेवून थकीत पाणी पट्टीची रक्कम हफ्त्या-हफ्त्याने घेण्यास सांगितले व कोपरगाव नगरपरिषदेने देखील थकीत पाणी पट्टीच्या हफ्त्याची रक्कम भरली. त्यानंतर वाढीव पाणी आरक्षित करण्याच्या प्रस्तावास शासनाकडून मंजुरी मिळविली. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिली.



शासनाकडून अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली १३१.२४ कोटीच्या कामाचे टेंडर देखील निघाले व कामही सुरु झाले मात्र त्यानंतर काही दिवसांनी राज्यातील सरकार बदलले परंतु कामाचे टेंडर सर्वकाही नियमानुसार असल्यामुळे अडचणी आल्या नाही.

राज्य शासनाकडून ८५ टक्केच रक्कम मिळणार होती व उर्वरित १५ टक्के रक्कम हि कोपरगाव नगरपरिषदेला भरावी लागणार होती. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून हि १५ टक्केची जवळपास २० कोटीची रक्कम राज्य शासनाकडून माफ करून घेतल्यामुळे ५ नंबर साठवण तलावाचे कामाला गती येवून हे काम पूर्णत्वाकडे गेले आहे. वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर असून लवकरच नागरिकांना उशिराने मिळणारे पाण्याचे दिवस कमी होणार आहेत.

विधानसभा निवडणुकीवेळी प्रचारादरम्यान कोपरगाव शहरात गल्ली बोळात गेलो असतांना रस्त्याच्या दोन्ही बाजूस पाणी साठवून ठेवलेल्या प्लास्टिकच्या टाक्या पाहून कुणी आजारी पडले तर त्याठिकाणी चारचाकी वाहन देखील पोहोचू शकत नव्हते अशी परिस्थिती होत मात्र छोट्याशा जागेत राहणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना त्याशिवाय दुसरा पर्याय पण नव्हता हि परिस्थिती मी स्वत: पाहिली असल्यामुळे हि परिस्थिती मला बदलावी वाटली व मला समाधान आहे की, हि परिस्थिती आता बदलणार आहे. माता भगिनींच्या अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असून माता भगिनींनी या जल पूजन' सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुवर्णक्षणाचे साक्षीदार व्हावे असे आवाहन आ.आशुतोष काळे यांनी पत्रकार परिषदेत केले.

## दोडी बुद्रुक सोसायटीच्या चेअरमनपदी शेळके

**सिन्नर : प्रतिनिधी**

दोडी बुद्रुक विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी वसंतराव कारभारी शेळके तर व्हा. चेअरमनपदी हिराबाई बाळु आव्हाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली

याप्रसंगी पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब वाघ, माजी चेअरमन देवराम केदार, बन्सीबाबा आव्हाड, माजी सरपंच आनंदा कांगणे, माजी चेअरमन रघुनाथ आव्हाड, बाजीराव जाधव, सुभाष शिंदे, रामनाथ केदार, अमृता आव्हाड, गणपत शेळके, सुकदेव आव्हाड, अरुण भालेराव आदींसह संचालक उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार अधिकारी अनिल पाटील, यांनी काम पाहिले. सचिव जाधव यांनी सहाय्य केले. याप्रसंगी सभासद मोठ्या संखेने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

चौ. अर्ज-०१३२/२०२४
दि. २४/०८/२०२४

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, सिन्नर यांचे न्यायालयात**

**१) श्रीम. महालाबाई मधुकर पवार** — **अर्जदार**
रा.अपना गॅरेज जवळ, सिन्नर-पुना रोड, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक

**विरुध्द**

**सिन्नर नगरपरिषद, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक** — **सामनेवाले**

जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ नुसार मुख्य नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (२) आणि क (३) नुसार उपरोक्त जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, **श्रीम. महालाबाई मधुकर पवार** रा. अपना गॅरेज जवळ, सिन्नर-पुना रोड, सिन्नर ता. सिन्नर जि. नासिक **यांचे पती मधुकर दामु पवार यांचा मृत्यू ०५/०४/२०२३ रोजी मौजे- सिन्नर येथे** झाला असून सिन्नर नगर परिषद सिन्नर यांचेकडील **दि. ०५/०८/२०२४ रोजीच्या पत्रानुसार** त्यांची मृत्यूची नोंद सिन्नर नगर परिषद सिन्नर), यांचे रेकॉर्डला आढळुन आलेली नसल्याने मृत्यू नोंद होणेकामी अर्जदार यांनी इकडेस अर्ज दाखल केलेला आहे. सदर मृत्यू दाखला देणेकामी कोणाची काही हरकत असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिध्द केल्याचे तारखेपासून ३० दिवसाच्या आत स्वतः अगर वकिलामार्फत त्यांनी **दि.३०/०९/२०२४ रोजी ११ वाजता** तहसिल कार्यालय सिन्नर येथे सुनावणी आयोजित केली आहे सदर अर्जा बाबत कोणाची हरकत असल्यास इकडेस तक्रार समक्ष येऊन लेखी तक्रार / हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकत / तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**सही/- (सुरेंद्र देशमुख)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, सिन्नर

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४



◀◀ भारताची बासमती तांदळाच्या निर्यातीत १५% वाढ ◀◀ पान ६

▶▶ शुयमा ब्राह्मण संस्थेच्या पुरस्कारांचे दिमाखदार वितरण ▶▶ पान ६



# शहरात अवैध गर्भपात करणाऱ्या केंद्रावर छापा

## मनपाच्या आरोग्य विभागाची कारवाई; डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरात अवैध गर्भपात केंद्रावर महापालिकेच्या आरोग्य विभागाने छापा टाकत कारवाई केली. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गर्भपात केंद्र चालविणाऱ्या डॉ. आर.एम. पंड्या यांच्याविरोधात गंगापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. गुन्हा दाखल करण्याची कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरू होती. दरम्यान या घटनेमुळे शहारात खळबळ उडाली आहे.**



या रुग्णालयात प्रसूती झालेल्या एका महिलेचा मोठ्या प्रमाणामध्ये रक्तस्त्राव झाल्यामुळे दुसऱ्या एका रुग्णालयामध्ये उपचार घेत असताना मृत्यू झाला. महापालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही मातेचा मृत्यू झाला तर त्याची चिकित्सा करण्यासाठी माता मृत्यू समिती असून, या समितीचे प्रमुख असलेले महापालिकेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण, सहाय्यक वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत शेटे यांनी सोमवारी अचानक सकाळी पंड्या हॉस्पिटलला भेट दिली. या भेटीदरम्यान, त्यांनी रुग्णालयांची कागदपत्रे तपासणी केली असता सदर रुग्णालयाची गेल्या ३० वर्षांपासून महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडे नोंदणीच नसल्याची धक्कादायक बाब समोर आली. शहरातील महात्मानगर सारख्या उच्चभ्रू वस्तीतील पांड्या हॉस्पीटलमध्ये गेल्या ३० वर्षांपासून अवैध गर्भपात केंद्र सुरू असल्याची धक्कादायक माहिती महापालिकेच्या वैद्यकीय पथकाच्या छाप्यात उघड झाली आहे. माता मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना ही गंभीर बाब निदर्शनास आली.

गर्भपातासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचा साठाही याठिकाणी आढळून आला. या ठिकाणीप्रसुती पासून तर अवैध गर्भपातापर्यंत सर्व प्रकारचे उपचार होत असल्याची माहिती प्रथमदर्शनी समोर आली आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर महापालिकेच्या वैद्यकीय विभागाबरोबरच अन्न औषध प्रशासन व गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. डॉ. पंड्या यांच्याविरोधात महापालिकेने गंगापुर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. एमबीबीएस शैक्षणिक अर्हता असलेल्या डॉ. पंड्या यांच्याकडून याठिकाणी सहा बेडचे रुग्णालय चालविले जात होते.

> कोणत्याही रुंग्णालयात संशयास्पद आढळून आल्यास कायद्यानुसार संबंधितांवर गुन्हा दाखल करून महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने कारवाई करण्यात येईल. त्यामुळे कोणत्याही हॉस्पिटलने चुकीचे काम करू नये.
>
> **- डॉ. तानाजी चव्हाण,** मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मनपा

# नाशिक शहरातील दहा तडीपार पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून हद्दपार केलेले अनेक सराईत वास्तव्यास असल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. नाशिक शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दहा तडीपार केलेल्या संशयितांना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे.**

शहर परिसरात हाणामारी, चोरी, दरोडा, प्राणघातक शस्त्र घेऊन दहशत करणे, खंडणी मागणे, खुनाचा प्रयत्न करणे अशा अनेक गंभीर गुन्ह्यातील संशयितांना पोलीस आयुक्तांच्या आदेशाने शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले होते. मात्र, यातील बरेच तडीपार गुंड तडीपारीची मुदत संपण्याअगोदरच शहरात वास्तव्यास आले होते. यामध्ये गुरुदेव बलदेव देवल उर्फ गोपी (अंबड), अनिल दत्तू पवार (पंचवटी), आसिफ उर्फ काळ्या इस्माईल शेख (पंचवटी), अरबाज उर्फ सोनू रफिक बेग (भद्रकाली), अमन खालीद खान (मुंबईनाका), विकार मोहंमद शेख (भारत नगर), दर्शन मनोज डुगलज (सातपूर), केविन विवेक आसर (सरकारवाडा), अमोल उर्फ नान्या किशोर फल्ले (म्हसरूळ), सुजित उर्फ चंग्या भास्कर पगारे (म्हसरूळ) या संशयितांना ताब्यात घेऊन कारागृहात पाठविण्यात आले.

# ॲड.प्रशांत जाधव यांचे हल्लेखोर पोलिसांच्या ताब्यात

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**सिडकोतील ॲड प्रशांत जाधव यांच्यावर अज्ञात व्यक्तींनी दोन वर्षांपूर्वी जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केला होता. याप्रकरणाचा छडा लावण्यासाठी जाधव यांनी वेळोवेळी पोलिसांकडे मागणी केली होती अखेर पोलिसांना यश आले असून याप्रकरणातील तिघा संशयितांना गुंडांविरोधी पथकाने मुसक्या आवळल्या आहे. दरम्यान याच प्रकरणी आणखी दोन संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, यातील मुख्य सुत्रधार फरार असून त्याचा शोध सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की सिडकोतील उपेंद्र नगर भागात असलेल्या साईग्राम सोसायटीत राहणारे ॲड प्रशांत जाधव यांच्या वर अज्ञात व्यक्तींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केला होता सदरचा गुन्हा घडल्यापासुन अरोपी फरार असुन त्यांचा काही एक थांगपत्ता मिळुन येत नव्हता. तरी नमुद गुन्हयातील संशयितांचा आज पावेतो सातत्याने चालु आहे. नमुद गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान नाशिक पोलीस आयुक्तालयातील गुंडा विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते यांना बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, आकाश आनंदा सुर्यतळ, (वय २४ वर्ष, ग. पंचशीलनगर, शिवाजीनगर, नाशिक रोड,) यास वर नमुद गुन्हयातील संशयितांबाबत माहिती आहे. त्यानुसार इसम नामे आकाश आनंदा सुर्यतळ यास गुंडा विरोधी पथक कार्यालयात आणुन विचारपुस करता त्याच्याकडे गुन्ह्यातील संशयितांबाबत माहिती असल्याचे त्याने कबुल केलेले आहे. आकाश सुर्यतळ यास अधिक चौकशी करून अंबड पोलीस ठाणे येथे हजर केले असता त्याचेकडून अधिक तपास करून माहिती घेतली असता या गुन्ह्यात टक्या उर्फ सनी रावसाहेब पगारे, (राह- बौदध विहारचे पाठीमागे, जेतवन नगर, जय भवानी रोड, नाशिक रोड, नाशिक ),बारक्या उर्फ श्रीकांत माणिक वाकुडे, (राह- जेतवननगर, नाशिकरोड,) या दोघांनी आकाश सुर्यतळ य एम एच १५ एच यु ९२२१ या ॲक्सेस मोपेड वाहनाचा वापर करून सदरचा गुन्हा घडवुन आणलेला असल्याची कबुली दिली आहे. आकाश सुर्यतळ याचेकडे अधिक तपास करून पुढील तपास करीत आहोत.

दरम्यान या प्रकरणाचा अधिक तपास करीत असताना अंबड पोलिसांनी अटक केलेल्या संशयितांची कसून चौकशी केली असता त्यांनी प्रसाद शिंदे या चौथ्या संशयिताचे नाव सांगितले प्रसाद शिंदे याला पोलिसांनी अटक केली असता त्याने अंकुश शेवाळे नामक युवकाने मयूर भेद याला गोळीबार करण्यासाठी पैसे पुरवले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंबड पोलीस ठाण्याचे गुन्हशोध पथकाचे पोलीस निरीक्षक जयंत शिरसाठ करीत आहे. सोमवारी या पाचही संशयतांना न्यायालयात उभे केले असता त्यांना १५ सप्टेंबर पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

# जिल्ह्यातील धरणे ओव्हरफ्लो

**नाशिक : प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात उघडझाप पाऊस सुरु आहे. मात्र, असे असले तरी महिनाभरा-पूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील दहा धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात ९५ टक्के पाणीसाठा सद्या आहे. त्यामुळे नाशिककरांना यंदा पाणीटंचाईचा सामना कमी प्रमाणात करावा लागण्याची शक्यता आहे.**

जिल्ह्यातील भावली, वालदेवी, माणिकपुंज, केळझर, हरणबारी, भोजापूर,तिसगाव, ओझरखेड, वाघाड, आळंदी ही धरणे शंभर टक्के भरली असून, ओसंडून वाहत आहेत. तसेच या धरणांत पाण्याचा साठा वाढल्याने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. दुसरीकडे कश्यपी धरणात गेल्या वर्षापेक्षा यंदा ३१ टक्के साठा अधिक आहे. तर गौतमी गोदावरीत ९५ टक्के साठा असून, हा साठा गतवर्षीच्या तुलनेत ३६ टक्क्यांनी अधिक आहे. याशिवाय पालखेड धरणात ७१.९८ टक्के साठा आहे. तसेच करंजवण धरण बर्यापैकी भरले असून, गेल्यावेळी केवळ ६५.४४ टक्के साठा होता. त्यासोबतच मुकणे धरण ८६ आणि कडवा धरण ८८ टक्के भरले आहे. तर दारणा धरणात गेल्यावर्षी इतकाच म्हणजे ९५.८६ टक्के साठा आहे.

पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली तरी जिल्ह्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तसेच उद्या जिल्ह्याला यलो अलर्ट देखील देण्यात आला आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे जिल्ह्यातील नांदगाव, येवला, सिन्नर, मालेगाव यासारख्या तहानलेल्या तालुक्यांना दिलासा मिळाला आहे.





सेन्सेक्स दीडशेहून अधिक अंकांनी घसरला
पान ३

नाशिक आज
# गांवकरी



ह्युंडाईची नवी अल्काझार एसयुव्ही कार लाँच
पान ३

नाशिक, मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०२४

## महत्त्वाचे

### लग्नाचे आमिष; युवतीवर अत्याचार

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवत एका २४ वर्षीय युतीवर वेळोवेळी अत्याचार करून गर्भवती केले तसेच तुझ्याशी लग्न करतो अशी खोटी बतावणी करत पिडितेचा गर्भपात केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित युवतीने दिलेल्या तक्रारीनुसार अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपी स्वप्निल ताराचंद वाघचौरे (२८) याने पीडितेचा विश्वास संपादन करून लग्नाचे आमिष दाखवत दि. एक जानेवारी २०२४ ते १८ ऑगस्ट दरम्यान अत्याचार केला. यादरम्यान पिडीता ही गर्भवती राहिल्याने तुझ्याशी लग्न करतो अशी खोटी बतावणी करत गर्भपात केला. दरम्यान पिडितेने लग्नाबाबत विचारणा केली असता संशयिताने लग्नास नकार दिला. याप्रकरणी पीडित युतीने दिलेल्या फिर्यादीनुसार अंबड पोलीस ठाण्यात संशयित आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सविता उंडे अधिक तपास करीत आहेत.

### अडीच लाखांचा मुद्देमाल लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

बंद घराचा दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत घराच्या हॉलमधील कपाटात ठेवलेले सोने चांदी-चे दागिन्यासह रोख रक्कम असा एकूण दोन लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी घरफोडी करत चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वंदना रवींद्र बारटक्के, (वय ६१ वर्षे, रा. प्लॉट नं.१९, व्दारकामाई बंगला, सुंदरबन कॉलनी, लेखानगर, सिडको, नाशिक.) या दि ७ रोजी कामानिमित्त बाहेर गेल्या असता दुपारी बारा ते संध्याकाळी साडेपाच वाजेच्या दरम्यान दिवस-ढवळ्या त्यांच्या बंद घराचे दरवाजाचे कुलूप तोडून घराचे हॉलमध्ये प्रवेश करत कपाटात ठेवलेले ६० हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या बांगड्या २४ हजार रुपये किमतीचे सोन्याच्या रिंगा, वीस हजार रुपये किमतीचे चांदीचे ताट, एक हजार रुपये किमतीचे चांदीचे निरंजन व दीड लाख रुपये रोख रक्कम असा एकूण दोन लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी नेला. याप्रकरणी अंबड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कुंभमेळ्यात विकासकामांचे नियोजन करा : राधाकृष्णन

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्ह्याच्या अविकसित भागाच्या विकासावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. त्यादृष्टीने क्षेत्र निश्चित केल्यास शासन स्तरावरून सहकार्य मिळविणे सोयीचे होईल. कृषी आणि पशुधनाच्या विकासावरही विशेष लक्ष देऊन ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासालाही चालना देण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. परिसर पर्यावरणाच्यादृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे त्याची काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. याबाबत आराखडा तयार करावा. कुंभमेळ्याची पूर्वतयारी करताना विकासकामांचे योग्य नियोजन करावे. अशा सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केल्या.**

नाशिक दौऱ्यावर राज्यपाल आले असता शासकीय विश्रामगृहात वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांसोबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, आदिवासी विकास आयुक्त नयना गुंडे, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा खत्री, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस



अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन पुढे म्हणाले, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी खूप वाव आहे. शहराचा विस्तार होत असताना योग्य नियोजन आणि उत्तम पायाभूत सुविधांच्या विकासावरही लक्ष द्यावे लागणार आहे. त्यादृष्टीने स्वच्छ, सुंदर आणि विकसित जिल्ह्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाच्या विविध पथदर्शी योजनांच्या जिल्ह्यात होत असलेल्या अंमलबजावणीबाबत राज्यपाल राधाकृष्णन यांनी सविस्तर माहिती घेतली. महसूल दस्तावेजचे डिजिटायझेशन, राज्यात सेवा हक्क कायद्याची चांगल्यारीतीने अंमलबजावणी होत असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. नागरिकांच्या हक्कांची योग्यरितीने जपणूक व्हावी. बचत गटांना आदिवासी भागात पोषण आहार पुरवठा करण्याबाबत नियोजन करावे. वायनरीच्या गरजेनुसार द्राक्ष पिकाबाबत संशोधनाला चालना देण्यात यावी, कांदा प्रक्रिया उद्योगाबाबतही प्रयोग व्हावेत. त्यासाठी बाजाराची मागणी आणि पुरवठा साखळीचा अभ्यास व्हावा. जल जीवन मिशन, पीएम किसान, राज्य शासनाच्या विविध योजनांची माहितीही त्यांनी घेतली. नाशिक शहराने स्वच्छ भारत अभियानात यशस्वी होण्यासाठी उत्तम नियोजन करावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

यावेळी, राज्यपाल महोदयांनी जिल्हा प्रशासन महानगरपालिका, आदिवासी विकास, पोलिस विभाग यांच्या संदर्भातील विविध बाबीवर चर्चा केली.

### तंत्रशिक्षण, व्यवस्थापन संस्थाची गरज

औद्योगिकदृष्टीने विकसित होणाऱ्या नाशिकसारख्या शहरात तंत्रशिक्षणासाठी आधुनिक सुविधांनीयुक्त संस्था असणे गरजेचे आहे. आयआयएम, आयआयटी दर्जाच्या सुविधा असणाऱ्या तंत्रशिक्षण आणि व्यवस्थापन संस्था येथे गरजेच्या आहेत. शासनस्तरावरही याबाबतचा विचार करण्यात येईल. अशा सूचना केल्या.



# सफाई कर्मचारी आयोगासमोर तक्रारींचा पाढा

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक महापालिकेतील सफाई कामाबाबतची ठेकेदारी बंद व्हावी, महापालिकेने तयार केलेल्या आकृतीबंधात सफाई कर्मचाऱ्यांची पदे समाविष्ट करावीत. रेड कॉस सिग्नल येथील सफाई कर्मचाऱ्यांना एक रुपये नाममात्र घरभाडे असताना कर्मचाऱ्यांकडून वसूल केले जाणारे भाडे बंद करावेत. घनकचरा विभागाने ५६० सफाई कर्मचाऱ्यांची यादी करुनही त्यांना घरे मिळत नसून पालिकेतील विभाग एकमेकांवर ढकलाढकली करत आहे. यासह सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या तक्रारींचा पाढा सफाई कर्मचारी संघटनांनी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य पी. पी. वावा यांच्यासमोर वाचला.**

## प्रलंबित प्रश्न सोडवा; आयोगाच्या मनपाला सूचना

नाशिक महापालिकेत सोमवारी (दि.९) राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य पी. पी. वावा यांनी महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांसंबधी पालिका प्रशासनाची बैठक घेतली. पालिका प्रशासनाचे आयोगाला चुकीची माहिती दिली असता, उपस्थित सफाई कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हा दावा खोडून काढला. तसेच त्यांनी वर्षो नुवर्षे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नावर लक्ष वेधले. यावेळी अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, उपायुत लक्ष्मीकांत साताळ्कर, शहर अभियंता संजय अग्रवाल, घनकचरा विभागाचे संचालक डॉ. आवेस पलोड, लेखा विभागाचे दत्तात्रय पाथरुट, नितीन नेर आदीसह उपस्थित होते.

सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत सुरेश मारु, सुरेश दलोड, प्रताप मेहरोलीया यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांकडे आयोग व पालिका प्रशासन दूर्लक्ष करत असल्याचे सांगत आयोगाला आरसा दाखवला. सफाई कर्मचाऱ्यांना हक्काची घरे मिळावीत याकरिता पाठपुरवठा सुरु आहे. घनकचरा विभागाने कर्मचाऱ्यांची यादीही तयार आहे. मात्र प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे हा प्रश्न तसाच पडून राहीला आहे. मात्र यामध्ये लक्ष घालून कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतर्गत मोफत घरे उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. रेडक्रॉस येथे कर्मचाऱ्यासाठी जुन्या इमारतीच्या जागेवर नवीन इमारत बांधून द्यावी. याकरिता प्रस्तावही तयार केलेला आहे. परंतु याप्रकरणी प्रशासन काहीच करत नाही.

हाफमैला करणाऱ्यांवर पालिका कुठलीही कारवाई करत नाही. तसेच शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करुनही त्या दिवसाचा मोबदला दिला जात नाही. तो देण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली. दरम्यान सफाई कर्मचारी संघटनेच्या ज्वलंत समस्या जाणून घेत राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य पी.पी.वाला यांनी पालिका प्रशासनाला संबंधित प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना करत तात्काळ त्या सर्वाचा अंमलबजावणी करण्यास सांगितले.



# शिक्षण विभागाने लौकिक वाढवावा : ना. भुसे

**नाशिक : प्रतिनिधी**

**महापालिका शिक्षण विभागाने नवनवीन उपक्रम व विद्यार्थी हिताचे कार्यक्रम राबवून मनपा शिक्षण विभागाने नावलौकिक वाढवावा. मागील काही दिवसात मनपा शाळांचा दर्जा उंचावल्याने पटसंख्या वाढली आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने असेच काम करुन अधिक जोमाने प्रयत्न करावे, असे प्रतिपादन पालकमंत्री दादा भुसे यांनी केले.**

मनपा शिक्षण विभागातर्फे कालिदास कला मंदिरात सोमवारी (दि.९) आयोजीत उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. व्यासपीठावर आयुक्त डॉ.अशोक करंजकर, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त श्रीकांत पवार,शिक्षणाधिकारी बी.टी. पाटील उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांनी म्हटले की, शाळा बाह्य मुलांचे सर्वेक्षण, विविध नावीन्यपूर्ण उपक्रम, सायंकाळी ७ ते ९ मोबाईल बंद उपक्रम, दप्तर मुक्त शनिवार अभियान सुरु आहे. मनपा शाळातील गुणवत्तेचा चढता आलेख, वाढलेली पटसंख्या, मुख्यमंत्री 'माजी शाळा सुंदर शाळा' प्राप्त पुरस्कार, स्कॉलरशिप मध्ये विद्यार्थिनींचे उल्लेखनीय यश, त्यानंतर शिक्षण विभागातील, मनपा व खाजगी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षिका, विशेष पुरस्कार असे एकूण वीस पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास मनपा शाळांचे केंद्रप्रमुख, विविध शिक्षण संघटनेचे पदाधिकारी, खाजगी संघटनेचे पदाधिकारी, सर्व शिक्षा अभियान कर्मचारी अंशकालीन कर्मचारी, उपस्थित होते. वैशाली क्षीरसागर व मंगेश पाठक यांनी सूत्रसंचालन केले. तर सुनील केळकर यांनी आभार मानले.

### यांचा झाला सन्मान

शशीकला पाटिल (मुख्यध्यापिका शाळा क्र.२४), प्रतिभा नेरकर (मुख्यध्यापिका शाळा क्र.७६), भारती पैठणपगारे (शाळा क्र.३०), सारिका पाटिल (शाळा क्र.४७), कविता पगार (शाळा क्र.८), हिलाल जगदाळे (शाळा क्र.८६), मनिषा बांगर (शाळा क्र. ७७), पुनम भामरे (शाळा क्र.१८), रोहिणी बनाटे (शाळा क्र.३०), सुनील सोनवणे (शाळा क्र.७७), गौरी बेळे (शाळा क्र.३६), दिपाली बरुडे (शाळा क्र.७०)धर्मेंद्र बागूल, **खासगी शाळा :** १) सरला सानप (नूतन मराठी प्राथमिक शाळा, मुख्यध्यापिका), २) शोभा सोनवणे (श्रीमती सरस्वती गुलाबराव पाटिल माध्य.विद्यालय), ३) विजया दुधारे (सागर मलमोदी शाळा), ४) रवींद्र कोठावदे (उन्नती प्राथ. विद्यालय), ५) माधुरी जोशी ( सरस्वती विद्यालय), **विशेष पुरस्कार :** १) रामदास तळपे (मनपा शाळा क्र.८६), २) पदमाकर बागड (मनपा शाळा क्र.८६)

# पंचवीस कोटींच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी

## भगूरचा पाणीप्रश्न मिटणार ; आ. सरोज आहिरेंच्या प्रयत्नांना यश

**नाशिक : प्रतिनिधी**

**शासनाच्या नगर विकास विभागाच्या नगरोत्थान महाभियानांतर्गत भगूर नगरपरिषदेच्या २५ कोटींच्या पाणीपुरवठा प्रकल्पाला शासनाची मंजुरी मिळाली आहे. आ. सरोज आहिरे यांच्या प्रयत्नाने हा प्रकल्प मार्गी लागल्याने भगूर शहरातील नागरिकांना चोवीस तास पाणी उपलब्ध होणार आहे. आ. आहिरे यांनी पाठपुरवठा केल्यानंतर ११ जून रोजी हा प्रकल्प शासनदरबारी मांडला असता, शासनाने पंचवीस कोटीच्या खर्चाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार थेट दारणा धरणातून भगूर शहरासाठी पाणी उचलले जाणार आहे. या कामामुळे नागरिकांना चोवीस तास पाणी उपलब्ध होणार आहे.**

भगूर पाणीपुरवठयाचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षापासून रखडलेला होता. आ. आहिरे यांनी यात लक्ष घालत जून २०२२ पासून महाराष्ट्र प्राधिकरणकडे बैठक घेत, जिल्हाधिकारी तसेच शासनस्तरावर मंत्रालय येथे सतत पाठपुरावा करून आज त्या पाठपुराव्याला यश आहे. अखेर यास यश आल्याने भगूरचा पाणी प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे. दरम्यान पाणी प्रश्न निकाली काढल्याने भगूरमधील नागरिकांनी आ. आहिरे यांचे आभार मानले आहे. भगूर शहराकरिता गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाकडून वाढीव पाणी आरक्षण मंजूर करण्याबरोबरच दारणा धरणातून थेट पाइपलाइनद्वारे पाणी उचलण्यास परवानगी मिळाली आहे.

सध्याच्या स्थितीत नागरिकांना केवळ ४५ मिनिटे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, हा उपलबध होणारे पाणी खूपच कमी असल्याचे नागरिकांच्या तक्रारी होत्या. नगरपालिका प्रशासनाने नव्याने प्रस्ताव सादर करत एक वर्षापासून थेट दारणा धरणातून पाणी मिळण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाने प्रस्तावाच्या सर्व तांत्रिक बाबींची पाहणी करून त्यांच्या सकारात्मक शेऱ्यानुसार शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला होता.

महामंडळाने २०५५ मधील लोकसंख्या गृहीत धरून महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांतर्गत दारणा प्रकल्पातून भगूरसाठी वाढीव पाणी हक्क मंजूर केले. सध्या भगूरला मुकणे जलाशयातून पाणीपुरवठा केला जातोय. महामंडळाकडे व मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार दारणा धरणातून ६,०६५ दक्षलक्ष घनफूट पाणी आरक्षण मंजूर केले आहे. दारणा धरणातून थेट पाइपलाइनसाठी २५ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी मिळाल्याने भविष्यातील पाण्याची चिंता मिटणार आहे. २५० मिमी व्यासाची पाइपलाइनद्वारे थेट दारणा धरणातून पाणी आणले जाणार आहे.



भगूरमधील नागरिकांना पिण्याचे स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध व्हावे. याकरिता शासनाकडे भगूर पाणी पुरवठा योजनेसाठी प्रयत्न सुरु होते. यासाठी वेळोवेळी अधिवेशनात काळात सभागृहातही मागणी केली त्याची दखल घेत प्रकल्पाला शासनाची मंजुरी मिळाल्याने पंचवीस कोटी खर्चून दारणातून भगूर शहरासाठी पाणी आणले जाणार आहे. या प्रकल्पामुळे भगूरमधील कायमचा पाणी प्रश्न मिटणार असल्याने याचे समाधान असणार आहे

-आ. सरोज आहिरे, देवळाली मतदारसंघ,

# नैराश्याचा घेऊन धसका, जीव होतो तुटका तुटका...

## आत्महत्यांचे प्रमाण वाढले : आज जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिवस

**नाशिक : देवयानी सोनार**

**सद्यस्थितीत सोशल मीडिया, वर्तमानपत्रे किंवा वृत्तवाहिन्या पाहिला की दिवसभरात एक तरी बातमी कुणी तरी आत्यहत्या केल्याची निदर्शनास येते. असा कोणता प्रश्न असेल की त्याचे उत्तरच सापडत नसेल आणि त्या व्यक्तीला आपला प्राणत्याग करावसा वाटत असेल. त्यामुळे या आत्महत्या संवेदनशील असलेल्या मनाला नक्कीच धडकी भरवून जातात. अशा घटनांमुळे आपलाही जीव आपसूकच तुटका तुटका होऊन जातो.**

मृत्युच्या प्रमुख २० कारणांपैकी आत्महत्या एक कारण आहे. दरवर्षी आठ लाख लोक आत्महत्येने आपला जीव गमावतात. आत्महत्येने जीव गमावलेल्या एका व्यक्तीमागे असे वीस ते पंचवीस जण असतात. आत्महत्यांचे प्रमाण गेल्या २५ ते ३० वर्षात हे १५ ते २० टक्क्यांनी वाढले आहे. हेच प्रमाण गेल्या ५ वर्षांत जवळपास ३०-४० टक्क्यांनी वाढले आहे. कधी शुल्लक कारणाहून तर कधी सततच्या डिवचणे, संशय घेणे, प्रेमभंग, करिअरची चिंता, विवाहाच्या समस्या आदी कारणांमुळे येणारा मानसिक आजार किंवा नैराश्य (डिप्रेशन) यातून आत्महत्येसारखे उचललेले टोकाचे पाऊल अनेकांच्या मनाला चटका लावून जाते. डिप्रेशन आणि सिझोप्रेनिया आजाराने ग्रस्त असलेले ५० टक्के लोक आत्महत्येचा प्रयत्न करतात. त्यापैकी १५ टक्के लोक आपला जीव गमावतात. असे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हेमंत सोननीस यांनी सांगितले.

नुकतेच संभाजीनगर येथे डॉ. असलेल्या विवाहितेने नवऱ्याच्या संशयातून ७ पानी पत्र लिहून आत्महत्या केली. आठवी, दहावी, बारावी कोवळ्या वयातील मुलामुलींनी आत्महत्या केल्याच्या घटना, पितापुत्र रेल्वेखाली आत्महत्या केल्याचे व्हिडिओ पाहिल्यावर मनाला वेदना होतात.सर्वसामान्यांना विचार येतो एकदा टोकाचे पाऊल उलण्याआधी मनातले बोलले असते असे वाटून जाते. परंतु ती वेळ गेलेली असते. हतबल होण्या पलीकडे काहीही उरलेले नसते. अशावेळी मन सुन्न होते.





आपल्या संपर्कातील एखादी व्यक्ती तणावग्रस्त असेल किंवा मानसिक आजाराने पीडित असेल तर तिच्याशी संवाद साधणे. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे. आपल्या परीने समुपदेशन करणे आणि जास्त त्रास वाटल्यास तज्ज्ञांची मदत घेणे गरजचे आहे.

- **डॉ. हेमंत सोननीस,** मानसोपचार तज्ज्ञ, नाशिक

### आत्महत्येची कारणे

**मानसिक आजार :** डिप्रेशन आणि सिझोप्रेनियासारखे मानसिक आजार हे समाजातील डिप्रेशनचे मुख्य कारणे आहेत.

**मद्यप्राशन आणि इतर व्यसने :** व्यसन हा देखील एक मानसिक आजारच आहे. व्यसनाच्या अमलाखाली आपला वागणं पुरेसा नियंत्रणात राहत नाही. त्यामुळे क्षणिक विचारांचे रूपांतर कृती मध्ये होऊ शकते. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढते असे अभ्यासाअंती आढळले आहे.

**ताणतणाव वाढविणाऱ्या घटना :** परीक्षा, नोकरी, करिअर, पैसा, उद्योग धंदा, नाते संबंध यातील अडचणी इत्यादी काही कारणांमुळे मानसिक ताण तणाव प्रचंड प्रमाणात वाढू शकतो. तो योग्य प्रकारे हाताळता न आल्यास स्वतःचा जीव संपविण्या सारखे टोकाचे पाऊल उचलले जाऊ शकते.

**संभाषणाचा अभाव :** जवळच्या व्यक्तींची कमतरता. यामुळे देखील योग्य वेळी योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने अनेकांना वरील गोष्टी यशस्वीरित्या हाताळता येत नाहीत.

### आत्महत्या रोखण्यासाठी उपाय

मानसिक आजारावर वेळीच लवकरात लवकर नियमित स्वरूपात मानसोपचार तज्ज्ञ यांच्या तर्फे उपचार केले जावेत. हे सर्वात महत्त्वाचे कार्य आपण सर्वच आपल्या आजूबाजूच्या जवळच्या लोकांसाठी करू शकतो. घरात, नातेवाईकांशी, मित्र परिवारात सुसंवाद ठेवणे. मोबाइल, इंटरनेट, फेसबुक, व्हॉटसअॅप या आभासी जगात कमीत कमी गुंतून प्रत्यक्षातील आपल्या जवळच्या व्यक्तींशी संपर्कात राहणे शाळा, कॉलेज, ऑफिसेस, विविध संघटना यामध्ये नियमित पणे मानसिक आजार, ताण तणाव, आत्महत्या या विषयांवर अभ्यास पर जन जागृती पर कार्यक्रम घेतले जावेत. उपचार आणि समुपदेशन घेणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच या विषयावरील समाजातील आणि आपल्या मनातील गैरसमज दूर करणे देखील महत्त्वाचे आहे.

एकेकाळी काँग्रेस देशात सत्तेवर असताना निवडणुकीत उमेदवारी मिळणे म्हणजे लॉटरी मानली जात होती. काँग्रेसची उमेदवारी मिळाली म्हणजे हमखास विजय, असेही मानले जात होते. उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या तितकीच मोठी असायची. उमेदवारी मिळाली नाही म्हणून काही इच्छुक उमेदवार नाराज होऊन बंडखोरी करायचे. अपक्ष म्हणून निवडणूक लढवायचे. विरोधी पक्षही काँग्रेसमध्ये बंडखोरी होण्याची वाट पाहायचे. केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या पक्षांना कमीअधिक प्रमाणात बंडखोरीचा सामना करावा लागतो. लोकसभा निवडणुकीत अशाच बंडखोरीचा सामना भाजपाला करावा लागला. त्याचा तोटा सहन करावा लागला. भाजपाच्या जागा ३०३ वरुन २३४ वर आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसर्यांदा सरकार स्थापन केले खरे पण मित्र पक्षांच्या कुबड्या घ्याव्या लागल्या. बंडखोरीचा सर्वाधिक अनुभव आतापर्यंत काँग्रेस पक्षाने घेतला आहे. भाजपाही आता बंडखोरीचा अनुभव घेत आहे. हरयाणात विधानसभा निवडणूक येत्या पाच ऑक्टोबर रोजी होत असून, या राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपाला अभूतपूर्व बंडखोरीचा सामना करावा लागत आहे. राज्यात विधानसभेच्या ९० जागा आहेत. सर्व जागा भाजपा स्वबळावरच लढवत आहे. पक्षाने ६७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर अनेक इच्छुकांचा हिरमोड झाला. पहिली यादी जाहीर होताच भाजपाच्या अनेक नेते आणि पदाधिकाऱ्यांनी नाराज होत पक्षाला सोडचिठ्ठी दिली, तर काही पदाधिकाऱ्यांनी पदांचे राजीनामे दिले. पहिली यादी जाहीर करताना पक्षाने जातीय समीकरण साधण्याचा प्रयत्न केला. पहिल्या यादीत भाजपाने जाट समुदायातील १३ जणांना उमेदवारी देण्यात आली. शेतकरी आंदोलनाचा सर्वाधिक प्रभाव हा पंजाब आणि हरयाणात होता. या भागांतील बहुसंख्य शेतकरी जाट समाजाचे आहेत. त्याशिवाय कुस्तीपटूंच्या आंदोलनानंतरही जाट समाज भाजपापासून दूर गेला. अलीकडेच ऑलिंपिक महिला कुस्तीपटू विनेश फोगट आणि बजरंग पुनिया यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. जाट समुदायाला आकर्षित करण्याचा प्रयत्न भाजपाकडून केला जात आहे. जाट समाजाव्यतिरिक्त पक्षाने ओबीसी समुदायातील १६ जणांना संधी दिली आहे. ओबीसी समुदायाने गेल्या १० वर्षांत भाजपाला समर्थन दिले.


## संपादकीय

# सत्ताधारी पक्षाला गळती

आता हा समुदायही भाजपासून दूर जात असल्याचे दिसत आहे. ओबीसी समुदाय दूर गेल्याने लोकसभा निवडणुकीत भाजपाला उत्तर प्रदेश, हरयाणा, राजस्थान, महाराष्ट्र व बिहारमधील काही जागांवर फटका बसला. पण, पहिल्या यादीत नाव नसल्याने पक्षाचे राज्य ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष करणदेव कंबोज यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. त्याचाही फटका भाजपाला बसण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त भाजपाने पहिल्या यादीत १३ दलित, नऊ ब्राह्मण, आठ पंजाबी, पाच वैश्य, दोन राजपूत व एका शीख उमेदवाराला संधी दिली आहे. पहिल्या यादीमुळे बनिया व जैन या समाजांच्या भाजपा नेत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. पक्षाचे खासदार व उद्योगपती नवीन जिंदाल यांच्या आई सावित्री जिंदाल यांनी हिसारमधून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. त्यांनी काँग्रेसचे भूपेंद्रसिंग हुड्डा यांचेही कौतुकही केले. सोनिपतमधून तिकीट नाकारल्याने माजी मंत्री कविता जैन, तसेच भाजपाचे हिसारचे नेते तरुण जैन यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. दोघेही अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. त्याचप्रमाणे भाजपाच्या बिझनेस सेलचे सहसंयोजक नवीन गोयल यांनीही पक्षाला राम राम ठोकला आहे. भाजपातील दलित नेत्यांमध्येही नाराजी दिसून आली आहे. रतिया (अनुसूचित जाती-राखीव) मतदारसंघातून तिकीट नाकारल्याने आमदार लक्ष्मण नापा यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. नाराज नेत्यांमध्ये मंत्र्यांचादेखील समावेश आहे. ऊर्जामंत्री रणजित चौटाला यांनीही पक्षाचा राजीनामा दिला आहे. गुडगावमधून भाजपाने मुकेश शर्मा यांना उमेदवारी दिली आहे. सामाजिक न्याय राज्यमंत्री बिश्वंभर वाल्मिकी यांनीही पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष जी. एल. शर्माही नाराज आहेत. या नाराजीतूनच त्यांनी काँग्रेस नेते दीपेंद्र सिंग हुड्डा यांचीही भेट घेतली होती. त्यांनीही काँगेसमध्ये प्रवेश केला. केंद्र सरकारविरोधात रस्त्यावर कुस्तीपटूंच्या तीव्र आंदोलनाचे नेतृत्व करणारे विनेश फोगट व बजरंग पुनिया यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर जी. एल. शर्मा यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. जी. एल. शर्मा हे हरयाणाच्या राजकीय वर्तुळातलं मोठं नाव आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते भाजपासाठी राज्यात काम करत होते. त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे भाजपासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. शर्मा यांनी बराच काळ हरयाणा दुग्धविकास महामंडळाचे अध्यक्षपदही सांभाळले आहे. त्यामुळे हरयाणात मोठ्या संख्येने असणाऱ्या दुग्ध व्यावसायिक व उत्पादकांमध्ये त्यांचे नाव परिचित आहे. पक्षाला पक्षाला रामराम ठोकणाऱ्यांमध्ये आजी-माजी आमदारांचाही समावेश आहे. नाराजांना सांभाळणे, हे मोठे आव्हान पक्षांसमोर आहे. राज्यात लोकसभेच्या १० जागा असून, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने सर्व जागा जिंकल्या होत्या. सन २०२४ च्या निवडणुकीत भाजपाला कडवी झुंज देऊन पाच जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळण्याची आशा आहे. तिला महिला कुस्तीपटू विनेश फोगट आणि बजरंग पुनिया यांनी बळ दिले आहे. त्यात भाजपातील नाराज मंडळींनी काँग्रेसला आणखी बळ दिले. पहिल्या यादीनंतर पक्षाला लागलेली गळती लक्षात घेऊन राहिलेल्या २३ जागांवर उमेदवार जाहीर करण्यापूर्वी पक्षाचे नेतृत्व पाय फुकून पावले टाकत आहे. जाहीर झालेल्या पहिल्या यादीत कोणताही बदल करण्यात येणार नाही, असे भाजपाने ठरवले आहे. दुसरीकडे नाराज मंडळींची समजूत घालण्यात अपयश येत आहे. या पार्श्वभूमीवर दुसरी यादी जाहीर केली, तर आणखी काही इच्छुक नाराज होऊन पक्षाला सोडचिठ्ठी देतील, ही भीती पक्ष नेतृत्वाला वाटत आहे. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची १२ सप्टेंबर ही शेवटची तारिख आहे. त्यापूर्वी राहिलेले उमेदवार जाहीर करावे लागणार आहेतच. पण, संभाव्य नाराजांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुसऱ्या यादीची इच्छुकांना प्रतीक्षा आहे. ती जाहीर झाल्यानंतर आणखी काही जण पक्ष सोडतील, अशी चिन्हे आहेत. कधीकाळी हीच परिस्थिती काँग्रेसमध्ये होती. इतक्या मोठ्या नाराजांची समजूत काढण्याचे आव्हान भाजपासमोर प्रथमच उभे राहिले आहे.

## विचारधन

### रामापायीं ठेवा मन नाम घ्यावें रात्रंदिन



राम हा तारक मंत्र निराकार । जपा वारंवार हेंचि एक । हेंचि एक करा राम दृढ धरा । पुनरपि संसारा येणें नाहीं ।। येणें नाहीं पुन्हा सांगितली मात । जानकीचा कांत आळवावा ।। पार्वतीरमण जपे रामनाम । विषाचें दहन तेणें झाले ।। दीनदास म्हणजे वाल्मीक तरला । पापी उद्धरिला अजामेळ ।। जयासी लागला रामनामचाळा । आठवी गोपाळा सर्वकाळ ।। सर्वकाळ मति संतांचे संगतीं । जोडिला श्रीपति येणें पंथें ।। तिन्ही लोकीं श्रेष्ठ रामनाम एक । धरूनि विवेक जपे सदा ।। हनुमंतें केलें लंकेसी उड्डाण। रामनाम ठाण हृदयामाजीं । दीनदास म्हणे वानर तरले । नामीं कोटि कुळें उद्धरती ।। रामनामाविणें साधन हे जनीं । बरळती प्राणी स्वप्नामाजीं ।। स्वप्नींचा विचार तैसा हा संसार । सोडुनि असार, राम ध्यावा।। रामनामध्वनि उच्चारितां वाणी । पापाची ते धुनी होय तेणें ।। सिंधूचें मंथन रत्नांची ही खाण । तैसें हें साधन रामनाम ।। वेदांचेंही खंड योगाचें ते बंड । त्याचें काळें तोंड, दास म्हणे ।। मन हेंचि राम देहीं आत्माराम । जनीं मेघश्याम पाहे डोळा ।। पाहूनियां डोळां स्वरूपीं मुरावें । वाचेसी असावें रामनाम ।। नारायणनामें प्रह्लाद तरला । अजामिळ झाला एकरूप ।। एकरूप झाले वसिष्ठ महामुनि । तया चापपाणि वश झाला ।। दीनदास म्हणे स्मरे रघुनाथा । संसाराची चिंता त्यासी नसे ।। जनीं जनार्दन रामाचें चिंतन । सत्याची ही खाण रामनाम ।। गाईचें रक्षण भूतदया जाण । अतिथीसी अन्न घाला तुम्ही ।। संताचा संग विषयाचा त्याग । रामनामीं दंग होऊनिया राहे ।। राम कृष्ण हरि एकचि स्वरूप । अवताराची लीला वेगळाली ।। दीनदास सांगे लावूनियां ध्यान । तुम्ही आत्मज्ञान जतन करा ।। यत्न परोपरी साधनाचे भरी । आंवळे घेतां करीं तैसें होय।। तैसें होय, म्हणुनी करा त्याग । साधावा तो योग रामनामें ।। रामनामीं आस ठेवूनियां खास । वृथा न जाय श्वास ऐसे करा ।। ऐसें करा तुम्ही संसारीं असतां । वायां आणिक पंथा जाऊं नका ।। दीनदासाचे बोल मानूं नका फोल । भक्तवत्सल राम हृदयीं धरा ।। मनाचिया मागें जाऊं नका तुम्ही। येतों आतां आम्ही, कृपा करा ।। शेवटची विनवणी ऐका तुम्ही कानीं । संसारजाचणीं पडूं नका ।। रामपाठ तुम्हां सांगितला आज। आणिकांचे काज नाहीं आतां । नित्यपाठ करीं माणगंगातीरीं । होसी अधिकारी मोक्षाचा तूं ।। ब्रह्मचैतन्य नाम सद्गुरूचे कृपें । दीनदास जपे राम सदा ।।

**- गोंदवलेकर महाराज**

# स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही बंदी

**मंथन**
**रमेश लांजेवार**
**९९२१६९०७७९**

आज फक्त स्वीडनमध्येच नाही तर संपूर्ण जगात टीव्ही आणि मोबाईलच्या अती वापरामुळे दुष्परिणामाला सुरूवात झाली आहे.कारण टीव्ही आणि मोबाइलने लहान मुलांसह संपूर्ण मानवजातीला रीस्ते नाते तोडून आपलेसे करून ठेवले आहेत. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावले आहे. टीव्ही आणि मोबाइलचा दुष्परिणाम लहान मुलांवर मोठ्या प्रमाणात होऊन पुढील आयुष्यासाठी धोका निर्माण करण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे. कारण यामुळे अनेक नवीन -नवीन आजार जन्म घेऊ शकतात आणि घेत आहे. आधुनिक काळात लहान मुले रडायला लागली की त्यांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला जातो आणि ही प्रथा जगातील अनेक देशांमध्ये आहे. याचा दुष्परिणाम स्वीडनमध्ये दिसायला लागला आहे. त्यामुळे आता स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे. एका पाहणीनुसार १३ ते १६ वयोगटातील स्वीडिश किशोरवयीन मुले शाळेबाहेर पडल्यानंतर दररोज सरासरी साडेसहा तास मोबाइल, टीव्हीवर घालवत आहेत.८ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर अमेरिकेतील किशोरवयीन मुले घालवत आहेत. हीबाब भविष्यासाठी अत्यंत घातक आहे.देशांच्या आरोग्य संस्थेच्या मते मोबाईल आणि टिव्ही स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करीत असल्याने लहान मुलांना डिजिटल मिडिया आणि टेलिव्हिजन पासुन पूर्णपणे दुर ठेवले पाहिजे.मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे कौटुंबिक संवाद आणि शारीरिक व्यायाम बंद झाले आहे.आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल आणि टिव्हीने हिरावून घेतले आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये व ऑनलाईन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.याचेच प्रायश्चित्त आज स्वीडिश किशोरवयीन मुले भोगत आहेत.ही परिस्थिती फक्त स्वीडनमध्येच नाही तर भारतासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने सुध्दा दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात. स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारिक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसून येते. आज मोबाइलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही.कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या व टिव्हीच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल ऍक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही. डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ऍक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ऍक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.

यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.

आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा टॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते. मोबाइलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही. त्यामुळे ही कठीण परिस्थिती उद्भवत आहे.त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.अमेरिकन केडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.

# पॅरालिम्पिकमध्ये भारताची विक्रमी कामगिरी

**कटाक्ष**
**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

पॅरिस येथे झालेल्या पॅरालिम्पिकची नुकतीच सांगता झाली. भारतासाठी ही स्पर्धा संस्मरणीय ठरली. भारताने या स्पर्धेत ७ सुवर्ण, ९ रौप्य व १३ कांस्य अशी एकूण २९ पदके जिंकत पदक तालिकेत १८ वे स्थान मिळवले. यापूर्वी कोणत्याही स्पर्धेत भारताने इतकी पदके मिळवली नव्हती म्हणूनच ही स्पर्धा भातासाठी ऐतिहासिक ठरली. मागील २०२१ च्या टोकियो पॅरालिंपिकमध्ये भारताने १९ पदके मिळवली होती. त्याआधीच्या रियो पॅरालिंपिकमध्ये भारताने फक्त चार पदके मिळवली होती. याचाच अर्थ केवळ आठ वर्षात भारताने ४ वरून २९ वर उडी मारली आहे. भारताची ही कामगिरी जितकी आश्चर्यकारक आहे तितकीच ती अभिमानास्पद आहे. आजवर भारताने सर्व पॅरालिंपिक मध्ये मिळून ३१ पदके मिळवली होती त्यात आता २९ पदकांची भर पडली आहे. भारताच्या दिव्यांग खेळाडूंनी घेतलेल्या अपार मेहनतीचे फळ त्यांना या पॅरालिंपिक मध्ये मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अर्थात यावेळी भारतीय खेळाडू चमकदार कामगिरी करतील अशी अपेक्षा होतीच पण त्यांनी अपेक्षेपेक्षाही चांगली कामगिरी करून देश वासियांना आश्चर्याचा धक्का दिला. भारताला यावेळी सहा सुवर्णपदके मिळाली ही खूप मोठी कामगिरी आहे. नेमबाजी, बॅडमिंटन, गोळा फेक, थाळी फेक, तिरंदाजी, लांब उडी, उंच उडी, धावणे, ज्युडो अशा सर्वच क्रीडा प्रकारात भारताला पदके मिळाली. भारताच्या पदकांची संख्या आणखी वाढू शकली असती मात्र काही



खेळाडूंची पदके अगदी थोडक्यात हुकली. यावेळेस भारताचे ८४ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते त्यातील २९ खेळाडूंनी पदक मिळवले. भारतीय खेळाडूंची ही कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी केलेल्या या विक्रमी कामगिरीचा देशातील १४० कोटी जनतेला अभिमान आहे. पॅरालिंपीक ही दिव्यांग खेळाडूंची ऑलिंपिक स्पर्धा असते. मुख्य ऑलिंपिक स्पर्धा संपल्यावर तिचे आयोजन केले जाते. मुख्य ऑलिंपिक प्रमाणेच पॅरालिंपीक स्पर्धेला पण प्रतिसाद मिळाला पाहिजे. खेळाडूंचे कौतुक झाले पाहिजे पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही मुख्य ऑलिंपिक स्पर्धेत भारताने केवळ सहा पदके मिळवली. त्यावेळी भारतीयांना आनंदाचे भरते आले. मुख्य ऑलिंपिकमध्ये भारताने एकही सुवर्णपदक मिळवले नाही केवळ रौप्य आणि कांस्यपदकावर भारताला समाधान मानावे लागले. तरीही देशात दिवाळी सजारी झाली. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियावर पदक विजेत्या खेळाडूंच्या अभिनंदांची स्पर्धाच लागली पण पॅरालिंपक मध्ये विक्रमी कामगिरी करून देशाचे नाव उज्वल करणाऱ्या दिव्यांग खेळाडूंच्या पदरी मात्र निराशाच आली. या खेळाडूंचे म्हणावे तसे कौतुक झाले नाही. नीरज चोप्रा, मनू भाकर, स्वप्नील कुसाळे ही नावे १४० कोटी लोकांना माहीत आहे मात्र पॅरालिंपिक मध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या एकाही खेळाडूचे नाव देशातील एकाही नागरिकाला माहीत नाही याला काय म्हणावे ? प्रसार माध्यमांनी देखील पॅरालिंपिकला म्हणावे तेवढे कव्हरेज दिले नाही. भारतीय क्रिकेट संघाची जर झिम्बाब्वे किंवा बांगलादेश सोबत मालिका असेल तर त्या मालिकेलाही प्रसार माध्यमे खूप मोठे कव्हरेज देतात पण पॅरालिंपिक सारख्या १८० हून अधिक देशांचा सहभाग असलेल्या जागतिक दर्जाच्या स्पर्धेकडे प्रसार माध्यमे दुर्लक्ष करतात कदाचित ही दिव्यांग खेळाडूंची स्पर्धा असल्याने प्रसार माध्यमांनी त्याकडे दुर्लक्ष केले असेल. पॅरालिंपक मध्ये विक्रमी कामगिरी करूनही या दिव्यांग खेळाडूंना त्याचे श्रेय मिळाले नाही. दिव्यांगाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन समाधानकारक नाही हेच यातून स्पष्ट होते. आजही दिव्यांगांकडे सहानुभूतीनेच पाहिले जाते वास्तविक या पदक विजेत्या दिव्यांग खेळाडूंना सहानुभूतीची नाही तर कौतुकाची, प्रोत्साहानाची गरज आहे. दिव्यांग खेळाडूंकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला तर ते देशासाठी आणखी चांगली कामगिरी करून देशाचे नाव उज्वल करतील यात शंका नाही. पॅरालिंपिक मध्ये विक्रमी कामगिरी करणाऱ्या भारतीय खेळाडूंचे मनापासून अभिनंदन!

# नुकसान टाळण्यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट गरजेचे

पावसाळा सुरू झाला की पूर, इमारती-दरडी कोसळणे, पूल वाहून जाणे, धरणे फुटणे, संरक्षक भिंती खचणे यासारख्या घटना दरवर्षी नियमित घडतात त्यामुळे अनेकांना प्राण गमवावा लागला आहे प्रशासन वेळोवेळी असल्या घटनांकडे डोळेझाक करते मात्र याचा फटका जनतेला बसतो त्यासाठी याचा गांभीर्याने विचार करुन जीवितहानी, वित्तहानी व मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या अशा घटना टाळण्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामांचे नियमित संरचनात्मक लेखापरीक्षण अर्थात स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक असते. माणूस चाळीस वर्षांचा झाला की साधारणत: डॉक्टर नियमित वैद्यकीय तपासणी करण्यास सुचवितात व सुदृढ राहण्यासाठी त्या आपण करीत असतो. त्याचप्रमाणे इमारतीचे वय ३० वर्षांवरील असेल तर दर तीन वर्षांनी संरचनात्मक लेखापरीक्षण



करणे कायद्याने अनिवार्य आहे. संरचनात्मक लेखापरीक्षणात इमारतीचे विविध भाग जसे की, कॉलम, बिम, स्लॅब, भिंती, पाया इत्यादींची तपासणी तज्ज्ञांकडून करून इमारतीची गुणवत्ता, क्षमता व आयुष्यमान ठरविले जाते. बांधकामांतील भिंतीमध्ये निर्माण झालेल्या तडा, विविध भागांत निर्माण झालेला ओलावा, धरलेले पोपडे, काँक्रीटमधील सळ्यांना लागलेले गंज, विविध भागांत निर्माण झालेले बाक, विविध पाईपलाइनमधील गळती यावरून बांधकाम सुरक्षित आहे की नाही हे ठरवू शकतो.

इमारतीप्रमाणे विविध स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामे जसे की धरण, पूल, उंच पाण्याच्या टाक्या, संरक्षक भिंती इत्यादींचे वेळोवेळी संरचनात्मक लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. महत्त्वाच्या स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामांचे संरचनात्मक लेखापरीक्षण नियमित करून अहवालाप्रमाणे कार्यवाही केल्यास पावसाळ्यातील भविष्यातील बऱ्याच दुर्घटना तसेच मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी टाळणे शक्य होऊ शकते. याकरिता संबंधित शासकीय बांधकाम विभाग, महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यासारख्या विभागांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामाचे संरचनात्मक लेखापरीक्षण बंधनकारक करून त्याची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे !

**- राजू जाधव**

## जनमनाचे प्रतिध्वनी

### नियम पाळा, अपघात टाळा

१४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतामध्ये वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर होणारी कोंडी हे दृश्य नेहमीचेच झाले आहे. हे चित्र काळानुरूप कमी होताना दिसतच नाही, उलट त्यात दिवसागणिक वाढच होताना दिसत आहे. भारताच्या लोकसंख्येपैकी एकूण ८० टक्के लोक आज वाहने चालवताना सर्वत्र दिसून येतात. पायी चालण्याचे कोणी नावच घेत नाही. वाहनांच्या सततच्या गर्दीमुळे दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढत आहे. अपघातांमुळे जीवित हानी होते ही गंभीर समस्या बनत चालली आहे. अपघातांमुळे माणसांचे आयुष्य कमी होत चालले आहे. घरातील कर्त्या व्यक्तीचा अपघात झाला तर ते संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणावर भर घालण्याचे काम रस्त्यांची दुरवस्था, खड्ड्यांचे प्रमाण हे आहे. शासनाने



वाहतुकीबाबतचे काही नियम आखून दिले आहेत. सामान्य लोकांनी ते नियम पाळल्यास अपघाताचे प्रमाण कमी होऊ शकते. पोलीस, सामान्य जनता या सगळ्यांनी जर नियम पाळले तर अपघात कमी होण्यास निश्चितच आळा बसू शकतो. पोलीस, रुग्णवाहिका, प्रशासकीय व्यवस्थेबरोबर सामान्य जनतेने त्यांना मदत केली पाहिजे.

**- प्रभाकर वारुळे, नाशिक**

### वाहतुकीची जटिल समस्या

वर्तमानपत्रात नाशिक महानगरातील वाहातुक व्यवस्थेची दिवसेंदिवस बिकट होत चाललेली समस्या सचित्र मांडली जाते. मिरवणुका,आंदोलने,सण उत्सव निमित्त खरेदीसाठी उसळलेली गर्दी,रस्त्यावर पावसाचे पाणी तुंबणे या व्यतिरिक्त अरुंद रस्ते,रस्त्यावर कुठेही वाहने पार्क करणे इत्यादी कारणामुळे सातत्याने वाहतुक कोंडी होउन वाहतुक व्यवस्थेचा बोजवारा उडत असतो.पदपथावर विक्रेतेही वाहतुकीचा खोळंबा होण्यास हातभार लावत असतात.विशेषतः शहराच्या मध्यवर्ती भागात अशोक स्तंभा पासुन वाहतुक कोंडीस सुरुवात होते ती पुढे रविवार कारंजा बोहोरपट्टी, सरफबाजार मेनरोड,म गांधी रोड याभागात पसरते.वाहतूक नियंत्रण करणारे पोलिस दल वाहतूक सुरळीत ठेवण्यास कुचकामी व अपयशी ठरते. मनपा व पोलीस प्रशासन यास अप्रत्यक्ष जबाबदार असले तरी नाशिकचे आमदार,नगरसेवक या प्रश्नांविषयी उदासीन राहातात हेच मोठे दुःख आहे.नेहमी राजकारणात व्यस्त असलेल्या कोणत्याही राजकीय पक्षांकडे जनतेला भेडसावत असलेल्या या समस्येची उकल करण्यात वेळ नसतो.हा गंभीर प्रश्न कोण सोडविणार ते गणपती बाप्पाचं जाणे!

**- विजय रघुनाथ भदाणे**

### मल्याळम चित्रपट व्यवसायाची लक्तरे

मल्याळम चित्रपटसृष्टीवर हेमा समितीने सादर केलेल्या अहवालामुळे केवळ मल्याळम चित्रपट व्यवसायाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत असे नसून देशातील सगळ्याच भाषांच्या चित्रपट व्यवसायांच्या गैरव्यवहारांवर लख्ख प्रकाश पडला आहे. रुपेरी पडद्यावर जे नायक महिलांसाठी जिवाची तमा बाळगत नाहीत अशांमधील अनेक जण चित्रपट व्यवसायातील छुपे खलनायकही असतात. चित्रपटसृष्टीत चंचुप्रवेश करू इच्छिणाऱ्या नवोदितांचे--विशेषत: महिलांचे-भयानक शोषण करण्याची पद्धत आजची नाही. अनेक वर्षांपासून ती चालत आली आहे.

एखाद्या महिलेला वा तरुणीला चित्रपट अथवा दूरचित्रवाणी मालिकेत भूमिका मिळविण्यासाठी आपल्या शीलाचा सौदा करावा लागतो हे आता लपून राहिलेले नाही. आणि अशी महिला एकदा त्या जाळ्यात अडकली की तिला पुन्हा बाहेर पडणे अशक्यप्राय होते. हिंदी चित्रपटसृष्टीत सहा वर्षांपूर्वी महिलांच्या लैंगिक छळाविरुद्ध ऋमी टूऋ मोहीम सुरू झाली होती. नंतर ती थंडावली.


**- अनिल रा. तोरणे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

# नाशिक गणेश दर्शन


► आदिवासी जीवरक्षक दल, रामकुंड मित्रमंडळ


► भडक दरवाजा मित्रमंडळ, दिंडोरी नाका



► ओम प्रेम फ्रेंड सर्कल


► आई सप्तशृंगी मित्रमंडळ, सेवाकुंज, पंचवटी



► अचानक मित्रमंडळ, गजानन चौक, पंचवटी


► कृष्णनगर युवक मित्रमंडळ


► ओम शिव फ्रेंड सर्कल, गुरुद्वारा मार्ग, पंचवटी


► श्रीकृष्णनगर मित्रमंडळ, जुना आडगाव नाका


► कालिका माता मित्रमंडळ, गणेशवाडी, पंचवटी


► गुरुदत्त शैक्षणिक व सामाजिक कला व क्रीडा मंडळ, पंचवटी कारंजा


► इंद्रकुंड मित्रमंडळ, तारकासुराचा वध असलेला देखावा.


► बजरंग मित्रमंडळ, नाग चौक, पंचवटी


► श्री मुंजोबा मित्रमंडळ, गणेशवाडी


► मालेगाव स्टँड मित्रमंडळ, लंका दहनाचा देखावा


► चार्ली ग्रुप, पाथरवट लेन, पंचवटी


► वेताळेश्वर मित्रमंडळ, चार हत्ती पुल, जुना आडगाव नाका

## आयएसपी, सीएनपी प्रेस गणेश मंडळाने आणले जेजुरीचे खंडेराया

नाशिकरोड : वार्ताहर

**येथील इंडिया सिक्युरिटी प्रेस मजदुर संघाच्या वतीने मेनगेट वरील प्रेसच्या क्रीडा संकुलात यावर्षी जेजुरीच्या खंडेरायाच्या गडाची हुबेहूब प्रतिकृती उभारली आहे. पार्किंग साठी प्रशस्त जागा, लहान मुलांची खेळणी आणि खंडेरावाच्या जागरणातील वाघ्या मुरळी प्रत्यक्ष जागरणातील गीते सादर करत आहे. त्यामुळे नागरिकांची व बाल गोपाळांची प्रचंड गर्दी उसळत आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीचा खंडेराया असल्याने भाविकांची गर्दी वाढत आहे.**

प्रेसचे सरचिटणीस जगदीश गोडसे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर जुंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेसच्या गणेश उत्सव मंडळातील पदाधिकारी व मजदूर संघाचेही पदाधिकारी उत्तम व्यवस्था बघत आहेत. नाशिकरोडमधील गणेश उत्सवातील हे मोठे आकर्षण ठरले आहे.




## एक मृत्यूदेह ३५ लोकांचे आयुष्य सुधारू शकतो : देवरे

सिडको : प्रतिनिधी

**शरीर हे क्षणभंगूर आहे, मृत्यू नंतर सारे नष्ट होते अशी प्रत्येकाची भावना असते परंतु दान धर्मात अवयव दान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे आणि याच अभियनाची सुरुवात गणेशोत्सवापासून करण्यात आली आहे.**

हे अभियान गणेशोत्सव, नवरात्री तसेच दिवाळीपर्यंत असेच सुरु राहणार आहे. प्रत्येकवर्षी देवरे पाटील परिवाराच्या घरगुती गणेशोत्सवात समाजपयोगी सर्वश्रेष्ठ अवयव दानाची जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या दानात मूत्रपिंड, यकृत, हदय, स्वादुपिंड, पेशी, आतड्याचा भाग असे विविध अवयव दान करता येतात यामध्ये मृत्यू नंतर तसेच मृत्यू आधी कोणते अवयव दान करता येतात याचबरोबर त्याचा कालावधी किती सोबत दान घेणारे व दान करणारे यांचे गैरसमज दूर करण्यासाठी आणि अवयव दान करण्याऱ्यांची संख्या वाढण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आल्याचे नितीन देवरे यांनी सांगितले. तसेच अवयवदान विषयी जनजागृती बॅनर सार्वजनिक मंडळ किंवा संस्था यांना हवे असल्यास ९६१९४९०१९८ या क्रमांकावर संपर्क साधधावा असे गायत्री सूर्यवंशी यांनी सांगितले.

## सोनपावलांनी आज गौराईंचे आगमन होणार

नाशिक : प्रतिनिधी

**गणराया पाठोपाठ गौराईंचे सोनपावलांनी आगमन होणार आहे गौरीचं आज मंगळवारी (दि.१०)आवाहन केले जाणार आहे. गौरी पूजन दि.११ ला होणार असून विसर्जन १२ तारखेला होणार आहे. अनुराथा नक्षत्राची सुरूवात दि.९ सोमवारी सायंकाळी ६ वाजून ५ मिनिटांपासून होणार आहे. समाप्ती आज दि.१० रात्री ८ वाजून ३ मिनिटांनी समाप्ती होणार आहे.**

गौरींच्या आवाहनाचा मुहुर्त सुर्यादयापासून ते सायंकाळी ६ वाजून २७ मिनिटांपर्यंत असणार आहे. त्यामुळे दिवसभरात गौरींची स्थापना करण्यास वेळ मिळणार आहे. तीन दिवसांच्या माहेरपणासाठी महालक्ष्मी पूजन केले जाणार आहे. गौराईंना आगमन, भोजन आणि निरोप दिला जाणार आहे. गौरीपूजनाचा उत्साह घराघरात दिसून येत आहे. गेल्या महिनाभरापासून गौरींच्या आगमनासाठी महिला वर्गासह कुटुंबियांची तयारी सुरू आहे.

पौराणिक कथेनुसार असुरांच्या त्रासाला कँटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण गेल्या. तिची प्रार्थना केली तेव्हा श्री गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार करून पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात

गणेशाच्या पाठोपाठ तीन दिवसांनी गौराई, महालक्ष्मी, ज्येष्ठा कनिष्ठ अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या महालक्ष्मींची स्थापना केली जाते. धनधान्य पुत्रपौत्र, लक्ष्मी नांदावी, भरभराट व्हावी, सुखसमृद्धी संपन्नता यावी यासाठी गौराईंची स्थापना आपआपल्या पद्धतीने केली जाते.

माहेरपणासाठी आलेल्या ज्येष्ठा कनिष्ठांच्या पूजनात कोणतीच कमतरता राहू नये यासाठी महिलावर्ग आणि घरातील पुरूष मंडळींसह बच्चे कंपनीही खारीचा वाटा उचलतांना दिसून येत आहेत. महालक्ष्मीच्या नैवेद्यासाठी भाजीपाला, फळे, फुले खरेदीसाठी बाजारात सोमवारी पूर्वसंध्येला गर्दी झाल्याचे चित्र होते.

माहेरवाशींनीप्रमाणे घराघरात आज गौरांईचे स्वागत केले जाणार आहे. प्रत्येकाच्या परंपरेनुसार कोणाकडे उभ्या, बसलेल्या किंवा खड्यांच्याही गौराई पूजल्या जातात. स्वागतपूर्वी गौराई जिथे स्थापन करणार ती जागा सुशोभित केली जाते. उभ्या गोराई असल्यास त्यांना साडी, दागिने परिधान करण्यात येतात. घर अंगणात रांगोळी काढली जाते. महालक्ष्मी घरी आणतांना भाकर तुकडा ओवाळून टाकला जातो. औक्षण केले जाते.अंगणातील तुळशीपासून स्थापनेच्या जागेपर्यंत हाताचे ठसे पावले काढले जातात. त्यानंतर विधिवत पूजन, स्थापना आणि आरती नैवेद्य दाखविला जातो. पहिल्या दिवशी साधा नैवेद्य दुसऱ्या दिवशी पुरणपोळी आणि सोळा भाज्यांचा आणि निरोपाच्या दिवशी आंबिल कथीलाचा नैवेद्य दाखविला जातो.

### महालक्ष्मी पूजनाचा उत्साह



## जुने नाशिक मंडल युवा मोर्चा कार्यकारिणी घोषित

नाशिक : प्रतिनिधी

**भाजप नाशिक महानगर जुने नाशिक मंडलाची युवा मोर्चा कार्यकारिणी अध्यक्ष कृष्णा ठाकरे यांनी घोषित केली. भाजपा जुने नाशिक मंडल अध्यक्ष भास्कर घोडेकर यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली. सदर कार्यकारणी प्रदेश भाजपने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केली असल्याचे मंडल अध्यक्ष भास्कर घोडेकर यांनी पत्रकात म्हटले आहे.**


कृष्णा ठाकरे


पवन पवार


ओमकार काळे


राहुल डहांके

भाजप प्रदेश महामंत्री विजय चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, नाशिक जिल्हा प्रभारी राजेंद्र गावित, भाजपा नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव, लोकसभा समन्वयक गिरीष पालवे, आ.प्रा.देवायानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ.ॲड.राहुल ढिकले, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदिप पेशकार, गोविंद बोरसे, बाळासाहेब सानप, विजय साने, महेश हिरे, सतिष कुलकर्णी, भाजपा नाशिक शहर सरचिटणीस सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, ॲड.श्याम बडोदे, हिमगौरी आडके, रोहीणी नायडू-वानखेडे, युवा मोर्चा शहराध्यक्ष सागर शेलार, जुने नाशिक मंडल सरचिटणीस ॲड. पवन गुरव, सागर धर्माधिकारी, सचिनदेव गायकवाड, पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**नूतन कार्यकारणी पुढीलप्रमाणे**

अध्यक्ष-कृष्णा ठाकरे, उपाध्यक्ष - युवराज तेजाळे, महेश बोरदे, संदिप सारुक्ते, गौरव गरड, विकी जमधाडे, वैष्णवी लोखंडे, मयुर मोरे, अविनाश आहिरे, सरचिटणीस - पवन पवार, ओमकार काळे, राहुल डहांके, चिटणीस - राज विश्वकर्मा, शुभम पालवे, धिरज आहिरे, अनिकेत क्षिरसागर,अमोल फुलसुंदर, विघ्नेश गाडे, भुषण घोडेकर, सिध्दांत कांबळे, कोषाध्यक्ष - कैलास काळे, प्रसिध्दी प्रमुख - नितीन दिघे, सोशल मिडीया प्रमुख - ऋषिकेश गाडे, विद्यार्थी संयोजक - प्रणय भोई, क्रीडा संयोजक - राहुल ठाकरे, कार्यकारिणी सदस्य - संतोष वार्डे, अतुल कळसकर, मानव तेजाळे, अवधुत थोरात, अमोल गुणवंत, रोहित टिपले, शुभम हत्ते, वैभव पगारे, आकाश काथवटे, अनिकेत डांगरे, रोहित पवार, धनंजय गोंधळे.